# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०७/ २०१६** **दिनांक १४.०६.२०१६**

**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- सायंकाळी ०५.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक १३.०६.२०१६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ११६५/ २०१६, दिनांक १० जुन, २०१६ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानंतर जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ १२०९/ २०१६, दिनांक ११ जुन, २०१६ अन्वये काही अपरिहार्य कारणास्तव सदरहू सभा सोमवार दिनांक १३.०६.२०१६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता ऐवजी मंगळवार दिनांक १४.०६.२०१६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता आयोजित करणेत आलेली असून सभेचे ठिकाण व विषयसूची (अजेंडा) पुर्वीप्रमाणेच राहील असे सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा मंगळवार दिनांक १४.०६.२०१६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा. अध्यक्ष श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली

**विषय नं.०१** **दिनांक १९.०५.२०१६ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३२२** दिनांक १९.०५.२०१६ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक २७.०५.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेमध्ये, उपसमिती सभेने केलेल्या शिफारशींना पुष्टी देणेबाबत.**

**निर्णय क्र.३२३** दिनांक २७.०५.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१ संस्थान व्यवस्थापनांतर्गत असणारे विविध विभागातील कामांचे मनुष्यबळ व्यवस्थापन संस्थेमार्फत परिक्षण करणेकामी प्राप्त झालेले व्यावसायीक प्रस्ताव उघडणेबाबत.**

**(अ)** आस्थापना विभागाचे दिनांक २४/१२/२०१५ व दिनांक १०/०२/२०१६ रोजीच्या मंजूर टिपणीन्वये संस्थानमधील विविध विभागात कार्यरत असलेल्या कायम/ कंत्राटी कर्मचा-यांचे प्रत्यक्ष कामाचे स्वरुप, कामाची कार्यक्षमता, कामाचा बोजा इत्यादींचे (Work Efficiency & Energy Audit) मनुष्यबळ व्यवस्थापन सल्लागार संस्थेमार्फत (Human Resource Management Consultant) परिक्षण करणेचे प्रस्तावित असल्याने याकामी संस्थानचे संकेतस्थळासह व महाराष्ट्र राज्यातील प्रमुख शहरांमध्येप्रसिध्द होणा-या वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देण्यात आलेली होती.

सदर जाहिरातीत इच्छुक सल्लागार व्यक्ती/ संस्थांनी सिलबंद व्यावसायिक प्रस्ताव दि.१९/०३/२०१६ अखेर जमा करणेबाबत नमूद करणेत आलेले होते परंतु आस्थापना विभागाचे दिनांक १७/०३/२०१६ रोजीचे मंजूर टिपणीन्वये उपरोक्त कामासाठी दि.२६/०३/२०१६ अखेर व्यावसायिक प्रस्ताव स्विकारणेस मान्यता घेण्यात आली होती.

**(ब)** त्यास अनुसरुन मनुष्यबळ परिक्षण संदर्भात उपरोक्त नमुद विहित मुदतीत ०४ व्यावसायिक प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यांचा तपशिल खालीप्रमाणे-

| अ.नं. | व्यावसायिक प्रस्ताव धारकाचे नाव | आवक क्र. | दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.चैतन्य चंद्रकांत उगले, नाशिक | २५०५३ | २१/०३/२०१६ | ई-मेल संदेशाव्दारे प्राप्त |
| ०२ | संदिप मुखर्जी कन्सल्टींग सर्व्हिसेस, कोलकाता | २५३७७ | २४/०३/२०१६ | बंद पाकिटाव्दारे प्राप्त |
| ०३ | वैभव प्लेसमेंट्स् (प्रा.) लिमिटेड, नाशिक | २५४४८ | २६/०३/२०१६ | बंद पाकिटाव्दारे प्राप्त |
| ०४ | श्री.धनंजय गोखले, पुणे | २५४६८ | २६/०३/२०१६ | बंद पाकिटाव्दारे प्राप्त |

**(क)** उपरोक्तप्रमाणे मनुष्यबळ परिक्षण संदर्भात प्राप्त झालेले ०४ व्यावसायिक प्रस्ताव उघडून, इच्छूक प्रस्तावधारकांनी सादर केलेल्या प्रस्तावांचा अभ्यास करुन त्याबाबतचा तुलनात्मक अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेकामी मान्यता असावी.

उपरोक्त तक्त्यात नमुद केलेले ०४ व्यावसायिक प्रस्ताव आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | व्यावसायिक प्रस्ताव धारकाचे नाव | भाग- ०१ कळविलेले दर रु. | भाग- ०२ कळविलेले दर रु. | एकूण दर रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.चैतन्य चंद्रकांत उगले, नाशिक | १८,००,०००/- + टॅक्स | ५,००,०००/- + टॅक्स | २३,००,०००/- + टॅक्स |
| ०२ | संदिप मुखर्जी कन्सल्टींग सर्व्हिसेस, कोलकाता | ३०,५०,०००/- + टॅक्स | ६०,५०,०००/- + टॅक्स | ९१,००,०००/- + टॅक्स + शिर्डी भेटीदरम्यान निवास/ भोजन व्यवस्था विनामुल्य |
| ०३ | वैभव प्लेसमेंट्स् (प्रा.) लिमिटेड, नाशिक | | | **९,५१,०००/- टॅक्ससहीत (शिर्डी भेटीदरम्यान निवास/ भोजन व्यवस्था विनामुल्य + प्रवास खर्च)** |
| ०४ | श्री.धनंजय गोखले, पुणे | ९,५०,०००/- | ३,००,०००/- | १२,५०,०००/- + टॅक्स+ शिर्डी भेटीदरम्यान निवास/ भोजन व्यवस्था विनामुल्य |

**संस्थान व्यवस्थापनांतर्गत असणारे विविध विभागातील कामांचे मनुष्यबळ व्यवस्थापन संस्थेमार्फत परिक्षण करणेकामी वैभव प्लेसमेंट्स् (प्रा.) लिमिटेड, नाशिक यांचे रु.९,५१,०००/- (टॅक्ससहीत) मात्र तसेच परिक्षण करणेसाठी ज्या-ज्या वेळेस शिर्डीला भेट देतील, त्या-त्या वेळेस त्यांची निवास व भोजन व्यवस्था विनामुल्य व येणे-जाणेचा प्रवास खर्च, असे निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, वैभव प्लेसमेंट्स् (प्रा.) लिमिटेड, नाशिक यांचे वरील अधोरेखित केलेले निम्नतम दर मान्य करणेत यावे, तसेच त्यांनी मागणी केलेल्या उपरोक्त सोयी सुविधांबाबत चर्चा करणेसाठी मा.कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष, उपसमिती सभा यांचेसमोर वैभव प्लेसमेंट्स् (प्रा.) लिमिटेड, नाशिक यांचे प्रतिनिधींना बोलविणेत येऊन, अंतीम निर्णय घेण्यात यावा व त्यास चक्रिय पध्दतीने मा.त्रीसदस्य समितीची मान्यता घेण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

०२ **माहिती व सुविधा केंद सिकंदराबाद, चेन्नई, बंगळूरु या ठिकाणी (ट्रान्सपोर्टमार्फत) वाहतुक कंपन्यांकडून संस्थान प्रकाशने (साहित्य) पाठविणेकामी मागविण्यात आलेल्या सिलबंद प्राप्त निवीदा उघडणेबाबत.**

**अधिनियम तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं. ठ. मध्ये खालील तरतुद आहे

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्तावः-** प्रकाशने विभाग दि.१९.०२.२०१६ चा मंजूर प्रस्तावानुसार माहिती व सुविधा केंद्र सिकंदराबाद चेन्नई व बंगळूरु या ठिकाणी पुस्तके/फोटो/ डायरी व कॅलेंडर्स (ट्रान्सपोर्टमार्फत) संस्थान प्रकाशने (साहित्य) पाठविणेकामी वाहतुक कंपन्यांकडून दि.२१.०३.२०१६ ते दि.३०.०३.२०१६ अखेर सिलबंद दरपत्रके मागविण्यात आलेले होते प्राप्त सिलबंद दरपत्रकांचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.नं. | सिलबंद दरपत्रकांचातपशिल | मागिल मंजूर दर (प्रति किलो प्रमाणे) (सन २०१२-२०१३) |
|---|---|---|
| ०१ | टि.सी.आय एक्सप्रेस, शाखा अहमदनगर | - |
| ०२ | डी.टी.डी.सी.कुरिअर, शाखा शिर्डी | - |
| ०३ | टि.सी.आय एक्सप्रेस, शाखा सिन्नर | ५.४५ पैसे |
| ०४ | घाटगे पाटील ट्रान्सपोर्ट लि., शाखा कोपरगांव | ५.५० पैसे |
| ०५ | आधुनिक कुरिअर सव्हीस, शाखा अहमदनगर | - |

**मागणीः-** माहिती व सुविधा केंद्र सिकंदराबाद, चेन्नई व बंगळूरु या ठिकाणी (ट्रान्सपोर्टमार्फत) संस्थान प्रकाशने (साहित्य) पाठविणेकामी वाहतुक कंपन्यांकडून मागविण्यात आलेले सिलबंद मागणीपत्रके उघडणे आहे

**मा.व्यवस्थापन समिती निर्णयः-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०.११.२०१५ निर्णय क्र.४५५ अन्वये मान्यता मिळाली असून, संस्थान प्रकाशने (साहित्य) बंगळूरु, सिकंदराबाद व चेन्नई येथील माहितीकेंद्रावर पाठविणेसाठी सवलतीचे दर मिळणेकामी वाहतूक कंपन्यांकडून विहीत पध्दतीने निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

मा.व्यवस्थापन समिती निर्णयानुसार मागविण्यात आलेले उपरोक्त ०५ सिलबंद दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | सिलबंद दरपत्रकांचा तपशिल | दरपत्रकामधील मुळ दर प्रती किलो | | |
|---|---|---|---|---|
| | | सिकंदराबाद साठीचे दर रु. | चेन्नई साठीचे दर रु. | बंगळूर साठीचे दर रु. |
| ०१ | टि.सी.आय एक्सप्रेस, शाखा अहमदनगर | १०.०० | १०.०० | १०.०० |
| ०२ | डी.टी.डी.सी.कुरिअर, शाखा शिर्डी | १८.०० | २२.०० | १८.०० |
| ०३ | टि.सी.आय एक्सप्रेस, शाखा सिन्नर | ९.०० | ९.०० | ९.०० |
| ०४ | घाटगे पाटील ट्रान्सपोर्ट लि., शाखा कोपरगांव | **४.५०** | **५.५०** | **५.४५** |
| ०५ | आधुनिक कुरिअर सर्व्हीस, शाखा अहमदनगर | १५.०० | १५.०० | १५.०० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, माहिती व सुविधा केंद सिकंदराबाद, चेन्नई, बंगळूरु या ठिकाणी (ट्रान्सपोर्टमार्फत) वाहतुक कंपन्यांकडून संस्थान प्रकाशने (साहित्य) पाठविणेकामी घाटगे पाटील ट्रान्सपोर्ट लि., शाखा कोपरगांव यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्यातमधील गडद व अधोरेखीत केलेले प्रती किलो निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**०३ श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट बाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या आदेशाप्रमाणे जनसेटची उत्पादन कंपनी मे.कमिन्स इंडिया लिमिटेड, पुणे यांचे अधिकृत डिलर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचेकडून प्राप्त झालेली निविदा उघडून निर्णय होणेबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या ०१). मंदिर परीसर, ०२).साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), ०३). श्री साईबाबा हॉस्पीटल + साईनगर, ०४). व्दारावती भक्तनिवास + श्री साईनाथ रुग्णालय, ०५). श्री साई प्रसादालय,०६). साईआश्रम भक्तनिवास ०७). साई धर्मशाळा, ०८). पाणीपुरवठा साठवण तलाव, ०९). रथपालखी जनरेटर या वेगवेगळया ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीजपुरवठा घेण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा पुरवठा काही कारणास्तव वेळोवेळी खंडीत होतो काही वेळेस महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे दुरुस्तीचे मोठे काम चालू असल्यास २४ तास देखील वीजपुरवठा खंडीत केला जातो अशा काळात संस्थानचे कामकाज सुरळीत चालावे, गर्दीत अंधारात काही अनुचीत घटना घडू नये याकरीता पर्यायी वीजपुरवठयासाठी ठिकठिकाणी जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहे. हे सर्व जनरेटर सुस्थितीत कार्यान्वित असणे गरजेचे असल्याने त्याकरीता यासर्व जनरेटरची काही ठरावीक कालावधीत इंजिन आईल, डिझेल फिल्टर, ऑईल फिल्टर, बायपास फिल्टर, कुलंट फिल्टर बदली करुन बी चेक सर्व्हिसिंग करणे गरजेचे असते ऑईल फिल्टर व इतर मटेरीअल हे जनरेटर उत्पादक कंपनीचे ओरीजिनल वापरणे फायदेशिर ठरते. हे सर्व मटेरीअल मार्केटमध्ये उपलब्ध होत नाही. म्हणून सदरच्या जनरेटर इंजिनची सर्व्हिसिंग हे जनरेटर इंजिनची उत्पादक कंपनीकडून करुन घेणे गरजेचे आहे.

यापुर्वी संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात अपलोड करुन ईनिविदा बोलविण्यात येऊन त्यातील निम्नतम दर दिलेले मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना दि१-१०-२०१४ ते दि.३०-०९-२०१५ या कालावधीकरीता श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा संस्थान जा.नं.एसएसएस/ विद्युत/ ३१५८/ २०१४ दि.३०-०९-२०१४ अन्वये रक्कम रु.३३,००,०००/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आला होता. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टमध्ये त्यांनी समाधानकारक सर्व्हीस दिली असून सर्व जनसेट सुरळीत कार्यन्वीत आहेत सदरच्या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दि.३०-०९-२०१५ रोजी संपणार असल्याने पुढील सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टकरीता विद्युत विभागामार्फत दि२१-०७-२०१५चे टिपणी अन्वये मा.त्रिसदस्य समितीची मान्यता घेण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

मा.त्रिसदस्य समितीसमोर सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर तो प्रस्ताव मा.मुबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकरीता सादर करावा लागणार होता. त्यास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता मिळाल्यानंतर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणे या प्रक्रियेस व टेंडर आल्यानंतर ते मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणे याकामी साधारणत तीन ते चार महिन्याचा कालावधी लागणार होता. तोपर्यंत सदरचे जनरेटरसेट

कार्यान्वित ठेवणे अत्यावश्यक असल्याने संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देण्याबाबतची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत दिनांक०१-१०-२०१५ पासुन पुढे मागील टेंडरच्या मंजुर दराप्रमाणे प्रतिमाह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेकरीता विद्युत विभागामार्फत दि१४-०८-२०१५ चे टिपणी अन्वये मा.त्रिसदस्य समितीची मान्यता घेणेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यास मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समितीच्या दिनांक ०८-१०-२०१५ चे सभेतील विषय क्र.१६ निर्णय क्र.३३५ अन्वये ``यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावितकामी ई-निविदेची मागणी करणेत यावी. त्यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकिलामार्फत अर्ज दाखल करावा, तसेच ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मागील टेंडरच्या दराने येणा-या प्रतिमाह रु. २,६७,६३९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.`` त्यानुसार मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबतची पुढील कार्यवाही होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

यापुर्वी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे समोर C.A.NO.9219 OF 2014 IN PIL NO.18 OF 2011 दि.२६-०९-२०१४ अन्वये झालेल्या सुनावणीत ``वार्षिक मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्श टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशिनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधित मशिनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हीस डिलरला पुर्वीच्या अटी व शर्तीवर देण्यात यावे`` असा आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दिलेला आहे.

त्यानुसार संस्थानमधील सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टबाबत जनसेटची उत्पादक कंपनी मे.कमिन्स यांचेकडुन दरपत्रक मागविणेकरीता पत्रव्यवहार करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेकरीता विद्युत विभागामार्फत दिनांक१३-११-२०१५ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समितीची दिनांक २८-११-२०१५ रोजीचे सभेतील विषय क्र.५० निर्णय क्र.५६८ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे समोर C.A.NO.9219/2014 वरील दि.२६-०९-२०१४ रोजीचे आदेशास अनुसरुन श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे सन २०१५-२०१६ या कालावधीकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत यापुर्वी झालेला निर्णय रद्द करणेत येऊन, सदरहु जनसेटची उत्पादक कंपनी मे.कमिन्स कंपनी यांचेशी पत्र व्यवहार करण्यात यावा असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समितीची दिनांक २८-११-२०१५ रोजीचे सभेतील विषय क्र.५० निर्णय क्र.५६८ अन्वये जनसेटची उत्पादक कंपनी मे.कमिन्स इंडिया लिमिटेड, पुणे यांचेकडून दि१९-०३-२०१६ पर्यंत दरपत्रक सादर करणेकरीता जा.क्र.एसएसएसटी/ विद्युत/ ६५१५/ २०१६ दि.२५-०२-२०१६ अन्वये पत्र पाठविण्यात आलेले होते.

परंतु जनसेटची उत्पादक कंपनी मे.कमिन्स इंडिया लिमिटेड, पुणे यांनी दिनांक२९-०२-२०१६ रोजी पत्र पाठवुन श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टकरीता दरपत्रक सादर करण्याकरीता पाठविण्यात आलेल्या पत्राबाबत आभार मानून मे.कमिन्स इंडिया लिमिटेड, पुणे यांचेमार्फत जनसेट पुरविण्यात आल्यानंतर सदरच्या जनसेटच्या पुढील सर्व्हीसिंगकरीता कंपनीमार्फत अधिकृत सर्व्हीस डिलरची नेमणुक केलेली असून औरंगाबाद, नाशिक व अहमदनगर या एरियाकरीता अधिकृत डिलर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद हे गेले अनेक वर्षापासुन मे.कमिन्स इंडिया लिमिटेड, पुणे यांची अधिकृत सर्व्हीस डिलर असल्याने या एरियातील कंपनीमार्फत पुरविण्यात आलेल्या सर्व जनसेटचे सर्व्हीसिंगचे तसेच मेन्टेनन्सचे काम करत आहे. त्यामुळे सन २०१६ ते मार्च २०१७ करीता श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टबाबत दरपत्रक सादर करणेकरीता मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना कळविलेले असल्याने जनसेटची उत्पादक कंपनी मे.कमिन्स इंडिया लिमिटेड, पुणे यांनी सदरच्या पत्रामध्ये कळविलेले आहे.

त्यानुसार जनसेटची उत्पादक कंपनी मे.कमिन्स इंडिया लिमिटेड, पुणे यांचे अहमदनगर एरियाकरीता मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांचेकडुन दिनांक१८-०३-२०१६ रोजी सिलबंद निविदा (दोन पाकीटापैकी एक पाकीट टेक्नीकल बीडचे तसेच दुसरे पाकीट कमर्शियल बीडचे आहे) व सोबत असलेले पत्र प्राप्त झालेले आहे. सदरच्या पत्रामध्ये मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गासेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांनी मे.कमिन्स इंडिया लिमिटेड, पुणे यांनी कळविल्यानुसार सन एप्रिल२०१६ ते मार्च २०१७ करीता श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टबाबत दरपत्रक सादर करीत असल्याचे कळविलेले आहे.

यापुर्वी मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांना दिनांक०१-१०-२०१४ ते दि.३०-०९-२०१५ या कालावधीकरीता श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा जा.नं.एसएसएस/ विद्युत/ ३१५८/ २०१४ दि.३०-०९-२०१४ अन्वये रक्कम रु. ३३,००,०००/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आला होता. त्यावेळी सर्व्हीस टॅक्स हा १२.५० % होता. परंतु सदरचा सर्व्हीस टॅक्स हा ०१ एप्रिल,२०१६ पासुन १५% इतका होणार असून वॅटमध्येही ०.५% वाढ होणार आहे. त्यामुळे ०१ एप्रिल, २०१६ पासुन जनसेटच्या स्पेअर पार्टचे रेट वाढणार असल्याचे मे.कमिन्स इंडिया लिमिटेड, पुणे यांनी कळविलेले आहे परंतु

उपरोक्तप्रमाणे टॅक्समध्ये तसेच स्पेअर पार्टचे दरामध्ये वाढ होणार असली तरीही आम्ही श्री साईबाबा संस्थानकरीता कमीत कमी दर सादर करत असल्याचे मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस् औरंगाबाद यांनी दिनांक१८-०३-२०१६ रोजी सादर केलेल्या पत्रामध्ये कळविलेले आहे.

त्यानुसार जनसेटची उत्पादक कंपनी मे.कमिन्स इंडिया लिमिटेड, पुणे यांचे अहमदनगर या एरियाकरीता असलेले अधिकृत सर्व्हीस डिलर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस् औरंगाबाद यांचेकडुन दि१८-०३-२०१६ रोजी प्राप्त झालेली सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दराचा खालीलप्रमाणे तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१ | मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद | ३५,३४,३४६.१२ |

**आजचे उपसमिती सभेत मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचे ब्रँच मॅनेजर श्री.किशोर चौधरी हे उपस्थित होते. समितीने त्यांचेबरोबर त्यांनी दिलेल्या दरामध्ये सुट देणेबाबत चर्चा केली असता, मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गासेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांनी खालीलप्रमाणे अंतीम दर देऊ केले.**

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मुळ दर रु. | अंतीम देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद | ३५,३४,३४६.१२ | **३४,४५,९८७/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅंडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेकामी जनसेटची उत्पादन कंपनी मे.कमिन्स इंडिया लिमिटेड, पुणे यांचे अधिकृत सर्व्हीस डिलर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचे रु.३४,४५,९८७/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०४ **Vehicle Mounted hydraulic Extension Ladder With Vehicle खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या ऑनलाईन ई-निविदा (कमर्शियल बीड) उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समितीचे दि.०८-०१-२०१४ चे सभेतील विषय नं.२७ निर्णय क्र.२६ अन्वये तसचे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचीC.A.NO.8707 IN PIL NO.18 OF 2011 अन्वये २५ मीटर उंचीची Vehicle Mounted Hydraulic Extension Ladder with Vehicle खरेदी करणेकरीता बाहेरील ठेकेदार यांचेकडुन ईनिविदा मागवून करणेसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करुन ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ४०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली होती. परंतु सदरची Vehicle Mounted Hydraulic Extension Ladder with Vehicle यामध्ये व्हेईकल व हायड्रॉलीकचा संबंध असल्याने या Vehicle Mounted Hydraulic Extension Ladder with Vehicle ची खरेदी संस्थानच्या वाहन विभागामार्फत होणेकरीता विद्युत विभागाच्या दिनांक२८-१०-२०१४ रोजीच्या मंजुर टिपणी अन्वये सदरचे प्रकरण हे पुढील कार्यवाहीकरिता वाहन विभागाकडे वर्ग करण्यात आलेले होते.

मार्केटमध्ये २५ मीटर उंचीची Vehicle Mounted Hydraulic Extension Ladder with Vehicle लवकर उपलब्ध होत नसल्यामुळे सदरची Ladder ही २५ मीटर ऐवजी २० मीटर उंचीची घेणेबाबतचा प्रस्ताव वाहन विभागामार्फत मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समितीसमोर सादर करण्यात आलेला होता. त्यानुसार मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समितीच्या दिनांक १८-०२-२०१५ चे सभेतील विषय न.२२ निर्णय क्र.५० अन्वये २५ मीटर ऐवजी २० मीटर उंचीची Vehicle Mounted Hydraulic Extension Ladder with Vehicle विहीत पध्दतीने खरेदी करण्यात यावे, असे ठरले. परंतु वाहन विभागामार्फत पुन्हा एकदा Vehicle Mounted Hydraulic Extension Ladder with Vehicle खरेदीच्या पुढील कार्यवाहीकरीता सदरचे प्रकरण दिनांक १९-१२-२०१५ चे पत्रान्वये विद्युत विभागाकडे वर्ग करण्यात आलेले आहे. त्यानुसार २० मीटर उंचीची Vehicle Mounted Hydraulic Extension Ladder with Vehicle खरेदी करणेकरीता ठेकेदार यांचेकडुन ईनिविदा मागवून खरेदी करणेसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करुन ईनिविदा मागविणेकामी मान्यता मिळालेनुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.०९-०२-२०१६ रोजी दै.लोकसत्ता, मुंबई व पुणे दै.इंडियन एक्सप्रेस, मुंबई व पुणे या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती.

त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि११-०२-२०१६ रोजी अपलोड करण्यात आली होती. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.१५-०२-२०१६ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदतदि. २९-०२-२०१६ रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. तसेच प्री-बीड मिटींग दि.२४-०२-२०१६ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी श्री.औटी यांचे उपस्थितीत

ठेवण्यात आलेली होती. प्री-बीड मिटींगला ०२ निविदाधारक हजर होते. ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक लिफाफामध्ये सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी जोडण्यास व दि.०४-०३-२०१६ रोजी सायं.०५.०० या अखेर किंवा त्यापुर्वी (रविवार खेरीज) निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेले तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या मुळप्रती शिर्डी कार्यालयात सादर करणेकामी ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते.

दि.०१-०३-२०१६ रोजी ई-टेंडर सिस्टिममध्ये ई-निविदेची संख्या ई.डी.पी.ई-टेंडरींग विभागामार्फत चेक केली असता ई-टेंडर सिस्टिममध्ये चार ई-निविदा अपलोड केल्याचे आढळून आलेले होते. तसेच दि.०४-०३-२०१६ रोजी पर्यंत शिर्डी कार्यालयात ०४ नग निविदेच्या हार्ड कॉपी प्राप्त झालेल्या होत्या. निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या शिर्डी कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदेच्या ०४ हार्ड कॉपी (बंद पाकीट) व ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या चार निविदाधारकांचे तांक्रि ई-निविदा दि.१८-०३-२०१६ रोजी खरेदी समितीचे सदस्य यांचे समक्ष उघडून निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी मुख्यलेखाधिकारी यांचेमार्फत करण्यात आलेली असून सर्व निविदाधारक तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेले आहेत

Vehicle Mounted Hydraulic Extension Ladder with Vehicle खरेदी करणेकामी निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या शिर्डी कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदेच्या ०४ हार्ड कॉपी (बंद पाकिट) व ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या चार निविदाधारकांचे तांत्रिक ईनिविदा दि.१८-०३-२०१६ रोजी खरेदी समितीचे सदस्य यांचे उपस्थित समक्ष उघडून निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी मुख्यलेखाधिकारी यांचेमार्फत करण्यात आलेली असून सर्व निविदाधारक तांत्रिक निविदामध्ये पात्र झालेले आहे. तरी दि.२९-०२-२०१६ रोजी सायं.०५.०० वा.पावेतो ऑनलाईन ई-निविदा Upload केलेले निविदाधारकाचे ई-निविदा (कमर्शियल बीड) उघडावे लागणार आहे. ई-निविदा Upload केलेले निविदाधारक तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | ई-निविदा Upload केलेले निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.आवटे फॅब्रीकेटर्स ॲण्ड ऑटोमोबाईल वर्क्स, पुणे. |
| ०२) | मे.हायटेक सर्व्हिसेस, चिखली, पुणे. |
| ०३) | मे.मनियार ॲण्ड कंपनी, अहमदाबाद. |
| ०४) | मे.वेस्टर्न एनव्हायरो टेक प्रा.लि., अहमदाबाद |

उपरोक्तप्रमाणे Vehicle Mounted Hydraulic Extension Ladder with Vehicle खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या ०४ ऑनलाईन ई-निविदा (कमर्शियल बीड) आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नाव** | **निविदेमधील मुळ दर रु.** |
|---|---|---|
| १ | मे.मनियार ॲण्ड कंपनी, अहमदाबाद. | ४४,००,०००/- |
| २ | मे.आवटे फॅब्रीकेटर्स ॲण्ड ऑटोमोबाईल वर्क्स, पुणे | **३४,००,०००/-** |
| ३ | मे.हायटेक सर्व्हिसेस, चिखली, पुणे | ४०,९६,०००/- |
| ४ | मे.वेस्टर्न एनव्हायरो टेक प्रा.लि., अहमदाबाद | ४२,८०,०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, Vehicle Mounted hydraulic Extension Ladder With Vehicle खरेदी करणेकामी मे.आवटे फॅब्रीकेटर्स ॲण्ड ऑटोमोबाईल वर्क्स, पुणे यांचे रु३४,००,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०५ **मा.कार्यकारी अधिकारी निवासस्थानच्या आतील परिसरात नविन लॉन बसविणेकामी प्राप्त झालेले दरपत्रक उघडणेस मंजूरी मिळणेबाबत.**

दि.16/02/2016 रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्रं. 69 व निर्णय क्रं.144 अन्वये, मा. कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानच्या आतील परिसरात नविन लॉन बसविणेकामी कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.1,58,000/- (एक लाख अठावन्न हजार) मात्र खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

त्यानुसार मा.कार्यकारी अधिकारी निवासस्थानच्या आतील परिसरात नविन लॉन बसविणेबाबत जनसंपर्क विभागामार्फत दि.15/05/2016 रोजी वर्तमान पत्रात शासकिय दराने जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. कोरे निवीदा अर्ज विक्री दि.20/05/2016 रोजी संपलेली असुन एकुण3 निवीदांची विक्री झालेली आहे. तसेच सिलबंद निवीदा सादर करावयाची मुदत दि.21/05/2016 अखेर संपलेली असुन अद्याप एकुण03 निवीदा प्राप्त झालेल्या आहे.

प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | पार्टीचे नाव | आवक नंबर/दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | साई लॅण्डस्केप ॲण्ड गार्डन डेव्हलोपर्स, नांदुर्खी(शिर्डी) | 2858 - दि. 18/05/2016 | बंद लिफाफा |
| 2 | माऊली नर्सरी, अस्तगांव | 2884 - दि. 18/05/2016 | बंद लिफाफा |
| 3 | साई छत्र नर्सरी, अस्तगांव | 2966 - दि. 19/05/2016 | बंद लिफाफा |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले 03 दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | पार्टीचे नाव | दरपत्रकामधील मुळदर रु. |
|---|---|---|
| 1 | माऊली नर्सरी, अस्तगांव | १,८०,७५०/- |
| 2 | साई छत्र नर्सरी, अस्तगांव | २,१३,४५०/- |
| 3 | साई लॅण्डस्केप ॲण्ड गार्डन डेव्हलोपर्स, नांदुर्खी(शिर्डी) | **१,५४,४५०/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.कार्यकारी अधिकारी निवासस्थानच्या आतील परिसरात नविन लॉन बसविणेकामी साई लॅण्डस्केप ॲण्ड गार्डन डेव्हलोपर्स, नांदुर्खी (शिर्डी) यांचे रु.१,५४,४५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, पावसाळा सुरु झाल्यानंतर त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

०६ **फुटाणे प्रसाद, विडयाची पाने, पावडर मुर्ती खरेदी करणेकामी प्राप्त झालेले बंद निविदा उघडणे व न्युनतम दर निश्चीत करणेबाबत.**

मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२९.०२.२०१६ निर्णय क्र.१९३ नुसार माहे-एप्रिल-२०१६ ते माहे मार्च-२०१६ अखेर या आर्थिक वर्षामध्ये फुटाणे, विडयाची पाने, पावडर मार्बल मुर्ती खरेदी करणेसाठी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३,३९,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली. मंदिर विभागाचे दि.२३ मार्च २०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात देऊन बंद पाकिटात निविदा (दरपत्रके) मागविणेत आलेल्या आहेत. निविदा सादर करणेसाठी जाहिरातीमध्ये दि.१०.०५.२०१६ अशी अंतिम तारीख नमुद करणेत आलेली होती त्यानुसार खालील प्रमाणे निविदा (दरपत्रके) जमा झालेल्या आहे.

अ) फुटाणे प्रसाद कोटेशन

| अ.क्र. | निविदाधारकाची नावे व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | गंगावाल ए.एस, शिर्डी | २२२७ दि.०६/०५/२०१६ |
| ०२ | मे.सचिन जनरल स्टोअर्स, शिर्डी | २२२८ दि.०६/०५/२०१६ |
| ०३ | श्री.दिपक अशोक झाल्टे , शिर्डी | २३२६ दि.०७/०५/२०१६ |
| ०४ | ईश्वर आधार साटोटो , कोपरगांव | २२८८ दि.०७/०५/२०१६ |

ब) विडयाची पानांचे कोटेशन –

| अ.क्र. | निविदाधारकाची नावे व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | श्री.दिपक देवराम आहेर, शिर्डी | २३८३ दि.०९/०५/२०१६ |
| ०२ | श्री.साईनाथ वामन पवार, शिर्डी | २३८४ दि.०९/०५/२०१६ |
| ०३ | श्री.संजय नामदेव अडांगळे, शिर्डी | २३८५ दि.०९/०५/२०१६ |

क) पावडर मार्बल मुर्तीचे कोटेशन-

| अ.क्र. | निविदाधारकाची नावे व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | श्री.विरेश जैस्वाल, शिर्डी | २४१३ दि.१०/०५/२०१६ |
| ०२ | मे.साईकृष्णा आर्टस, शिर्डी | २४१४ दि.१०/०५/२०१६ |

उपरोक्तप्रमाणे पावडर मार्बल मुर्ती खरेदीकामी फक्त ०२ कोटेशन्स प्राप्त झालेले असल्यामुळे ते वगळता फुटाणे प्रसादसाठीचे ०४ कोटेशन्स, विडयाच्या पानांसाठीचे ०३ कोटेशन्स आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशन्सधारकांसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळदरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

(अ) फुटाणे प्रसादासाठी प्राप्त झालेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता-

| अ.क्र. | कोटेशनधारकाचे नाव व पत्ता | कोटेशनमधील मुळदर प्रती किलो रु. |
|---|---|---|
| ०१ | गंगावाल ए.एस, शिर्डी | ७०/- |
| ०२ | ईश्वर आधार साटोटो, कोपरगांव | ७५/- |
| ०३ | मे.सचिन जनरल स्टोअर्स, शिर्डी | ७२/- |
| ०४ | श्री.दिपक अशोक झाल्टे, शिर्डी | **२५/-** |

(ब) विडयाची पाने खरेदीकामी प्राप्त झालेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता-

| अ.क्र. | कोटेशनधारकाचे नाव व पत्ता | कोटेशनमधील मुळदर प्रती शेकडा रु. |
|---|---|---|
| ०१ | श्री.दिपक देवराम आहेर, शिर्डी | **७०/-** |
| ०२ | श्री.संजय नामदेव अडांगळे, शिर्डी | ९०/- |
| ०३ | श्री.साईनाथ वामन पवार, शिर्डी | ८०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर विभागासाठी आवश्यक असणारे फुटाणे प्रसाद खरेदीकामी श्री.दिपक अशोक झाल्टे, शिर्डी यांचे प्रती किलो रु.२५/- मात्र व विडयाची पाने खरेदीकामी श्री.दिपक देवराम आहेर, शिर्डी यांचे प्रती शेकडा रु.७०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच पावडर मुर्ती खरेदी करणेकामी स्थानिक पुरवठाधारकांकडूनफेर कोटेशन मागविण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

०७ **सन 2016-17 करीता किराणा माल व इतर अनुषंगीक साहित्य खरेदी कामीचे कमर्शिअल बीड उघडणेबाबत.**

संस्थानचे प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मिती व मंदिर विभागासाठी सन २०१६-१७ (एप्रिल-२०१६ ते मार्च-२०१७) करीता आवश्यक किराणामाल व त्या अनुषंगिक इतर माल (पेपर पिशवी, दुध पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर इ.) खरेदीकामी रु.४९,६०,००,०००/- तसेच भाजीपाला खरेदीकामी रु.३,००,००,०००/- अशा एकुण रु.५२,६०,००,०००/- (रुपये बावन्न कोटी साठ लाख मात्र) चे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दिनांक ०२.०२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २२ अन्वये मान्यता मिळालेली आहे. तसेच सदरचे खर्चास मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांची सिव्हिल ॲप्लिकेशन नं३४८९/२०१६ अन्वये दिनांक ०४.०४.२०१६ रोजी मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सन २०१६-१७ सालासाठी किराणामाल व इतर अनुषंगिक साहित्य खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रिया दिनांक २१.०४.२०१६ ते १२.०५.२०१६ या कालावधीत राबविण्यात आलेली आहे. सदर निविदा प्रक्रियेमध्ये एकूण ३७ निविदाधारकांनी निविदा सादर केलेल्या होत्या. त्यांच्या तांत्रिक निविदा दिनांक १८.०५.२०१६ रोजी उघडण्यात आलेल्या आहेत. यामध्ये खालील ३३ निविदाधारक पात्र ठरले होते.

१. मे.संदिप ट्रेडींग कंपनी, नांदेड
२. मे.पुष्कर ट्रेडर्स, शिर्डी
३. मे.महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कंन्झुमर फेडरेशन, पुणे
४. मे.धर्मपाल सत्यपाल लि., नोएडा
५. मे.जे.बी.ट्रेडर्स, पुणे
६. मे.विशाल प्लॅस्टिक्स, कोल्हापुर
७. मे.रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशिक
८. मे.गुप्ता एंटरप्रायजेस, पुणे
९. मे.कैलाश ट्रेडींग कंपनी, नांदेड
१०. मे.शांती स्पायसेस प्रा.लि., जळगांव
११. मे.श्री स्वामी समर्थ डिस्ट्रिब्युटर्स, तिसगांव
१२. मे.महेश सप्लायर्स, कोपरगांव
१३. मे.भारत राईस ॲण्ड ऑईल मिल्स, हैद्राबाद
१४. मे.सुयोग नेचर केअर, जयपुर
१५. मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया ॲण्ड कंपनी, नांदेड
१६. मे.हरिओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रिज, कोल्हापुर
१७. मे.साई ॲग्रो इंडस्ट्रि, टाकळी
१८. मे.श्री गणेश ड्राय फ्रुट्स, पुणे
१९. मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक
२०. मे.आर.मुथा राईस हाऊस, औरंगाबाद
२१. मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव
२२. मे.साहिल ट्रेडींग कंपनी, नांदेड
२३. मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पादक संघ मर्या., कोपरगांव
२४. मे.एस.आर.थोरात मिल्क्स प्रा.लि., संगमनेर
२५. मे.ओम साई कॅश्यू इंडस्ट्रिज, खेड, सातारा
२६. मे.स्टॅण्डर्ड एंटरप्रायजेस, अहमदनगर
२७. मे.लेक सिटी ड्राय फ्रुट्स, पुणे
२८. मे.श्री चिंतामणी इंडस्ट्रिज, औरंगाबाद
२९. मे.सत्यम एंटरप्रायजेस, दमण

३०. मे.सुनिल ट्रेडर्स, धुळे

३१. मे.उशा ॲग्रोटेक, पारनेर

३२. मे.खुशी एजन्सीज, नाशिक

३३. मे.नोबेल मार्केटिंग, दिल्ली

उपरोक्त ३३ पात्र निविदाधारकांनी सादर केलेले किराणा मालाचे नमुने दिनांक २४.०५.२०१६ रोजी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील तज्ञ व संस्थानचे प्रसादालयातील दोन आचारी अशा तज्ञांकडून निवडून घेण्यात आले आहेत. त्याबाबतचा तज्ञांनी सादर केलेला **बंद पाकिटामधील अहवाल आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामध्ये कोणत्या मालासाठी कोणाचे नमुन्यांची निवड झालेली आहे. याबाबतची यादी उपस्थित निविदाधारकांना वाचून दाखविणेत आली. त्यानंतर सर्वांसमक्ष ई-निविदा उघडणेत आल्या.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तप्रमाणे पात्र निविदाधारकांच्या उघडण्यात आलेल्या ई-निविदांमधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन, निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेसाठी मा.त्रीसदस्य समितीची चक्रिय पध्दतीने तातडीने मान्यता घेण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक खरेदी विभाग)

--------------------------------------------------------------------------------

०८ **सन 2016-17 करीता गायीचे गावरान तुप खरेदी कामीचे कमर्शिअल बीड उघडणेबाबत.**

संस्थानचे लाडू निर्मिती व मंदिर विभागासाठी सन २०१६-१७ (एप्रिल-२०१६ ते मार्च-२०१७) करीता आवश्यक गावरान तूप खरेदीकामी रु.३५,७०,००,०००/- (रुपये पसतीस कोटी सत्तर लाख मात्र) चे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दिनांक ०२.०२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २० अन्वये मान्यता मिळालेली आहे. तसेच सदरचे खर्चास मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची सिव्हिल ॲप्लिकेशन नं३४९०/२०१६ अन्वये दिनांक ३१.०३.२०१६ रोजी मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सन २०१६-१७ सालासाठी गाईचे गावरान तूप खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. सदर निविदा प्रक्रिया दिनांक २१.०४.२०१६ ते दिनांक १२.०५.२०१६ या कालावधीत राबविण्यात आली आहे. सदर निविदा प्रक्रियेमध्ये एकूण ०६ निविदाधारकांनी निविदा सादर केलेल्या होत्या. त्यांच्या तांत्रिक निविदा दिनांक १८.०५.२०१६ रोजी उघडण्यात आलेल्या आहेत. यामध्ये खालील ०५ निविदाधारक पात्र ठरले आहेत.

१. मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फलटण

२. मे.एस.आर.थोरात मिल्क प्रॉडक्ट्स प्रा.लि., संगमनेर

३. मे.इंदापुर डेअरी ॲण्डमिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी

४. मे.व्ही एस पी कॉर्पोरेशन, उमरगांव, वलसाड (गुजरात)

५. मे.कोल्हापुर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापुर

मे.अजंता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांनी संस्थानला सन २०१४-१५ मध्ये मॉईश्चरयुक्त तूपाचा पुरवठा केला होता. त्यामुळे त्यांचेकडून तूप घेणे बंदकेले होते. तसेच त्यांचे व्हेंडर ऑडीटही करण्यात आले होते. संस्थानच्या विविध अधिका-यांनीही मे.अजंता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांचे प्लॅन्टला भेटी दिल्या होत्या. त्यांचेही अहवाल संस्थानला त्यांचेकडून तूप खरेदी करण्यासाठी सकारात्मक नव्हते. या सर्व बाबी व सदर निविदेतील अट व शर्त क्र.२ चा विचार करता मे.अजंता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली आहे. उर्वरीत पाच निविदाधारकांचे नमुने कोडींग करुन लॅब तपासणीसाठी पाठविण्यात आलेले आहेत.

गावरान तूप खरेदीकामी ०५ पात्र निविदाधारकांचे कमर्शियल बीड आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मुळ दर प्रती क्विंटल रु. |
|---|---|---|
| १ | एस.आर. थोरात मिल्क प्रोडक्टस्, प्रा. लि., | ३६,६६७/- |
| २ | गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रोडक्टस्, प्रा. लि., | ३५,४००/- |
| ३ | इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रोडक्टस् लि., | ३७,९८०/- |
| ४ | कोल्हापुर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ लि., कोल्हापुर | ४५,७००/- |
| ५ | व्ही.एस.पी. कार्पोरेशन | ३७,९४९/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन 2016-17 करीता संस्थानसाठी गायीचे गावरान तुप खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रोडक्टस्, प्रा. लि. यांचे प्रती क्विंटल रु.३५,४००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.**

**तसेच उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे मे.अजंता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांचा पुढील ०३ वर्षासाठी काळया यादीत समावेश करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

--------------------------------------------------------------------------------

०९ **श्री साईबाबा रुग्णालयातील विविध ऑपरेशन थिएटर या विभागाकरीता S.S.Tray आणि S.S. Bowl खरेदी करणेसाठी प्राप्त कोटेशन उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील विविध ऑपरेशन थिएटर या विभागाने S.S.Tray without Lid आणि S.S.Bowl हे खराब झालेले आहे. त्यामुळे नवीन S.S.Tray without Lid आणि S.S.Bowl ची मागणी केलेली आहे.

**त्याचा तपशिल खालीलप्रमाणे:-**

| अ.नं. | विभागाचे नाव | S.S.Tray without Lid | | S.S.Bowl | | | मागणी पत्रकाची दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 8"x10" | 10"x12" | Small | Medium | Big | |
| 1 | Cathlab | 25 | | 25 | | | दि.१२/०५/२०१५ (औषध भांडार प्राप्त दि. १२/०५/२०१५) |
| 2 | Neuro O.T./ ICU | 10 | 10 | 10 | 5 | 5 | दि.०४/०८/२०१५ (औषध भांडार प्राप्त दि. ११/०५/२०१५) |
| 3 | CVTS O.T.-1 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | दि.१२/०५/२०१५ (औषध भांडार प्राप्त दि. १२/०५/२०१५) |
| | **एकूण** | 45 | 20 | 45 | 15 | 15 | |

सदर S.S.Tray without Lid आणि S.S.Bowl खरेदीकामी M/s. Kaivalyam Medical, Shrirampur यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते, त्यांचे दरपत्रकानुसार सदर S.S.Tray without Lid आणि S.S.Bowl खरेदीकामी अंदाजे रु.४६,५५०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**त्याचा तपशिल खालील प्रमाणे:-**

| Sr. No. | Decription | Qty | Rate per in Rs. | Total Amt in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | **S.S.Tray without Lid** | | | |
| | 8"x10" | 45 | 580.00 | 26100.00 |
| | 10"x12" | 20 | 760.00 | 15200.00 |
| **2** | **S.S.Bowl** | | | |
| | Small | 45 | 70.00 | 3150.00 |
| | Medium | 15 | 70.00 | 1050.00 |
| | Big | 15 | 70.00 | 1050.00 |
| | | | **Total Amt in Rs.** | **46550.00** |

**मागणी:-** उपरोक्त प्रास्ताविकमध्ये दर्शविल्याप्रमाणे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** श्री साईबाबा रुग्णालयातील विविध ऑपरेशन थिएटर या विभागाकरिता S.S.Tray without Lid आणि S.S.Bowl हे खराब झालेले आहे. त्यामुळे नवीन S.S.Tray without Lid आणि S.S.Bowl ची मागणी केलेली आहे. सदर Instrument ची विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी उपरोक्त S.S.Tray without Lid आणि S.S.Bowl खरेदी विहीत पद्धतीने कोटेशन मागवून करणेस व याकामी येणा-या रु.४६,५५०/- (अक्षरी रुपये– शेहेचाळीस हजार पाचशे पंचावण्ण मात्र) इतक्या खर्चास मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यात आला होता.

त्यानुसार, दि. २७/१०/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत उपरोक्त S.S.Tray without Lid आणि S.S.Bowl हे विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रु. ४६,५५०/- (अक्षरी रुपये– शेहेचाळीस हजार पाचशे पंचावण्ण मात्र) इतक्या खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार इकडील पत्र क्र.२४७६, दि.०९/१२/२०१५ अन्वये एकूण ०५ अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि३०/१२/२०१५ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यानुसार ०५ सिलबंद कोटेशन उशिराने प्राप्त झाले आहेत व मे.पोर्णिमा सर्जिकल एन्टरप्राजेस, नाशिक यांचे दि.०२/०१/२०१६ रोजीचे ई– मेलव्दारे कोटेशन उशिराने प्राप्त झाले आहे. त्यास अनुसरुन खालील प्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

**त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-**

| Sr. no. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Lodha Distributors, Baramati | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२०/०१/२०१५ (उशिराने प्राप्त) |
| 2 | M/s. Kaivalyam Medical, Shrirampur | ०२ सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२०/०१/२०१५ (उशिराने प्राप्त) |
| 3 | M/s. Krishana Enterprises, Shrirampur | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२१/०१/२०१५ (उशिराने प्राप्त) |
| 4 | M/s. Austin Healthcare, Pune | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२०/०१/२०१५ (उशिराने प्राप्त) |
| 5 | M/s. Sachin Sales Agency, Pune | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२०/०१/२०१५ (उशिराने प्राप्त) |
| 6 | M/s. Purnima Surgical, Nashik | ई– मेलव्दारे प्राप्त दि.०२/०१/२०१५ (उशिराने प्राप्त) |

उपरोक्त S.S.Tray without Lid आणि S.S.Bowl खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या कोटेशन हे मुदतीनंतर प्राप्त झालेले असून परंतु प्राप्त झालेल्या कोटेशनचा तुलनात्मक तक्ता तयार करण्याच्या दृष्टीने फायदा होऊ शकेल असे नम्र मत आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०५ सिलबंद कोटेशन्स आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sr. No. | Name of Tenderer | Qty. | Make/ Model | Rate per nos in Rs. |
|---|---|---|---|---|
| **1** | **S.S. Tray without Lid, 8"x10"** | **45** | | |
| | M/s. Lodha Distributors, Baramati | | | 1275/- |
| | M/s. Kaivalyam Medical, Shrirampur | | Salem steel no.304 heavy | 1170/- (1 year warranty) |
| | | | AMSCO | 900/- |
| | M/s. Krishana Enterprises, Shrirampur | | EMCO | 1100/- |
| | M/s. Austin Healthcare, Pune | | | 1175/- |
| | M/s. Sachin Sales Agency, Pune | | | 1250/- |
| | M/s. Purnima Surgical, Nashik | | | 700/- |
| **2** | **S.S. Tray without Lid, 10"x12"** | **20** | | |
| | M/s. Lodha Distributors, Baramati | | | 1560/- |
| | M/s. Kaivalyam Medical, Shrirampur | | Salem steel no.304 heavy | 1242/- (1 year warranty) |
| | | | AMSCO | 900/- |
| | M/s. Krishana Enterprises, Shrirampur | | EMCO | 1300/- |
| | M/s. Austin Healthcare, Pune | | | 1365/- |
| | M/s. Sachin Sales Agency, Pune | | | 1565/- |
| | M/s. Purnima Surgical, Nashik | | | **850/-** |
| **3** | **S.S. Bowl, Small, 3"** | **45** | | |
| | M/s. Lodha Distributors, Baramati | | | 225/- |
| | M/s. Kaivalyam Medical, Shrirampur | | | **80/-** |
| | M/s. Krishana Enterprises, Shrirampur | | | --- |
| | M/s. Austin Healthcare, Pune | | | 145/- |
| | M/s. Sachin Sales Agency, Pune | | | 200/- |
| | M/s. Purnima Surgical, Nashik | | | **80/-** |
| **4** | **S.S. Bowl, Mediam, 4"** | **15** | | |
| | M/s. Lodha Distributors, Baramati | | | 230/- |
| | M/s. Kaivalyam Medical, Shrirampur | | | 100/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | M/s. Krishana Enterprises, Shrirampur | | | --- |
| | M/s. Austin Healthcare, Pune | | | 170/- |
| | M/s. Sachin Sales Agency, Pune | | | 225/- |
| | M/s. Purnima Surgical, Nashik | | | **95/-** |
| **5** | **S.S. Bowl, Big, 6"** | **15** | | |
| | M/s. Lodha Distributors, Baramati | | | 315/- |
| | M/s. Kaivalyam Medical, Shrirampur | | | **120/-** |
| | M/s. Krishana Enterprises, Shrirampur | | | --- |
| | M/s. Austin Healthcare, Pune | | | 230/- |
| | M/s. Sachin Sales Agency, Pune | | | 300/- |
| | M/s. Purnima Surgical, Nashik | | | 190/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील विविध ऑपरेशन थिएटर या विभागाकरीता S.S.Tray आणि S.S. Bowl खरेदी करणेसाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत यावेत. तसेच ज्या साहित्यासाठी समान निम्नतम दर आलेले आहेत, त्यांना समप्रमाणात विभागुन पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.०३** **श्री साईबाबा संस्थानचे साईटेक प्रकल्पासाठी ISO, Security, IT Service Management System, Website Quality, Bio-metric Device Testing, software & system Etc., बाबत केंद्र शासनाचे STQC (Standardisation Testingn and Quality Certification) पुणे कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अहवालाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:** कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे
**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव:** ०१) दिनांक ०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७९९. ०२) दिनांक १२/०४/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२८३.

**प्रास्ताविक:** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७९९ नुसार साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. साईटेक प्रकल्पाची व्याप्ती पाहता प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेले हार्डवेअर, नेटवर्क व कार्यप्रणाली इत्यादी सर्व तांत्रिक, आर्थिक बाबींचे तसेच साईटेक प्रकल्प कार्यान्वीत करणेसाठी आवश्यक असलेल्या सुरक्षाविषयक बाबींचेही सखोल परिक्षण होणे गरजेचे असल्याने साईटेक प्रकल्पाचे फेर Third Party Audit हे केंद्र शासनाचे अधिकृत एजन्सी Standardisation Testing and Quality Certification (STQC) मार्फत होणेस तसेच संबधीत एजन्सी मार्फत साईटेक प्रकल्पासाठी दि ०६/११/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीतील Certification मिळणेकामी दि. १३/०४/२०१५ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये दि.२४/०८/२०१५ ते दि.२५/०८/२०१५ या कालावधीत समक्ष पुणे येथील STQC कार्यालयात भेट देऊन प्रकल्पातील कार्यान्वीत करण्यात आलेल्या सर्व बाबींवर STQC पुणे कार्यालयाचे संचालक श्री केमुरारी सो., श्री अमरसिंग भिसारे, श्री अजय निकाळे व श्री मिलींद अर्जुन, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधी समवेत सविस्तर चर्चा करण्यात आली असुन सदर मिटींगचे इतिवृत्त STQC पुणे कार्यालयाकडुन दि२४ व २५/०८/२०१५ रोजी अन्वये प्राप्त झालेले आहे.

त्यानुसार STQC पुणे कार्यालयाची टिम साईटेक प्रकल्पाची पाहणी करुन संस्थानला विषयांकीत कामी प्रस्ताव देणार असल्याचे त्यांनी चर्चेअंती सांगीतले होते त्यास अनुसरुन केंद्र शासनाने अधिकृत केलेल्या STQC एजन्सी यांचे प्रतिनिधी साईटेक प्रकल्पाचे Certification, Inspection and Complete Audit of IT Department and Saitech Project करणेकामी शिरडी येथे प्राथमिक स्वरुपात दि.२३/१२/२०१५ ते दि.२४/१२/२०१५ या कालावधीत भेट देणेकामी आले असुन याकामी त्यांचे निवास, जेवण, दर्शन/आरती व्यवस्था विनामुल्य करणेस व तसेच त्यांचे प्रवास खर्चास दि ०६/११/२०१५ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे.

केंद्र शासनाचे STQC कार्यालयाचे प्रतिनिधींनी साईटेक प्रकल्पाची व त्यात श्री साईभक्तांसाठी कार्यरत असलेल्या कार्यप्रणाली तसेच DC, DR व इतर सर्व सेवा सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली असुन सदर पाहणीअंती त्यांनी खालील मुद्दे त्यांचे दि ०८/०३/२०१६ रोजीचे अहवालामध्ये नमुद केले आहे.

**The STQC team has observed the following:**

1. The team visited DC and DR site of SAITECH Project, various users departments of the Sansthan.

2. The project is quite ambitious, big and prestigious. It is a great help in serving the devotees. The project is making life simple of devotees and the employees of the Sansthan as well. It is a helping in reducing the pressure and burden of the employees of the Sansthan.
3. The project have cover all most all the department of Sai Sansthan.
   Total 37 number of application have been developed and made Live except 4 modules.
4. Data Centre (DC) and Data recovery (DR) centers have been setup but both are very nearby 5-6 km apart. According to requirements these should be distant in other cities or region so that at least one can be safe from some natural calamities/or disruption.
5. In some of the departments Quality management System (QMS) have been already implemented and they have been certified as per ISO 9001.
6. M/s Cognizant is the current System Integrator (SI) partner of the Sansthan providing IT Infrastructure, support and maintenance to the Sansthan. The contract between the Sansthan and M/cognizant is expiring in the month of April 2017.
7. The IT department of the Sansthan has very few permanent people to look after the SaiTech Project.Mainly the project is being run by SI i.e.M/s Cognizant.
8. IT Department of the Sansthan had already approached all the empanelled vendors of Govt, of MH (Government Resolution No: GAD- ????? 080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH) Mantralaya, Mumbai-400032 Date: 01/07/2014) to get the consultancy for tendering process and vendor finalization and transfer of the project to next SI.
9. In some of the Departments of the Sansthan users are not comfortable with computers and use of software modules. They is using conventional/Manual procedures. Training of computers and application software will improve the usability. The problems in the application software may be resolve with SI partner.

तसेच केंद्र शासनाने अधिकृत केलेल्या Standardisation Testing and Quality Certification (STQC) एजन्सी यांचे प्रतिनिधीनी साईटेक प्रकल्पाबाबत त्यांचे अहवालामध्ये पुढीलप्रमाणे मुद्याबाबत शिफारस केलेली आहे.

**Recommendation from STQC:-**

**A**. M/s Cognizant is the current System Integrator (SI) partner providing the IT support, maintenance and IT infrastructure. The contract between the Sansthan and M/cognizant is expiring at the end of April 2017. In view of this Sansthan has to start immediate process i.e. to prepare a draft of RFP, Bid formulation, Attending pre-bid and preparing response to pre bid queries, Technical Bid Evaluation Report, transition of data, the source code, documentation, Contracting Process of inviting Tenders for the selection of SI Partner post April 2017 onwards. The Sansthan may appoint consultant/firm for this work if need so.The Sansthan may avail services of Consultant implemented by Maharashtra Govt.

**B.** In case of Change of SI, smooth transfer of project requires approx. 3-4 months, according to the current project scope, for Knowledge transfer from previous SI i.e. M/cognizant. Immediate action is required for smooth continuation of the project.

**C**. The one by one elaboration of service of STQC requested by the Sansthan is as follows:

**i. ISO 9001 Quality Management Certification:** The IT Department may go for ISO 9001 certification but ISO 27001 Certification will cover all the management requirements. Some Departments have been already certified as per ISO 9001 and Quality Management System (QMS) has been implemented. More training may be provided to create work environment and awareness about QMS in the organization.

**ii. ISO 27001 Information Security Management System (ISMS)**

Certification: The IT Department of the Santhan may apply for ISO 27001 ISMS Certification to STQC. This certification requires adequate qualified man power and resourses for smooth implementation. It needs commitment from the Top management. It has various stages for implementation, documentation and certification. IT Department of the Sansthan

may take lead in this regard. It is suggested that this activity may be clubbed with the new tender process and assigned to the next SI to get software security certification from STQC certification services.

**iii. ISO 20001 IT Service Management System Certification:** Presentably STQC is under process to obtain the necessary approvals and certification/accreditation to carry out ISO 20001 certification. It is suggested that this activity may be clubbed with the new tender process and assigned to the next SI to get the certification from qualified certifier. The IT department of the Sansthan may initiate suitable action.

**iv. Website Quality Certification:** The award of the mark "Certified Quality Website (CQW)" is recognition that the website complies with the requirements of Guideline for Indian Government Website(GIGW) and the organization has adequate procedures and processes in place to provide reliable and dependable information and service through their website. It requires submitting the details of the website along with the SRS.We do undertake the functional testing, load testing of the application software. It is suggested that this activity may be clubbed with the new tender process and assigned to the next SI to get third party certification from STQC fro software modules, since the contract of the present SI is getting over.The quotationon for activity can be provided after analyzing SRS and function if so desired.

**v. Bio-metric Device Testing and Certification:** There are vendors who have got STQC approval for their Bio-metric Devices. These devices may be purchased from them. Also you may request the supplier to get STQC approval of their products. Approved supplier list is available on STQC website (www.stqc.gov.in)

**vi. Software and System Certification** (being used by Cognizant)

**a. System and Software Audits:** Audit of processes and system can be done as per international standards/ Best practices. Since contract period with present SI is remaining less, therefore this activity is not feasible/necessary at this stage. Even through the Sansthan wishes to carryout Software and System Certification of M/cognizant than necessary permission, authorization and details should be given to STQC by cognizant. It is suggested that this activity may be clubbed with the new tender process and carried out for next SI by STQC, since the contract of the present SI is getting over soon. The quotation for this activity can be provided after analyzing the details requirements if so requested.

**b. IT Infrastructure Audit:** Audit of critical IT Infrastructure deployed at Data Center, Disaster Recovery Site, Network, Gateway, Front-Offices and Back Office locations is undertaken to verify that they are in compliance to Bill-of-Material and defined architecture. The audit also covers operationalization aspects of IT infrastructure. If the Sansthan wish to carry out the IT infrastructure audit necessary details may be provided to STQC so that the proposal may be worked out and provided.

**vii. Software Process Assessment & 08. Information Security Testing and Assessment**

STQC services do undertake the functional testing, load testing and security testing of the application software. It is suggested that this activity may be clubbed with the new tender process and assigned to the next SI to get third party certification from STQC for testing of software modules, since the contract of the present SI is getting over soon, the quotation for this activity can be provided after analyzing SRS and functions of the application software.

तरी, उपरोक्त केंद्र शासनाने अधिकृत केलेल्या Standardisation Testing and Quality Certification (STQC) एजन्सी यांचे प्रतिनिधींनी साईटेक प्रकल्पाचे पाहणीअंती नमुद केलेल्या मुद्यांची व त्यांनी शिफारशीव्दारे सुचविलेल्या मुद्यांची नोंद घेणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

**मागणी:** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे केंद्र शासनाने अधिकृत केलेल्या Standardisation Testing and Quality Certification (STQC) एजन्सी यांचे प्रतिनिधींनी साईटेक प्रकल्पाचे पाहणीअंती नमुद केलेल्या मुद्यांची व त्यांनी शिफारशीव्दारे सुचविलेल्या मुद्यांची नोंद घेणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:** प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे केंद्र शासनाने अधिकृत केलेल्या Standardisation Testing and Quality Certification (STQC) एजन्सी यांचे प्रतिनिधींनी साईटेक प्रकल्पाचे पाहणीअंती नमुद केलेल्या मुद्यांची व त्यांनी शिफारशीव्दारे सुचविलेल्या मुद्यांची नोंद घेणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.३२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे साईटेक प्रकल्पासाठी ISO, Security, IT Service Management System, Website Quality, Bio-metric Device Testing, software & system Etc., बाबत केद्र शासनाचे STQC (Standardisation Testingn and Quality Certification) पुणे कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अहवालाची नोंद घेण्यात येऊन, त्यामधील शिफारशींची अंमलबजावणी करणेसाठी कार्यवाही सुरु करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४** **मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल निविदा प्रक्रिया शासनाचे अधिकृत कन्सल्टंसी कंपनीकडून अंतीम करणेकामी, प्रत्यक्ष सादरीकरणानंतर संबंधीत कंपन्यांनी सदरकामी सादर केलेले कोटेशन उघडणेस तसेच याकामी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्धकरुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:** 1) मा. व्यवस्थापन समितीचे दि. 09/10/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 912. 2) मा. व्यवस्थापन समितीचे दि. 08/10/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 329.

**प्रास्ताविक:** साईटेक प्रकल्प कार्यान्वीत करणेकामी करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा कालावधी माहे एप्रिल२०१७ मध्ये संपुष्टातयेणार आहे. साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली व अनुषंगिक बाबींची पुढील काळासाठी दुरुस्तीव देखभाल करणेकामी नविन कंपनीची नेमणुक करण्यासाठीची प्रक्रिया संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार इकडील विभागाकडून सुरु करण्यात आलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३२९ नुसार साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल निविदा प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागाचे अध्यादेशातील अधिकृत कन्सल्टंसी कंपनीकडुन अंतिम करणेस मान्यता देण्यात आलेली आहे परंतु, सदरहु काम प्रस्तावात नमुद केलेल्या एकाच कंपनीकडुन का करावयाचे याबाबत महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रसंचनालयाचा अभिप्राय घेण्यात यावा, असे ठरले.

त्यानुसार महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागास दि ३०/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले होते. महाराष्ट्र शासनाचे मा. प्रधान सचिव सो., माहिती तंत्रसंचनालय विभाग, यांनी सदरकामी दि. ०३/०१/२०१६ रोजीचे ई-मेलमध्ये पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहे. Detailed SOW need to be vetted before the process of engagement of consultant begins. मा.प्रधान सचिव सो., यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रकल्पाचा Scope of Work व Scope of Work for Consultant चा मसुदा महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागांचेप्रतिनिधींना ई-मेलव्दारे पाठवुन त्यांचेकडुन दि २९/०१/२०१६ रोजीचे ई-मेलव्दारे तपासुन घेण्यात आलेला असुन सदरScope of Work व Scope of Work for Consultant चा मसुदा सर्व संबधीत अधिकृत कंन्सल्टंसी एजन्सी व शासनाचे संबधित प्रतिनिधींना दि ०१/०३/२०१६ रोजीचे ई मेलव्दारे पाठविण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल निविदा प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागाचे संदर्भ क्रं ०१ चे अध्यादेशातील अधिकृत कंन्सल्टंसी एजन्सीकडुन करणेकामी, मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी "शासन निर्णय दि. ०१/०७/२०१४ नुसार संबधीत एजन्सींना SOW कळवावा व त्यांना त्रिसदस्यीय समितीसमोर सादरीकरण करणेसाठी बोलवावे." असे निर्देश दिलेले होते.

मा.कार्यकारी अधिकारी सो यांनी दिलेल्या सुचनेनुसार विषयांकीत प्रकरणी, M/s. Accenture, M/s. Ernst & Young, M/s. KPMG, M/s. PWC या इच्छुक कंन्सल्टंसी एजन्सींना संदर्भ क्रं ०४ चे मंजुर टिपणी अन्वये आमंत्रित करण्यात आले होते. परंतु, त्यापैकी M/s. Ernst & Young, M/s. KPMG, M/s. PWC या इच्छुक कंन्सल्टंसी एजन्सींनी दि. २१/०४/२०१६ रोजी, सकाळी ११.०० वाजता, ठिकाण-श्रीसाईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे प्रात्यक्षिक/ सादरीकरण मा कार्यकारी अधिकारी सो., मा. सर्व प्रशासकीय अधिकारी सो., माहिती तंत्रज्ञान विभाग कर्मचारी व कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधींचे समक्ष व उपस्थितीत दाखविलेले आहे

प्रात्यक्षिकाअंती उपस्थित प्रतिनीधींनी साईटेक प्रकल्पाची व्याप्ती व उपलब्ध कालावधी लक्षात घेता, निविदा प्रक्रिया राबवुन नविन कपंनीची नेमणुक करणे व अनुषंगिक बाबी वेळेत पुर्ण होणेबाबत साशंकता असल्याने, प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून प्रकल्पाची दुरुस्तीव देखभालीचे काम सुरु ठेवावे, असे मत प्रकट केलेले आहे.

यावेळी उपस्थित प्रतिनींधींना सदरकामी त्यांचे एक वर्षाकरीताचे दर बंद पाकीटामध्ये संस्थानला सादर करणेस सुचित करण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन संबधीत एजन्सींनी त्यांचे दरपत्रक बंद पाकीटामध्येसंस्थानचे आवक विभागास सादर केलेले होते. प्राप्त झालेले दरपत्रके दि. १३/०५/२०१६ मा. व्यवस्थापन समितीचे उपसमितीसमोर उघडलेले असून, त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे

| अ.नं. | कंपनीचे नाव | आवक नंबर व दिनांक | दिलेले दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | M/s. PWC | १६००, २६/०४/२०१६ | ४७,२५,०००/- | |
| २ | M/s. Ernst & Young | १६०१, २६/०४/२०१६ | ९४,५०,०००/- | |
| ३ | **M/s. KPMG** | **१६०२, २६/०४/२०१६** | **३८,४०,०००/-** | **न्युनतम दरधारक** |

उपरोक्त निविधारकांपैकी M/s. KPMG या शासनाचे दि. ०१/०७/२०१४ रोजीचे अध्यादेशातील अधिकृत कन्सल्टंसी कंपनीचे "साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल" निविदा प्रक्रिया अंतिम करणेकामीचे, एक वर्षाकरीताचे दर रुपये ३८,४०,०००/- मात्र न्युनतम आहे.

सन २०१८ मध्ये साईबाबांचे समाधी शताब्धी महोत्सव असल्याने या काळामध्ये शिर्डी येथे येणा-या साईभक्तांच्या संख्येमध्ये लक्षणिय वाढ होण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत साईटेक प्रकल्पाअंतर्गत साईभक्तांसाठी ऑनलाईन सर्व्हिसेस, देणगी कार्यालय, रुम बुकींग, कापडकोठी, पुस्तकविक्री, प्रसादालय, कॅन्टीन इ. सारख्या कार्यप्रणाली कार्यरत आहेत. दि. २१/०४/२०१६ सादरीकरणासाठी उपस्थित कन्सल्टींग कपंनीचे प्रतिनीधींनी सुचित केलेप्रमाणे साईटेक प्रकल्पाची व्याप्ती पाहता, **"**साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल**"** निविदा प्रक्रिया राबवुन नविन पात्र कपंनीची नेमणुक करणे व त्यानंतर कॉग्नीझंट कंपनीकडून सदर कंपनीस प्रकल्पाची सर्व बाबींचे ज्ञान अवगत करुन घेणे इ. बाबी उपलब्ध कालावधीमध्ये पुर्ण होतील याबाबत साशंकता आहे सबब, संबधीतांचे अभिप्रायानुसार **"**साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल**"** निविदा प्रक्रिया राबवुन नविन पात्र कपंनीची नेमणुक झालेनंतर सहा महिन्यांकरीता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी**,** पुणे यांचेमार्फत साईटेक प्रकल्पदुरुस्तीदेखभाल चालू ठेवावे लागेल**,** असे नम्र मत आहे.

तरी, उपरोक्त निविधारकांपैकी M/s. KPMG या शासनाचे दि. ०१/०७/२०१४ रोजीचे अध्यादेशातील अधिकृत कन्सल्टंसी कंपनीचे **"**साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल**"** निविदा प्रक्रिया अंतिम करणेकामीचे**,** एक वर्षाकरीताचे रुपये ३८,४०,०००/- मात्र चे न्युनतम दर मान्य होऊन त्यांची सदरकामी निवड होणेकामी व **"**साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल**"** निविदा प्रक्रिया राबवुन नविन पात्र कपंनीची नेमणुक झालेनंतर पुढील सहा महिन्यांकरीता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी**,** पुणे यांचेमार्फत साईटेक प्रकल्पदुरुस्तीदेखभाल चालू ठेवणेकामी त्यांना माहे मे-२०१७ पासून मुतदवाढ देण्यास मा.मुंबई उच्च न्यायलयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सादर करता येईल**.**

**मागणी:** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे कार्यवाही होणेकामी प्रस्ताव मा व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सादर करता यईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** उपरोक्त निविधारकांपैकी M/s. KPMG या शासनाचे दि. ०१/०७/२०१४ रोजीचे अध्यादेशातील अधिकृत कन्सल्टंसी कंपनीचे **"**साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल**"** निविदा प्रक्रिया अंतिम करणेकामीचे**,** एक वर्षाकरीताचे रुपये ३८,४०,०००/- मात्र चे न्युनतम दर मान्य होऊन त्यांची सदरकामी निवड होणेकामी व **"**साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल**"** निविदा प्रक्रिया राबवुन नविन पात्र कपंनीची नेमणुक झालेनंतर पुढील सहा महिन्यांकरीता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी**,** पुणे यांचेमार्फत साईटेक प्रकल्पदुरुस्तीदेखभाल चालू ठेवणेकामी त्यांना माहे मे-२०१७ पासून मुतदवाढ देण्यास मा.मुंबई उच्च न्यायलयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.३२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील अर्ज दाखल करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०५** **मंदिर परिसरात कार्यान्वित केलेल्या सीसीटीव्ही तसेच इतर सुरक्षा यंत्रणेच्या CAMC बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानने श्री साईभक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अद्यावत स्वरुपाची सीसीटीव्ही यंत्रणा मे.व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन नोएडा यांचेमार्फत विकसीत केली आहे. त्यामध्ये संस्थान परिसरात मंदिराचे आतील व बाहेरील बाजुस नविन कंट्रोल रुममार्फत १२ PTZ व ८९ फिक्स कॅमेरे असे एकुण १०१ सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविण्यात आलेले आहे. तसेच मंदिर परिसर व दर्शन रांगेतील श्री साईभक्तांकडे असलेल्या बॅगा, पर्स चेक करण्यासाठी ०२ बॅगेजेस स्कॅनर मशिन, डिएफएमडी, एचएचएमडी, टर्न स्टाईल, इत्यादी तांत्रिक साहित्य बसविण्यात आलेले आहे.

उपरोक्त साहित्याची CAMC सन २०१४-२०१५ करीता मे. व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोएडा यांना दि.१५/०३/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०६, निर्णय क्र.१७६ अन्वये "सुरक्षा साहित्यांचे Comphrehensive AMC कॉन्ट्रॅक्ट एकुण प्रोजेक्ट किंमतीच्या ५% + Tax तसेच दोन इंजिनीअरसाठी वार्षिक रु. ७,००,००० + Tax" यादराने यापुर्वी देण्यात आलेली होती. परंतु त्यांचाCAMC चा कालावधी माहे एप्रिल-२०१५ मध्ये संपुष्टात आल्याने, पुढील एक वर्षाचे कालावधीकरीता सदर साहित्याची CAMC देणे आवश्यक

असल्याने, सदर CAMC चा प्रस्ताव दि. ०८/१०/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होवुन, "मंदिर व परिसरातील सुरक्षा साहित्यांचे CAMC कॉन्ट्रॅक्ट मे.व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोएडा यांना देणेऐवजी याकामी नवीन ई-निवीदांची मागणी करणेत यावी. त्यासाठी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी" असे ठरले. त्यास अनुसरुन मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेत येवुन त्यास सिव्हील ॲप्लीकेशन नं.१६०८८/ २०१५, दि.१८/१२/२०१५ रोजीचे आदेशान्वये मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानुसार पुढील कालावधीकरीता सदर साहित्याची CAMC देणेकरीता ई-निवीदा मागविणेकामी जाहिरात प्रसिद्ध करणेकरीता प्रस्ताव मान्यतेकरीता सादर करणेत आलेला आहे. त्यानुसार सदर जाहिरात प्रसिद्ध होवुन निवीदा अंतिम होण्यास किमान दोन महिन्याचा कालावधी लागणार आहे परंतु सद्यस्थितीत मंदिर परिसरातील ५०% सुरक्षा यंत्रणा देखभाली अभावी बंद पडली आहे तसेच दि.०८/१०/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.३३२ अन्वये नविन ई-निवीदा प्रसिद्ध करणेचा निर्णय झाल्याने Nov-२०१५ पासुन मे.व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोएडा यांनी सदर साहित्याचे दुरुस्ती व देखभालीची कामे बंद केल्याने मंदिर सुरक्षा व्यवस्थेला धोका निर्माण झालेला आहे सदरची सुरक्षा यंत्रणा मे.व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोएडा या कंपनीची असल्याने इतर कंपनीचे साहित्य सदर सुरक्षा यंत्रणेस बसविता येणार नाहीत सदर सुरक्षा साहित्याची दुरुस्ती व देखभालीबाबत मे.व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोएडा यांना विचारणा करण्यात आली होती. परंतु मे. व्हेन्टेज यांना April-२०१५ ते October-२०१५ पर्यंतचे दुरुस्ती व देखभालीचा आदेश व पेमेंट न दिल्याने त्यांनी दुरुस्ती व देखभालीस नकार दिला आहे परंतु दि.१५/०३/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. १७६ यास अनुसरुन मे.व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोएडा यांना यापुर्वी सन २०१४-२०१५ करीता देण्यात आलेल्या दराने तसेच मे.व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोएडा यांनी दि.२२/०४/२०१६ रोजीचे ई-मेलद्वारे मागणी केल्याप्रमाणे April-२०१५ ते October-२०१५ अखेर एकुण रक्कम रु.१४,६६,९९५/- + Tax मात्र अदा केल्यास सदर बंद असलेली सुरक्षा यंत्रणा पुन्हा सुरळीत सुरु होवु शकते व सदरचा सुरक्षा यंत्रणेचा धाका टळु शकतो.

सदर साहित्याची CAMC अभावी सध्या मंदिर परिसरातील ४२ सीसीटीव्ही कॅमेरे, ०२ नग बॅगेजेस स्कॅनर, ०२ क्लाएंट सर्व्हर, ०१ नग डिएफएमडी, २५ नग वॉकी-टॉकी, ५० नग एचएचएमडी, ०३ नग टर्नस्टाईजल,०१ नग बुम बॅरीअर इ. तांत्रिक साहित्य बंद स्थितीत आहे तसेच तत्कालीन विभागप्रमुख श्री गवळी यांनी एक सर्व्हर आयटी विभागाकडे व एक सर्व्हर व स्विच दुरुस्तीकामी बाहेर पाठविले होते परंतु दोनही सर्व्हर व स्विच दुरुस्त न झाल्याने तेही सध्या बंद स्थितीत आहे.

परंतु, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत दाखल केलेल्या सिव्हील ॲप्लिकेशन नं.९२१२/२०१४, दि.२६/०९/२०१४ नुसार मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने "d" मध्ये " In case the matter is with regard to renewal of Agreement and more particularly with the companies, who have provided the said machineries or the products, applicant/sansthan shall seek renewal of the agreement on the same terms and conditions " असे आदेश दिलेले आहेत.

**अ)** उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठीतील सिव्हील ॲप्लिकेशन नं. ९२१२/२०१४, दि.२६/०९/२०१४ नुसार दिलेल्या आदेशास अनसरुन मे.व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोएडा यांना पुढील वर्षाकरीता सदर साहित्याची CAMC देता येईल, असे नम्र मत आहे.

**ब)** मे.व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन प्रालि., नोएडा यांनी उपरोक्त दि. २२/०४/२०१६ रोजीचे ई-मेलद्वारे मागणी केल्याप्रमाणे व दि.१५/०३/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०६, निर्णय क्र.१७६ व मे. व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन प्रालि., नोएडा यांचे करारनाम्यास अनुसरुन सन २०१४-२०१५ करीता यापुर्वीचे देण्यात आलेल्या दराने माहे April-२०१५ ते October-२०१५ अखेर सात महिन्याचे एकुण रक्कम रु. १४,६६,९९५/- + Tax मात्र अदा करणेस तसेच सदरची रक्कम दोन टप्प्यात अदा करणेस मान्यता असावी, ही नम्र विनंती. (तपशील खालीलप्रमाणे)

| -- | प्रोजेक्ट किंमत | ५% (एक वर्षाकरीता) | एक महिन्याकरीता | सात महिन्याचे |
|---|---|---|---|---|
| सीसीटीव्ही प्रोजेक्ट | रु.३,६२,९६,९८५ | रु.१८,१४,८४९/- | रु. १,५१,२३७.४३ | **रु.१०,५८,६६२/-** |
| दोन इंजिनीअरकरीता | रु. ७,००,०००/- | -- | रु. ५८,३३३.३३ | रु. ४,०८,३३३/- |
| -- | -- | -- | एकुण **रक्कम** | रु.१४,६६,९९५/- + Tax |

दि.०७/०८/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१, निर्णय क्र.६७६ निर्णयास अनुसरुन उपरोक्त **"अ"** व **"ब"** करीता मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही

तरी, उपरोक्त **"अ"** व **"ब"** मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, उपरोक्त विषयावर पुर्वी दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन एकमताने निर्णय क्र.३३२ संमत केलेला असल्यामुळे त्या निर्णयाप्रमाणेच कार्यवाही करणेत यावी.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **शिर्डी येथील प्रस्तावित City CCTV Surveillance प्रकल्पाबाबत माहिती तंत्रसंचनालय, मंत्रालय यांचेकडून प्राप्त अभिप्रायाचे अनुषंगाने निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. मधील ३५५ मधील (घ) साईभक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.-** दि.१०/११/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.२५, निर्णय क्र.४६०.

**प्रास्ताविक–** श्री साईबाबा संस्थानने सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ नाशिकच्या अनुषंगाने शिर्डी येथे येणाऱ्या भाविकांच्या गर्दीचे नियोजन करण्याकरीता सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे निर्देशानुसार आणि पोलिस विभागाचे मागणीनुसार सल्लागार नियुक्त करण्यासाठी मे.एम.आय.पी.एल., मुबई यांचेकडुन प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार संबंधीत कंपनीने तीन निविदा सादर केल्याहोत्या. सदर निविदा उघडुन मा.व्यवस्थापन समितीचे दि. २४/०६/२०१५ रोजीचे सभेतील निर्णयानुसार मे.एम.आय.पी.एल., मुबई यांना कार्यादेश देण्यात आला होता. सदर कार्यादेशास अनुसरुन मे.एम.आय.पी.एल., मुबई यांनी निविदा तयार करुन एकुण रक्कम रु. ८१,७९,०००/- इतका खर्च अपेक्षित असल्याचे कळविले होते. तदनंतर नाशिक सिंहस्थकुंभमेळा -२०१५ करीता शिर्डी शहराचा प्रस्तावित सीसीटीव्ही प्रकल्प कार्यान्वित करण्याकरीता शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात देऊन ई-निविदा मागविण्यात येवुन, प्री-बीड मिटींगचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यानच्या कालावधीत मे. व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन प्रा.लि., कंपनीने मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केलली असल्याने, मे.एम.आय.पी.एल., मुंबई यांचे नियुक्तीस आक्षेप घेतलेले आहे. सदर याचिकेच्या सुनावणीमध्ये मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने रिट पिटीशन नं. ७९३८/२०१५, दि.०१/०९/२०१५ अन्वये “Learned Counsel appearing for Respondent No.1, on instruction, states that within a period of three weeks, there is no likelihood of issuance of fresh tender and seeks time for presenting an affidavit in reply.” Stand over to 22 September 2015, असे आदेश दिलेले आहेत.

तसेच श्री.संजय चौकीदार सो., ॲडव्होकेट यांनीही सीसीटीव्ही संदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल असल्याने, मा.उच्च न्यायालयाचा पुढील आदेश होईपावेतो संस्थानने सीसीटीव्ही संदर्भात कुठलीही कार्यवाही प्रस्तावित करु नये असे निर्देश दिलेले आहेत.

परंतु शिर्डी शहराचे प्रस्तावित City CCTV Surveillance प्रकल्पाबाबत दि.१०/११/२०१५ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. २५, निर्णय क्र.४६० अन्वये “शिर्डी शहराचे प्रस्तावित City CCTV Surveillance प्रकल्प राबविणेसाठी महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रसंचनालय विभागाचे मार्गदर्शन घेण्यात येवुन, पुढील कार्यवाही ही पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी करावी व त्यासाठी त्यांना एक ठरावीक मर्यादेपर्यंत ठोक रक्कम द्यावी” असा निर्णय घेण्यात आला. त्यास अनुसरुन, मा.प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान संचनालयाचे अभिप्राय घेणेकामी जा.नं.एसएसएसटी/सीसीटीव्हीसेल/५७७६/ २०१६, दि.१८/०१/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आलेले आहे. शिर्डी येथील प्रस्तावित City CCTV Surveillance प्रकल्पासंदर्भात दि. ०३ मार्च २०१६ रोजी मा.सचिव व विधी परामर्शी, मंत्रालय, मुंबई यांचे दालनामध्येबैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर बैठकीस मा.कार्यकारी अधिकारी सो. उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये शिर्डी येथील प्रस्तावित City CCTV Surveillance प्रकल्पासंदर्भातील मुद्यांच्या अनुषंगाने माहिती व तंत्रसंचनालय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत –

| अ.नं. | शिर्डी City CCTV Surveillance प्रस्तावित मुद्दे | माहिती तंत्रसंचनालय विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|
| १. | शिर्डी शहरातील सीसीटीव्ही सर्व्हेलंन्स केबलबाबत. | The CCTV based surveillance system has certain key component including Cameras, IT backbone, i.e Center establishment & management, etc. |
| २. | केबल ओवहरहेड टाकावयाची झाल्यास त्यास कुठलीही सुरक्षितताराहणार नसुन त्यास शासनाचे विद्युत विभाग व स्थानिक नगर परिषदेची पुर्व परवानगी घ्यावी लागेल. | Ideally, the Devasthan committee should have selected one of the five empanelled consultants to get a DPR and RFP prepared |
| ३. | निवीदेमध्ये सीसीटीव्ही सर्व्हेलंन्सकामी वापरण्यात येणा-या केबलच्या लांबी व किंमत तसेच त्यावरील खर्च व परिमाण. | Since a RFP already prepared, DIT’s recommendation are as follows- |

| | | |
|---|---|---|
| | | a) DIT can get the RFP velted by one & the 5 they consultants empanelled with GOM<br>b) DIT can also get a DPR prepared for the establishment & management of the prepared digital security & surveillance eco-system for Shirdi town.<br>c) This experience exercise needs to the completed in next 30-45 days so that the modified RFP could be published by last week of March 2016 or 1st week of April, 2016<br>d) The present RFP needs to the revisited to ensure temporary and fair competition. Present RFP is completely silent or technical Evaluation method which is left for the project consultant. Specification for hardware and server sizing etc. need to the properly examined.<br>e) Looking at the complexity of the project, Devasthan Committee should sent the present RFP. |
| ४. | सीसीटीव्ही सर्व्हेलंन्सकामी प्रस्तावित असलेल्या कॅमे-यांच्या कंपनीच्या दर्जाबाबत. | DIT is ready to provide all assistance including preparation of DPR, RFP and technical security of the proposal. |
| ५. | WWW.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या ई-निवीदामधील (RFP Draft) City CCTV Surveillance प्रकल्पावर प्रत्यक्ष काम केलेल्या अनुभवी, उच्च शिक्षित तज्ञ सल्लागाराची नेमणुक करण्याकरीता शासनाच्या अधिकृत तज्ञांचे मत घेणे. | -- |
| ६. | सदर प्रकरणी दि. १०/०८/२०१५ रोजी पार पडलेल्या प्री-बीड मिटींगमध्ये उपस्थित असलेल्या प्रत्येक बीडरचे नावांचा व क्युरीजचा उल्लेख सल्लागारामार्फत झालेला नसल्याने बीडरने विचारलेल्या व्युरीजबाबत सल्लागाराकडुन लिखीत स्वरुपात शहानिशा करणे. | -- |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील प्रस्तावित City CCTV Surveillance प्रकल्पाबाबत दि. ०३ मार्च २०१६ रोजी मा.सचिव व विधी परामर्शी, मंत्रालय, मुंबई यांचे दालनामध्येपार पडलेल्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार उपरोक्त तपशीलात नमुद केल्याप्रमाणे माहिती व तंत्रज्ञान संचनालय, मंत्रालय यांचे अभिप्रायाच्या अनुषंगाने माव्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर करणेबाबत विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी आवक क्र २३८४५, दि.०५/०३/२०१६ व आवक क्र.२४५४७, दि.१५/०३/२०१६ रोजीचे फॅक्स व पत्राद्वारे कळविलेले आहे. त्यास अनुसरुन सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करता येईल.

**मागणी-** उपरोक्त प्रस्ताविकेत नमुद केलेप्रमाणे, सीसीटीव्ही संदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल असल्याने, मा.उच्च न्यायालयाचा पुढील आदेश होईपावेतो संस्थानने सीसीटीव्ही संदर्भात कुठलीही कार्यवाही प्रस्तावित करु नये, असे असे आदेश मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील प्रस्तावित City CCTV Surveillance प्रकल्पाबाबत दि.०३ मार्च २०१६ रोजी मा.सचिव व विधी परामर्शी, मंत्रालय, मुंबई यांचे दालनामध्येपार पडलेल्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेल्या तपशीलाप्रमाणे माहिती व तंत्रज्ञान संचनालय, मंत्रालय यांचे अभिप्रायाच्याअनुषंगाने माव्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर करणेबाबत विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी आवक क्र. २३८४५, दि.०५/०३/२०१६ व आवक क्र.२४५४७, दि.१५/०३/२०१६ रोजीचे फॅक्स व पत्राद्वारे कळविलेले आहे. त्यास अनुसरुन सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान-** आर्थिक, तांत्रिक व कायदेशीर.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** उपरोक्त प्रस्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे, सीसीटीव्ही संदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल असल्यामे, मा.उच्च न्यायालयाचा पुढील आदेश होईपावेतो संस्थानने सीसीटीव्ही संदर्भात कुठलीही कार्यवाही प्रस्तावित करु नये, असे असे आदेश मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील प्रस्तावित City CCTV Surveillance प्रकल्पाबाबत दि. ०३ मार्च २०१६ रोजी मा.सचिव व विधी परामर्शी, मंत्रालय, मुंबई यांचे दालनामध्येपार पडलेल्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार उपरोक्त प्रस्ताविकेत नमुद केलेल्या तपशीलाप्रमाणे माहिती व तंत्रज्ञान संचनालय, मंत्रालय यांचे अभिप्रायाच्या अनुषंगाने माव्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर करणेबाबत विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी आवक क्र २३८४५, दि.०५/०३/२०१६ व आवक क्र.२४५४७, दि.१५/०३/२०१६ रोजीचे फॅक्स व पत्राद्वारे कळविलेले आहे. त्यास अनुसरुन सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील प्रस्तावित City CCTV Surveillance प्रकल्पाबाबत माहिती तंत्रसंचनालय, मंत्रालय यांचेकडून प्राप्त अभिप्रायाचे अवलोकन करणेत आले व सदरहू प्रकल्प मोठया स्वरुपाचा असून त्याचा नवीन DPR मध्ये समावेश असलेबाबत शासनास कळविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख)

---

**विषय नं.०७** **आय.टी. मॅनेजर या पदाचे लेखी परीक्षा व मुलाखतीचे सिलबंद लखोटे उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दि१२/०२/२०१६ रोजीचे आदेशानुसार संस्थानचे आय.टी. मॅनेजर हे रिक्त पद पदोन्नतीने अथवा सरळसेवेने भरावे याबाबतचा तपशीलवार प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२९/०२/२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता, त्यावर समितीने निर्णय क्र.१८७ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन एकमताने असे ठरले की, आय.टी.मॅनेजर या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या संस्थान सेवेतील कर्मचा-यांमधून आयटी.मॅनेजरची नेमणूक करणेत यावी. तसेच हे पद तांत्रिक स्वरूपाचे असल्यामुळे या क्षेत्रातील तज्ञांस त्रीसदस्यीय समितीच्या अध्यक्ष व सदस्यांसह बोलावून मुलाखती घेऊन, गुणवत्तेने-सेवाज्येष्ठता (Merit-cum-Seniority) या तत्वाने योग्य कर्मचा-याची आय.टी.मॅनेजर या पदावर निवड/ नियुक्ती करणेत यावी, सदरहू कार्यवाही दोन महिन्यात पूर्ण करण्यात यावी, असे ठरले."

उपरोक्त निर्णयास अनुसरून आय.टी.मॅनेजर या पदासाठी लेखी परीक्षा व मुलाखत घेणेकामी मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांना जानं.एसएसएस/साप्रशा/आस्था/५१६/२०१६ दि.०५ मे, २०१६ अन्वये कळविणेत आलेले होते.

आता, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचेकडील आयटी.विषयातीत तज्ज्ञ प्रा.डॉ.जगन्नाथ व्ही. आघाव व प्रा.डॉ.विनोद के.पाचघरे यांनी दि.१९/०५/२०१६ रोजी मा.जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे दुपारी ०२.०० वाजता श्री.किशोर साहेबराव गवळी, प्र.माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख व श्री.राहुल वामन गलांडे, प्र.इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर यांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात आली. त्यानंतर संबंधीत तज्ज्ञांनी मा.त्रिसदस्य समितीचे अध्यक्ष व सदस्य यांचेसमोर दोन्ही उमेदवारांची मुलाखत घेऊन मुलाखतीचे व लेखी परीक्षेच्यागुणपत्रिका लखोटयात सिलबंद करुन लखोटा मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचेकडे दिला. सदरचा सिलबंध लखोटा उघडून पुढील कार्यवाही करणेचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३२८** **दि.१९/०५/२०१६ रोजी मा.जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे दुपारी ०२.०० वाजता श्री.किशोर साहेबराव गवळी, प्र.माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख व श्रीराहुल वामन गलांडे प्र.इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर यांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात आलेली होती व त्यानंतर संबंधीत तज्ज्ञांनी मा.त्रिसदस्य समितीचे अध्यक्ष व सदस्य यांचेसमोर दोन्ही उमेदवारांची मुलाखत घेऊन मुलाखती व लेखी परीक्षेच्या सिलबंद गुणपत्रिकांचा लखोटा आजचे त्रीसदस्य समिती सभेसमोर उघडणेत येऊन, तज्ञांनी दिलेल्या अहवालाचे अवलोकन करणेत आले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, तज्ञांच्या अभिप्रायाचा विचार करता, संस्थानचे आय.टी. मॅनेजर या पदासाठी उपरोक्त दोन्हीही उमेदवार योग्य व लायक नाहीत, त्याकरीता आय.टी. मॅनेजर हे पद भरणेसाठी विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करणेत यावी, असे ठरले.**

**तसेच यावेळी अशीही चर्चा करणेत आली की, संस्थानचे आय.टी. मॅनेजर या पदासाठी आकृतीबंधामध्ये उल्लेखीत असलेल्या वेतनाच्या आस-पासचे एकत्रित वेतन देण्यात येऊन, आऊटसोर्स पध्दतीने संस्थानचे आय.टी. मॅनेजर हे पद भरणेसाठीचा प्रस्तावही सभेसमोर सादर करणेत यावा.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.०८** **श्री पुण्यतिथी उत्सव- २०१५ साठी प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी हे मुख्य उत्सव साजरा करण्यात येतात.

श्री पुण्यतिथी उत्सव-२०१५ साजरा करणेकामी अंदाजपत्रिकीय तरतूदीस(खर्चास) मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे दि. ८/१०/२०१५ रोजीचे सभेत सादर करणेत आला. यासभेतील निर्णय क्र ३५१ अन्वये श्री पुण्यतिथी उत्सवासाठी रु.५२,४६,२००.००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाले नंतर सदर खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची सिव्हील अॅप्लीकेशन अर्ज क्र. १३२६८/२०१५, रिव्हयु अॅप्लीकेशन अर्ज नं १८२ व सिव्हील अॅप्लीकेशन अर्ज क्र ३४९७/२०१६ ने मान्यता मिळालेली आहे. श्री पुण्यतिथी उत्सव- २०१५ साठी खालील प्रमाणे प्रत्यक्षात खर्च झालेला आहे. तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.न | तपशिल | अंदाजपत्रकातील मंजूर रक्कम | प्रत्यक्ष खर्च | तरतूदी पेक्षा जादा खर्च | तरतूदी पेक्षा कमी खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | मंडप, कमानी खर्च | ७,९७,५१५.०० | ४,१७,०२५.०० | - | ३,८०,४८०.०० |
| २ | कलाकार बिदागी–कीर्तनकारासह | २,२०,०००.०० | १४,७४६.०० | - | २,०५,२५४.०० |
| ३ | भकतांना मिष्टान्न मजुरीसह | ९,५७,५८७.०० | ७,४०,५०८.०० | - | २,१७,०७९.०० |
| ४ | विद्युत रोषणाई खर्च | ९,९५,०००.०० | ९,०१,६०३.०० | - | ९३,३९७.०० |
| ५ | निमंत्रण पत्रिका, छपाई, स्टिकर, उदीप्रसाद, भरणे मजूरी खर्च | ५,००,०००.०० | ३,२३,५७५.०० | - | १,७६,४२५.०० |
| ६. | निमंत्रण पत्रिका पोस्टेज खर्च | ९,९६,०००.०० | ९,६४,२१७.०० | - | ३१,७८३.०० |
| ७. | इतर खर्च (बोर्डे बनविणे, पुजा-अर्चा इ) | ४८,४४२.०० | ३७,७१०.०० | - | १०,७३२.०० |
| ६ | जादा कामगार | ३,०७,६५६.०० | २,१४,९८२.०० | - | ९२,६७४.०० |
| ७ | पालख्यांचे पिण्याचे पाणी व्यवस्था खर्च. | २,२४,०००.०० | २०,१६२.०० | - | २,०३,८३८.०० |
| ८ | मंदीर व मंदीर परिसर फुलांची सजावट खर्च | २,००,०००.०० | ०० | - | २,००,०००.०० |
| | **एकुण** | **५२,४६,२००.००** | **३६ ,३४,५२८.००** | **-** | **१६,११,६७२.००** |

उपरोक्त तपशिल पाहता श्री पुण्यतिथी उत्सव-२०१५ करिता रक्कम रु.५२,४६,२००/- (रु. बावन्न लाख शेहचाळीस हजार दोनशे) मात्र मंजूर करण्यात आलेली आहे. या रक्कमेतून उत्सवाकरीता प्रत्यक्षात एकुण रु.३६,३४,५२८/- (रु.छतीस लाख चौतीस हजार पाचशे अठ्ठावीस) मात्र खर्च झालेला आहे .

तरी सदरचे प्रत्यक्षात झालेल्या एकुण खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री पुण्यतिथी उत्सव-२०१५ करिता मंजुर असलेल्या रु.५२,४६,२००/- मात्र रकमेमधून प्रत्यक्षात झालेल्या एकुण रु.३६,३४,५२८/- मात्र खर्चाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.०९** **संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील जमिनीचे भोवती कुंपन करणेकामी प्राप्त ई-निविदांबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-** कलम २१ (१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल. त्यामधील पोट कलम (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन. व पोट कलम (झ) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

१. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २३/०५/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ३०५ खालील प्रमाणे झालेला आहे.

*".. संस्थम मालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील जमिनीचे भोवती आरसी.सी. प्रिकास्ट कुंपन करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२६,९५,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली.*

*तत्पुर्वी, उपरोक्त कामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले."*

२. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १६/०२/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ७७ (०८) खालील प्रमाणे झालेला आहे.

*यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थम मालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील जमिनीचे भोवती कुंपन करणेकामी तिस-यांदा ई-निविदांची मागणी करुनही दोनच निविदा प्राप्त झालेल्या आहेत व त्यामध्ये मे. आर. एल. भुतडा, कोपरगांव यांचे रु३६,०९,३७३.९९ मात्र निम्नतम दर आहेत. परंतु मा. उच्च न्यायालयाने सदरहू कामासाठी रु.२६,९५,०००/- मात्रचे खर्चास मंजूरी दिलेली असून प्राप्तझालेले दर रु.९,१४,३७३.९९ मात्र जादा आहेत. त्यामुळे प्रस्तावितकामी जादा येणा-या खर्चास मा. उच्च न्यायालयाची परवानगी घ्यावी अथवा पुन्हा ई-निविदांची मागणी करावी याबाबत मार्गदर्शन घेणेकामी त्रीसदस्य समितीसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."*

**मा.उच्च न्यायालय परवानगी:-** मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने –CIVIL APPLICATION NO.5062 OF 2015 IN PUBLIC INTEREST LITIGATION NO.18 OF 2011 अन्वये खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

१. The permission is sought to spend an amount of Rs.26,95,000/- for construction of compound wall in respect of three properties as indicated by resolution No.305 passed by the applicant.

२. Considering the resolution and the need shown, the applicant is allowed to construct the compound wall as prayed vide prayer clause "B". However the same be done at a competitive rate by E – tender process. The civil application is disposed of.

**प्रस्तावना:-** मा. व्यवस्थापन समितीचे व मा.उच्च न्यायालयाचे उपरोक्त मान्यतेनुसार मौजे को-हाळे येथील गट नं.९७ पैकी व मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १२४/११ व १२४/१२ आणि सर्व्हे नं. २०७/२ मध्ये संरक्षणाचे दृष्टीने कुंपन करणेसाठी प्रथम दि.३०/०६/२०१५ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन दि.०५/०८/२०१५ अखेर ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. विहीत मुदतीत दोन ठेकेदारांनी ईनिविदा सादर केल्या होत्या. फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्या असल्याने, प्राप्त निविदांचे तांत्रीक लिफाफे संबंधित ठेकेदार यांना परत करणेत येऊन याकामी फेर निविदा (व्दितीय) मागविणेस इकडील दि.२४/०९/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार याकामी ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन दि.१३/१०/२०१५ पर्यंत निविदा अपलोड करणेची मुदत देणेत आली होती. सदरचे विहीत मुदतीत एकही निविदा अपलोड झालेली नसल्याने, सदरकामी तिस-यांदा ई-निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविणेस दि.३०/१०/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देणेत आली आहे. याकामी दैनिक सार्वमत या वृत्तपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन सदर ई-निविदा अपलोड करणेची मुदत दि०५/१२/२०१५ अखेर देणेत आली होती.

त्यानुसार प्राप्त झालेल्या ई – निविदांमधील टेक्नीकल बीड दि.०९/१२/२०१५ रोजी उघण्यात आले आहेत. त्यावेळी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.नं | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.ए.आर.औटी | प्रशासकीय अधिकारी |
| २ | श्री. डी. झिरपे, | मुख्यलेखाधिकारी |
| ३ | श्री. डी.एम. देसाई | उप अभियंता |
| ४ | श्री. एस. एम. जोरी | उप अभियंता |
| ५ | श्री. जी. आर. कोराटे | कनिष्ठ अभियंता |
| ६ | श्री. आर.एस. साबळे | ज्यु. ई डी पी विभाग, प्रतिनिधी |

उघडण्यात आलेल्या ई–निविदांचे लिफाफा क्र. ०१ (Technical Bid) मधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे

| अ. नं. | ठेकेदाराचे नांव | कागदपत्रांचा तपशिल | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **बयाना रक्कमेचा डी.डी व को-या निविदेची किंमत** | **सा.बां. विभागाकडे नोंद केल्याचे प्रमाणपत्र.** | **मागील तीन वर्षात बांधकाम क्षेत्रात केलेल्या कामाचे दाखला** | **कर्मचारी भविष्य निर्वाह निधी विभागाकडे नोंद आहे. /नाही.** | |
| ०१ | मे. एम. बी. शेख, अहमदनगर | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | जोडले आहे. | पात्र |
| ०२ | मे. आर. एल. भुतडा, कोपरगांव | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | जोडले आहे. | पात्र |
| ०३. | श्री. नगवनाथ ढोकणे, राहूरी | ठेकेदार यांनी निविदा फी व बयाना रकमेचे डी. डी. व इतर अनुषंगीक कागदपत्रे (Hard Copy) संस्थानकडे जमा केलेली नाहीत. | | | | अपात्र |

तरी विषयांकीत कामासाठी तिस-यांदा ई – निविदा मागवून प्राप्त झालेल्या ई – निविदा मधील उपरोक्त अ. नं. ०१ व ०२ चे पात्र ठेकेदार यांचे लिफाफा क्र. ०२ (Commercial Bid) मा. उपसमितीचे सभेपुढे उघडून त्यावर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यानुसार सदर निविदेचा लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) दि.०४/०२/२०१६ रोजीचे उपसमितीचे सभेपुढे उघडणेत आला असून त्यांचे दरांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Bidder Name | Estimated Rate | Quoted Percentage | Rate | Remark |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Magbul Badashah Shaikh | 2689548.4308 | 35.33 | 3639765.89 | |
| 2. | M/s. R. L. Bhutada | 2689548.4308 | 34.2 | 3609373.99 | Lowest |

विषयांकीत कामासाठी सन २०१३ चे बाजारभावानुसार रु.२६,९५,०००/- मात्र रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यात ६' उंचीचे प्रिकास्ट कंम्पाउंड करीता रु.९७४/- प्रती चौ. मी. दर गृहीत धरण्यात आला होता. आता, जिल्हा दरसूची २०१५-१६ मध्ये याकामाचा दर रु.१२५०/- प्रती चौ. मी. दिलेला आहे. त्यानुसार अंदाजपत्रकातील दरापेक्षा सध्याचे जिल्हादरसूची (DSR) मधील दर २८.३४% अधिक आहे.

वरील प्रमाणे प्राप्त झालेले दराबाबत मा. त्रिसदस्य समितीचे दि.१६/०२/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र.७७ (०८) नुसार सदरहू कामासाठी मा. उच्च न्यायालयाने रु.२६,९५,०००/- मात्रचे खर्चास मंजूरी दिलेली असून प्राप्त झालेले दर रु.९,१४,३७३.९९ मात्र जादा आहेत. त्यामुळे प्रस्तावितकामी जादा येणा-या खर्चास मा. उच्च न्यायालयाची परवानगी घ्यावी अथवा पुन्हा ई-निविदांची मागणी करावी याबाबत मार्गदर्शन घेणेकामी मा. त्रीसदस्य समितीसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा असे ठरले आहे.

तरी सदरहू कामी येणारे जादा खर्चास मा. उच्च न्यायालयाची परवानगीसाठी प्रस्ताव सादर करता येईल असे मत आहे. याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी तिस-यांदा निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली असल्यामुळे प्राप्त दर स्विकारणेत येऊन, मंजूर रकमेपेक्षा जादा येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत मा.औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी सिव्हील अर्ज दाखल करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०** **न्यासाच्या/ समितीच्या वाहनांचा खाजगी कारणासाठी वापराबाबत.**

**प्रस्ताव-** मा.अध्यक्ष / मा. उपाध्यक्ष / मा. सदस्य तसेच अधिकारी / कर्मचारी यांना अकस्मित प्रसंगी न्यासाच्या / समितीच्या वाहनांचा खाजगी कामाकरीता वापरन्यास विधी व न्याय विभाग यांनी जा.नं.सासंवि-२००८/३२५/(२)-का.सोळा, दि.१९/०३/२००८ चे पत्रानुसार खालील प्रमाणे मान्यता दिलेली होती.

न्यासाच्या वाहनांचा खाजगी वापर योग्य ते कार्यपध्दती वापरुन संबंधित व्यक्तीकडून वित्त विभाग, शासन निर्णय क्रं.प्रवास-१००५/ प्र.क्र.३३/सेवा-५, मंत्रालय, मुंबई दि०८ जुलै, २००५ चे निर्णया प्रमाणे पेट्रोल वा डिझेलवर चालणा-या सर्व शासकीय वाहनांच्या खाजगी वापरासाठी रु.८/- प्रति किलोमिटर या दराने वसुली करण्यात यावी तसेच या दरात वेळोवेळी शासन निर्णयानुसार होणाऱ्या बदलांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.

वित्त विभाग, शासन निर्णय क्रं.प्रवास-१००५/प्र.क्र.३३/सेवा-५, मंत्रालय, मुंबई दि०८ जुलै, २००५ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे

**पुर्वीचा शासन निर्णयः-**

1. शासकीय वाहनांच्या खाजगी वापरासाठी आकारावयाचे दर दि.१७ ऑक्टोबर, १९९० च्या आदेशान्वये, विहीत करण्यात आले आहेत. या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.
2. याविषयी शासन आता असे आदेश देत आहेकी, पेट्रोल वा डिझेलवर चालणा-या सर्व शासकीय वाहनांच्या खाजगी वापरासाठी यापुढे सरसकट रु.८/- (रुपये आठ) प्रति किलोमीटर या दराने वसुली करण्यात यावी.
   शासकीय वाहनांच्या खाजगी वापरासाठी घालण्यात आलेली प्रति महा २५० किलोमीटर ही कमाल मर्यादा लागू राहील. या मर्यादेपेक्षा अधिक खाजगी वापरास परवानगी देण्यात येऊ नये.
3. शासकीय वाहन खाजगी वापरात असतांना, त्यासाठी असलेल्या खोळंब्याचा (Detention) दर यापुढे प्रति तास रु.३/- व कमाल रु.३०/- प्रति दिवस इतका असेल. खोळंब्याचा काळ मोजतांना पूर्वीप्रमाणेच पहिल्या तिन तासांचा वापर सोडण्यात यावा.
4. हे आदेश सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, मंडळे इत्यादींकडील वहनांच्या खाजगी वापरासाठीही लागू आहेत. मंत्रालयातील संबंधीत प्रशासकीय विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या सार्वजनीक क्षेत्रातील उपक्रम, मंडळे इत्यादींच्या नजरेस हे आदेश आणावेत.
5. हे आदेश दि.०१ऑगस्ट २००५ पासून अंमलात येतील

उपरोक्त शासन निर्णयान्वये, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०५/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४६७ दि.०१/०६/२००८ पासुन रुपये ८/- प्रति कि.मी. दराने प्रचलित पध्दतीनुसार आकारणी करणेत यावी, असे ठरले होते.

आता, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वाहन-२०१४/प्र.क्र.२३/१४/विनियम, मंत्रालय, मुंबई दि.३० मे, २०१४ नुसार खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे

इंधनाच्या दरात झालेली वाढ, वाहनांच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च तसेच वाहन चालकांचा पगार या बाबींवरील खर्चा झालेली वाढ लक्षात घेता शासकीय वाहनांचा खाजगी कामासाठी वापर केल्यास आकारण्यात येणा-या दि.०८/०७/२००५ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या दरामध्ये वाढ करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुषंगाने शासन आता खालीलप्रमाणे सुधारणाकरण्यात येत आहे.

**सुधारीत शासन निर्णयः-**

1. पेट्रोल/ डिझेल/ सी.एन.जी. वर चालणा-या सर्व शासकीय वाहनांच्या खाजगी वापरासाठी या पुढे सरसकट रु.१२/- (रुपये बारा) प्रति किलोमीटर या दराने वसुली करण्यात यावी. शासकीय वाहनाच्या खाजगी वापरासाठी कमाल मर्यादा प्रति महा ७०० किलोमीटर इतकी राहील. तथापि, अपवादात्मक बाबतीत सदर

मर्यादा ओलांडल्यास ७०० किलोमीटरच्या पुढील अंतरासाठी रु१८/- (रुपये अठरा) प्रति किलोमीटर या दराने वसुली करण्यात यावी.

2. शासकीय वाहन खाजगी वापरात असताना, त्यासाठी खोळंब्याचा (Detention) दर यापुढे प्रति तास रु.८/- व कमाल रु.८०/- प्रति दिवस इतका असेल. खोळंब्याचा काळ मोजताना पहिल्या तीन तासांचा वापर सोडण्यात यावा.

3. हे आदेश सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, मंडळे इत्यादींकडील वाहनांच्या खाजगी वापरासाठीही लागू आहेत. मंत्रालयातील संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, मंडळे इत्यादींच्या निदर्शनास हे आदेश आणावेत.

4. सदर सुधारणा या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

तरी उपरोक्त सुधारीत शासन निर्णयानुसार, संस्थान वाहनांचा खाजगी कामाकरीता वापराबाबतचा प्रस्ताव पुढील निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, न्यासाच्या/ समितीच्या वाहनांचा खाजगी कारणासाठी वापराबाबत वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वाहन-२०१४/ प्र.क्र.२३/ १४/ विनियम, मंत्रालय, मुंबई दि.३० मे, २०१४ या महाराष्ट्र शासनाच्या सुधारीत शासन निर्णयाची त्वरीत अंमलबजावणी करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.११** **वाहन क्र.एम.एच.17/ ए.जी- 2419 (रुग्णवाहिका) वाहनाचे झालेल्या वाढीव दुरुस्ती खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन क्रमांक MH-17-AG-2419 (टाटा विंगर) रुग्णवाहीकाचा वापर श्री साईबाबा हॉस्पीटल मधील रुग्णांना पुढील उपचाराकरीता दुस-या हॉस्पीटल मध्ये घेऊन जाणे कामी तसेच उपचारानंतर रुग्णांना घरी पोहचविणे कामी केला जात आहे.

वाहन चालकाचे दि.३०.१२.२०१५ चे तक्रारी नुसार इकडील विभागाचे मोटार मेकॅनिक यांनी प्रस्तुत वाहनाची तपासणी केली असता, वाहनाचे गिअर बॉक्स मध्ये आवाज येत असल्याचे तसेच सततच्या वापराने वाहनाचे क्लच प्लेट, प्रेशर प्लेट,खराब झाल्याचे प्राथमिक अवस्थेत आढळले.त्यामुळे सदर वाहनाची दूरुस्तीटाटा कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर्स स्टर्लींग मोटार्स बाभळेश्वर यांचेकडे वाहन अत्यावश्यक सेवेत असलेने तसेच दि.१५.०१.२०१६ चे मंजुर टिपणी नुसार पाठविण्यात आलेले आहे.

स्टर्लींग मोटार्स बाभळेश्वर यांनी प्रस्तुत वाहनाची तपासणी करुन दि.१८.०३.२०१६ चे ई-मेल व्दारे पाठविलेल्या संदर्भिय पत्रानुसार वाहनाचे स्पेअर पार्ट व लेबर चार्जेस असे मिळून रक्कम रु.३१,४३७/- (अक्षरी रक्कम रु.एकतीस हजार चारशे सदोतीस) मात्र खर्च कळविला आहे.

तरी प्रस्तुत वाहन अत्यावश्यक सेवेत असलेने टाटा कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर स्टर्लींग मोटर्स बाभळेश्वर यांचेकडून दुरुस्तकरुन घेणेस तसेच त्याकामी येणा-या रक्कम रु.३१,४३७/- चे खर्चास मान्यता मिळणे कामी विषयाची टिपणी मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, क्र.एम.एच.17/ ए.जी- 2419 (रुग्णवाहिका) हे वाहन अत्यावश्यक सेवेत असलेने टाटा कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर स्टर्लींग मोटर्स बाभळेश्वर यांचेकडून दुरुस्तकरुन घेणेस तसेच त्याकामी येणा-या रक्कम रु.३१,४३७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२** **वाहन क्र.एम.एच.17/ व्ही- ९९७७ चे दुरुस्तीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागातील वाहन क्रं.एमएच-१७/व्ही-९९७७ (टोयोटा ईनोव्हा) या वाहनाचा वापर मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचेसाठी संस्थानचे कार्यालयीन कामाकरीता होत आहे सदर वाहनाची यापुर्वी दि०२/१२/२०१५ रोजी वाहनाची इंजिन ऑईल बदली करण्यात आली, त्यावेळचे रिडींग एकुण १,९६,१४४ कि.मी. होते. कार्यालयीन वाहनाची कंपनी नियमाप्रमाणे १०,००० कि.मी. प्रवास झालेनंतर करण्यात येते. त्यानुसार वाहन विभागाकडील दि.०९/०५/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीनुसार, सदर वाहनाच इंजिन ऑईल, ऑईल फिल्टर, फ्युल फिल्टर बदली करणे, ब्रेक पॅड व लायनर चेक करणे व ऐनवेळी निघणारे किरकोळ दुरुस्तीचे काम वासन ब्रदर्स प्रा.लि., नाशिक यांचेकडून करुन घेणेस व या कामी येणाऱ्या अंदाजे रु.२४,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली होती.

त्यानुसार दि०९/०५/२०१६ रोजी सदर वाहन टोयोटा कंपनीचे अधिकृत डिलर, वासन ब्रदर्स प्रा.लि., नाशिक येथे सर्व्हिसींगचे कामाकरीता पाठविण्यात आले होते. त्यांनी सदर वाहनाची पुर्ण तपासणी केली असता सदर वाहनाचे सस्पेंशन लिक असल्याचे आढळल्याने तसेच ब्रेक पॅड व एअर बॅग सेंसार खराब झाल्याचे आढळुन आलेने त्याबाबत दुरुस्तीकरीता येणा-या खर्चाचा ई-मेल त्यांनी दि.०९/०५/२०१६ रोजी पाठविलेला असुन अंदाजे रक्कम रु.४८,५७६/- (अक्षरी रक्कम रु. अठेचाळीस हजार हजार पाचशे शेहात्तर) मात्र खर्च कळविलेले होता. सदर दुरुस्तीचे काम करुन घेणे आवश्यक असलेने तातडीची बाब म्हणुन करुन घेण्यात आलेले आहे. या कामी आलेल्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | पार्टीचे नांव | बिल नं/ दिनांक | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | वासन ब्रदर्स प्रा.लि., नाशिक | ६९३२/१०/०५/२०१६ | ४७,९०१.०० |
| | | **एकुण रक्कम (रु.)** | **४७,९०१.००** |

वरील प्रमाणे सदर वाहनाचे दुरुस्तीकामाकरीता प्रत्यक्षात एकुण रक्कम रु.४७,९०१/- मात्र खर्च आलेला आहे. म्हणजे मंजुर रक्कम रु.२४,०००/- मात्र पेक्षा रु.२३,९०१/- मात्र वाढीव खर्च आलेला आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे वाहन क्रं.एमएच-१७/व्ही-९९७७ (टोयोटा ईनोव्हा) चे दुरुस्तीकामाकरीता आलेल्या एकुण रक्कम रु.४७,९०१/- (अक्षरी रक्कम रु. सतेचाळीस हजार नऊशे एक) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३३३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, क्र.एम.एच.१७/ व्ही- ९९७७ (टोयोटा ईनोव्हा) या वाहनाचे दुरुस्ती कामाकरीता आलेल्या एकुण रक्कम रु.४७,९०१/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

विषय नं.१३ **गोदरेज टेबल खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल स्थापने पासून वर्गासाठी सनमायका टॉप टेबल खरेदी करुन शिक्षकांना वापरणेस देणेत आलेले होते.परंतु बेरेचशे टेबल नित्याच्या वापराने सनमायका टॉप, ड्रॉवर खराब झाल्याने अंतर्गत लेखापरिक्षक यांना समक्ष दाखवून व मंजुरी घेऊन कोटेशनचे उच्चत्तम दराने अभिलेखकक्ष विभागामार्फत विक्री करण्यात आलेली आहे.

तसेच मुख्याध्यापिका (प्राथमिक विभाग) व प्राचार्य (माध्यमिक विभाग) यांनाही गोदरेज सनमायका टॉप T 9 दोन नग ऑफीस टेबलची खरेदी करणे गरजेचे आहेत.

तसेच वर्गात शिक्षकांना वापरणेकामी गोदरेज सनमायका टॉप T 8 खरेदी करणे अत्यावश्यक आहे .त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | मालाचे वर्णन | नग | अंदाजे किमंत प्रति नग रु | एकुण किमंत. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | टेबल | सनमायका टॉप गोदरेज कंपनी T 8, दोन बाजू ड्रावर | ०८ | १२,०००/- | ९६,०००/- |
| ०२ | ऑफिस टेबल | सनमायका टॉप गोदरेज कंपनी T 9 दोन बाजू ड्रावर | ०२ | १८,०००/- | ३६,०००/- |
| | | | | एकुण | १,३२,०००/- |

**(अक्षरी एक लाख बत्तीस हजार मात्र रुपये)**

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी/शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** सदरचा खर्च फर्निचर खरेदी बजेटमधून करता येईल. त्यासाठी रुपये २००,०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-** ऑफीस टेबल T9 नग ०२, व शिक्षकांना वर्गात वापरणेकामी T8 नग ८, सनमायका टॉप टेबल खरेदी करुन ऑफीसची व शिक्षकांची अडचण दूर करता येईल. याकरिता अ.नगर जिल्हयातील होलसेल दुकानदारांकडून कोटेशन मागवून संस्थाचे विहीत पध्दतीने खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे ऑफीससाठी T9 सनमायका टॉप दोन बाजू ड्रॉवर,गोदरेज कंपनीचे ०२, टेबल व वर्गशिक्षकांसाठी सनमायका टॉप वर्गात वापरणेकामी T8 दोन बाजू ड्रावर ०८ खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव मा. व्य.मं. समिती सभेमध्ये सादर.

निर्णय क्र.३३४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे इंग्लिश मिडीयम स्कुलकडे ऑफीससाठी T9 सनमायका टॉप दोन बाजू ड्रॉवर असलेले गोदरेज कंपनीचे ०२ टेबल व वर्गशिक्षकांसाठी सनमायका टॉप वर्गात वापरणेकामी T8 दोन बाजू ड्रावर ०८ टेबल विहीत पध्दतीने खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

विषय नं.१४ **समाधी मंदिराचे सभामंडपाचे बाहेरील बाजूस असलेल्या भालदार-चोपदार मूर्तीची जागा बदलणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूज- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सूविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालविण्याचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १४ | समितीचे अधिका-यांचे अधिकार व कर्तव्ये | २ (घ) | भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ती तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेण्याचे; |
| ०३ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(क) | मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-** समाधी मंदिराचे समोरील बाजूस सभामंडपाचे बाहेरील मुख्य दरवाजाचे एका बाजुने भालदार व एका बाजूने चोपदार अशा दोन मूर्त्या भिंतीमध्ये फिट करण्यात आलेल्या आहेत. या मूर्ती उत्तर व दक्षिणेकडे मुख करुन बसविण्यात आलेल्या आहेत.

**प्रस्ताव-** पुर्वीच्या काळामध्ये प्रत्येक वाड्याचे बाहेरील बाजूस भालदार व चोपदार यांच्या मूर्ती दर्शनी बसविलेल्या असे. त्याच पद्धतीने समाधी मंदिराचे (बुटी वाड्याचे) सभामंडपाचे बाहेर भालदार व चोपदार यांचे मूर्ती बसविण्यात आलेल्या आहेत. या मूर्ती समाधी मंदिराचे सभामंडपाचे मुख्य लाकडी दरवाज्याचे मागे असल्याने दरवाजा लावण्यास अडचण निर्माण होत आहे. तसेच दरवाजा पुर्णपणे उघडता येत नसल्याने भक्तांच्या दर्शन रांगेमध्ये बाधा निर्माण होत असून भक्तांना या दरवाजाची ठेस लागत आहे. सदर मुर्त्या ह्या दरवाज्याचे मागे असल्याने दरवाजा उघडलेनंतर त्या वारंवार फुटतात. सध्याची जागा बदलून त्याच भिंतीला पुर्वेला दर्शनीय भागात लावलेस साईभक्तांना भालदार-चोपदार मूर्ती पाहता येईल. त्याकरीता सदर मूर्ती काढुन चांगली उत्तम प्रतीचे नवीन मूर्ती पुर्वेकडे मुख करुन समाधी मंदिराचे सभामंडपाचे दरवाजाचे बाहेरील दर्शनीय भागामध्ये लावणेबाबतचे काम बांधकाम विभागामार्फत करणेस मान्यता असावी, ही विनंती. तसेच त्याकामी बांधकाम विभागास लागणाऱ्या खर्चासही मंजूरी मिळणेस विनंती

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय-** याकामी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ नुसार वरील नमूद तरतूदीस अनुसरुन मा.त्रिसदस्यीय समितीची मान्यता घेतल्यानंतर सदरचे काम बांधकाम विभागामार्फत करता येईल, असे मत आहे.

तरी वरीलप्रमाणे बांधकाम विभागामार्फत श्रींचे समाधी मंदिराचे समोरील सभामंडपाचे दरवाजाचे मागील भालदार-चोपदारांचे मूर्तींची जागा हलविणेबाबत मान्यता असावी, ही विनंती.

तरी उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.३३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिराचे सभामंडपाचे बाहेरील बाजूस असलेल्या भालदार-चोपदार मूर्तींची जागा बदलणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.१५** **सिव्हील ॲप्लीकेशन नं.४७६४/ २०१६, ४७६५/ २०१६, ४७६६/ २०१६ मधील मा.उच्च न्यायालयाचे दि.०२.०५.२०१६ रोजीचे निर्देशाबाबत.**

**प्रस्ताव-** मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे कोर्टात श्री संदिप विजय कुलकर्णी यांनी खालील नमुद केलेले तीन सिव्हील ॲप्लीकेशन दाखल केले होते.

**१) सिव्हील ॲप्लीकेशन नं.४७६४/ २०१६–** प्रस्तुत सिव्हील अर्ज अर्जदाराने संस्थानचे हॉस्पीटल मधील मेडीसीन स्टॉक हा ऑनलाईन सर्वांना दिसावा अशी व्यवस्था करणेकामी संस्थानला निर्देश द्यावेत यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत सिव्हील अर्जा मध्ये संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल विभागाकडून प्राप्त झालेली खालील प्रमाणे माहिती मा. उच्च न्यायालयात सादर केली आहे.

अर्जदाराने मेडीसीन स्टॉकहा ऑनलाईन सर्वांना दिसावा ही केलेली मागणी संस्थान अधिनियम २००४ चे विसंगत आहे, तसेच मेडीकल प्रोफेशनल इथीक्सचे विरुध्द आहे. एखाद्या व्यक्तीने, अर्जदाराने किंवा माहितीचे अधिकारात मागणी केल्यास, त्यास मेडीसीन स्टॉक बाबत माहिती संस्थानकडून घेता येते, तसेच अर्जदाराने पॅरा नं. ३ मध्ये मेडीसीनचे दरा बाबत केलेल्या मागणीबाबत ज्यावेळी मेडीसीन खरेदी करते वेळी शासनाचे वेबसाईटवर ऑनलाईन टेंडर प्रोसेस करत्यावेळी मेडीसीनचे दर नमुद केलेले असतात, तसेच संस्थान कर्मचारी हे मेडीसीनचा गैरवापर करतात याबाबत केलेल्या म्हणण्याला काहीही अर्थ नाही, त्यामुळे अर्जदाराने ऑनलाईन मेडीसीन स्टॉक बाबत माहिती उपलब्ध करुन देणेबाबत केलेल्या विनंतीचा विचार करता येणार नाही असे म्हणणे मा. कोर्टात मांडले आहे.

**२) सिव्हील ॲप्लीकेशन नं.४७६५/२०१६ –** प्रस्तुत सिव्हील अर्ज अर्जदाराने साईभक्तांना टोकन देवून दर्शनाची वेळ ठरवून द्यावी तसेच दर्शनरांगेत किती साईभक्तआहेत, किती साईभक्त दर्शन घेवून बाहेर आले आहेत, हीसर्व माहिती डिस्पलेबोर्डवर दिसेल अशी व्यवस्था करणेकामी संस्थानला निर्देश द्यावेत यासाठी दाखल केला आहे, प्रस्तुत सिव्हील अर्जा मध्ये संस्थानचे माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून प्राप्त झालेली खालील प्रमाणे माहिती मा. उच्च न्यायालयात सादर केली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २०/०८/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २८७ नुसार तिरुमला तिरुपती देवस्थान (टीटीडी) येथे मा. कार्यकारी अधिकारी, मा. उपकार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग व प्र.अधिक्षक माहिती व तंत्रज्ञान विभाग हे दर्शन रांग व्यवस्थापनाचे अभ्यास दौ-यासाठी गेले होते, तेथील दर्शन रांग व्यवस्था ब-याच प्रमाणात संस्थानने केलेल्या दर्शन रांगेप्रमाणेच आहे, त्यामध्ये थोडेफार प्रमाणात बदल करावे लागतील, सदरचे बदलाबाबत मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेवून कार्यवाही करता येईल असे म्हणणे मा. कोर्टात मांडले आहे.

**३) सिव्हील ॲप्लीकेशन नं.४७६६/२०१६ –** प्रस्तुत सिव्हील अर्ज अर्जदाराने संस्थानचे भांडार व साईप्रसादालय विभागाकडील किराणा माल स्टॉकहा ऑनलाईन सर्वांना दिसेल अशी व्यवस्था करणेकामी संस्थानला निर्देश द्यावेत यासाठी दाखल केला आहे, प्रस्तुत सिव्हील अर्जामध्ये संस्थानचे भांडार व साईप्रसादालय विभागाकडून प्राप्त झालेली खालील प्रमाणे माहिती मा. उच्च न्यायालयात सादर केली आहे.

भांडार विभाग- सर्व मालाच्या रजिस्टर मधील सर्व नोंदी पुर्वापार पध्दतीने अद्ययावत केलेल्या असतात, त्याची मागणी केल्यास सदर रेकॉर्ड नियमानुसार संबंधीतास केव्हाही उपलब्ध करुन देणे शक्य आहे, यापुर्वी अंशतः सुरु असलेली ई आर पी सिस्टम दि. ०१/०४/२०१६ पासून पुर्णपणे चालू करणेबाबत कार्यवाही सुरू केली आहे अर्जदाराने मागणी केलेले सॉफ्टवेअर उपलब्ध झाल्यास व संबंधीत विभागांनी त्यांचे संबंधीत माहिती विहित वेळेत सॉफ्टवेअर मध्ये भरल्यास ती वेबसाईटवर प्रसिध्द करता येईल.

साई प्रसादालय विभाग – प्रसादालय विभागाकरीता लागणारा किराणा माल, धान्य यांची माहिती संस्थानचे वेबसाईटवर उपलोड करावयाची झाल्यास प्रथमतः मध्यवर्ती भांडार विभागात आवश्यक ती संगणक प्रणाली आय.टी. विभागामार्फत कार्यान्वीत होणे आवश्यक आहे, तशी प्रणाली कार्यान्वीत झाल्यास उपभांडार विभागात संगणकावर सदरहू नोंदी घेवून उचित कार्यवाही करता येईल असे म्हणणे मा. कोर्टात मांडले आहे.

प्रस्तुत तीनही सिव्हील अर्जा मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. ०२/०५/२०१६ रोजी खालील प्रमाणे आदेश केला आहे.

Heard counsel for the Applicants and Respondent no.2.

2] Perused the application. Although the petitioner has claimed the relief by way of directions, the reliefs claimed in the applications are more in the nature of suggestions. It is therefore, desirable that the suggestions as put forth by the applicants to bring improvement in the administration as well as to bring transparency in the work with Shirdi Sansthan be considered by the ad-hoc committee appointed to manage the affairs of the Shirdi Sansthan.

3] We therefore, direct that these applications be considered as representation made by the applicants to the Ad-Hoc committee appointed by the Court. The Counsel for the Respondent No.2 is directed to forward the applications to Chief Executive Officer Shirdi Sansthan who in turn is directed to place the applications with Annexures before the Ad-Hoc Committee for its consideration to take appropriate decision. It would be desirable if the Committee allows the Applicants to appear before the Committee and put forth their views in the matter. We direct the committee to take appropriate decision within three months from the date of this order, With these directions, applications stand disposed of.

प्रस्तुत आदेशात मा.उच्च न्यायालयाने मेडीसीन स्टॉक, किराणा माल स्टॉक व साईभक्तांना दर्शन टाईम टोकनबाबत मा. त्रिसदस्य समितीने आदेशाचे (दि.२/५/२०१६) तारखेपासुन तीन महिन्यात निर्णय घेणेबाबत सुचीत केले आहे. तरी मा. उच्च न्यायालयाचे निर्देशाबाबत निर्णय होणेसाठी सादर.

**निर्णय क्र.३३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिव्हील ॲप्लीकेशन नं.४७६४/ २०१६, ४७६५/ २०१६, ४७६६/ २०१६ मधील मा.उच्च न्यायालयाचे दि.०२.०५.२०१६ रोजीचे निर्देशाबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली असून त्याची नोंद घेण्यात आली.**

**तसेच संबंधीत अपीलकर्त्यांना सभेची तारीख व वेळ देण्यात येऊन, सभेमध्ये उपस्थित राहणेबाबत लेखी कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.१६** **जनहित याचीका क्र.२५/ २०१२ मधील चौकशी अधिकारी श्री.पी.एस. परांजपे साहेब यांनी केलेल्या चौकशीचे अहवालाबाबत.**

**प्रस्ताव-** मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे कोर्टात श्री संजय भा. काळे यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक २५/२०१२ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. १०/१२/२०१४ रोजी

दिलेल्या आदेशाने चौकशी अधिकारी श्री पी.एस. परांजपे साहेब रिटायर्ड प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज, यांची नेमणुक केली होती.

श्री ॲड. पी.एस. परांजपे साहेब, चौकशी अधिकारी यांनी चौकशीचे कामकाजासाठी दि. २४/०१/२०१५, दि. १४/०२/२०१५, दि. ०८/०३/२०१५, दि.१२/०४/२०१५, दि. १३/०५/२०१५, दि. १४/०५/२०१५, दि. १४/०६/२०१५ दि. १२/०७/२०१५, दि. ०२/०८/२०१५ रोजी शिर्डी येथे उपस्थीत राहून वेळोवेळी पिटीशनर व रिस्पॉन्डंट यांचे शपथपत्र घेवून दि ०२/०८/२०१५ रोजी तोंडी ऑर्ग्यूमेंट करणेस सांगीतले त्याप्रमाणे काही रिस्पॉन्डंट यांचे प्रतिनिधींनी तोंडी ऑर्ग्यूमेंट केले आहे. सदरचे चौकशीचे कामकाज पुर्ण करुन केलेल्या चौकशीचा अहवाल दि. १८/०२/२०१६ रोजी मा. उच्च न्यायालयात दाखल केला असून त्याची प्रत संस्थानला दिली आहे. पी.आय.एल. २५/२०१२ मध्ये संजय काळे यांनी उपस्थीत केलेले मुद्दे व त्यावर चौकशी अधिकारी यांनी दिलेला अहवाल खालील तक्त्यात थोडक्यात नमुद केला आहे.

| अ.क्र. | तक्रारदाराचा मुद्दा | चौकशी अधिकारी यांचा थोडक्यात अहवाल. |
|---|---|---|
| ए. | संस्थानचे लाडू काऊंटर मंदीर परिसराचे बाहेर काढून एम्प्लॉईज सोसायटीचे पेढे विक्री करणेकामी जागा करुन दिली. | प्रस्तुत प्रकरणी तक्रारदारांचे असे म्हणणे आहे की, काही अंतस्थ हेतुने जाणून बुजून काही कामे श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को. सोसायटीकडे आऊटसोर्स करण्यात आली, मंदिर परिसरात ६ स्टॉल्स सोसायटीला लिजवर देण्यात आली सदर स्टॉल्स मधून सोसायटीने भक्तांना पेढयांची विक्री केली, तक्रार दारांचे असे स्पष्ट म्हणणे की, दररोज १५०० किलो इतक्या वजनाची विक्री करण्यात आली, प्रति किलो रु. ४०/- इतक्या नफ्याने सोसायटीला दररोज रु. ६०,०००/- इतका नफा झालेला आहे. सदर नफा संस्थानला मिळाला असता परंतू कोणतेही सबळ कारण नसतांना सोसायटीकडे वळविण्यता आला.<br>तसेच चप्पल स्टॅन्ड व मोबाईल स्टॅन्ड मधून सोसायटीला रुपये एक ते दिड लाख नफा झालेला आहे.<br>चौकशी कामी सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन सोसायटीची घटना पहाता, सोसायटीस फक्त जिल्हा सहकारी बॅंके कडून कर्ज घेवून ते कर्मचारी सभासदास कर्ज उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे.<br>माझे असे स्पष्ट मत आहे की, सदर कामे सोसायटीला आऊटसोर्स करण्योच कोणतेही कारण नाही.<br>सोसायटीकडून संस्थानला वार्षीक रुपये ३,४१,५२०/- इतके अत्यल्प भाडे मिळते. तर सोसायटीला दरमहा साधारण ६० लाख रुपये इतके उत्पन्न मिळूशकते ते संस्थान तिजोरीत जमा झाले असते, म्हणून माझे असे मत आहे की, सदर कामे सोसायटीला आऊट सोर्स करण्याचे कोणतेही कारण नाही.<br>मला असे सांगण्यात आले आहे की, संस्थानकडे फार मोठ्या प्रमाणात कर्मचारी आहेत, आणखी ५० कर्मचारी वाढून सदरच्या सोयी सुवीधा संस्थान मार्फत साईभक्तांना उपलब्ध करुन देणे संस्थानला शक्य आहे, याबाबत प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा. सदरचे काम आऊटसोर्सींग व्दरे केले यामध्ये विश्वस्तांचा फौजदारी स्वरुपाचा गुन्हा आहे असे मला वाटत नाही.<br>**विद्यमान मा. जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर व प्रशासनाने सदरचे व्यवसाय आऊटसोर्सींगने चालविण्यास देणेबाबत गांभीर्याने विचार करावा.** |
| बी. | तत्कालीन विश्वसतांचे विरुध्द बेकादेशीर वाहनाचे बीले घेतल्याने क्रिमीनल केसेस दाखल केलेल्या आहे. | सदर विश्वस्तांचे विरुध्द मा. कोर्टात प्रकरण चालू असून ते न्याय प्रविष्ठ आहे. त्यामुळे सदर प्रकरणी चौकशी अधिकारी यांनी काहीही निर्णय दिलेला नाही. जर अर्जदाराला माजी विश्वस्तांचे विरुध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करावयाचा असल्यास त्यास मोकळीक आहे. |
| सी. | विश्वस्तांनी त्यांचे पाहुण्यांसाठी संस्थानच्या निवासस्थानांचा गैरवापर केलेला आहे. | विश्वस्तांनी त्यांचे पाहुण्यांसाठी संस्थानचे निवासस्थानांचा वापर केला त्यात फौजदारी स्वरुपाचा गुन्हा असल्याचे दिसून येत नाही.<br>**व्हि.व्ही.आय.पी. गेस्ट हाऊस येथे काम करणा-या कर्मचा-यांनी रुम वापरांस देतेवेळी रुमचा सेवा आकार घेणे आवश्यक होते, हा सदर कर्मचा-यांचा निश्कळजीपना आहे, सदर कर्मचा-यांची फारतर प्रशासनामार्फत अंतर्गत चौकशी करता येईल.** |
| डी. | श्री राधाकृष्ण विखे पा. त्यावेळी विधी व न्याय विभागाचे मंत्री होते, त्यांनी संवत्सर येथे पालखी थांबा बाबत त्यांचे पदाचा दुरुपयोग केला. | संवत्सर येथील पालखी थांबा बांधणेबाबत तत्कलीन विश्वस्त व विधी व न्याय विभागाचे मंत्री श्री राधाकृष्ण विखे पा. यांनी संस्थानचे तत्कालीन विश्वस्तांवर आपला प्रभाव टाकून संवत्सर गांवामध्ये संस्थान मार्फत मोठ्या प्रमाणात रक्कम खर्च करुन, आवश्यकता नसतानाही पालखी थांब्याचे बांधकाम केले आहे. तथापी याबाबत काही प्रमाणात पक्षपात झालेला असू शकतो परंतू निश्चीतपणे फौजदारी स्वरुपाचा गुन्हा घडलेला नाही, तरी सुध्दा तक्रारदारास स्वतंत्र पणे संबंधीत ट्रस्टींचे विरुध्द योग्य त्या न्यायालयात दाद मागता येईल. तसेच संस्थानने शिर्डी येथे पायी येणा-या भक्तांसाठी मुंबई, हैद्राबाद, आमदाबाद |

| | | |
|---|---|---|
| | | इ. ठिकाणाहून येणा-या भक्तांसाठी पालखी थांबे बांधलेले आहे. त्या पर्श्वभूमीवर निव्वळ संवत्सर येथे भक्तनिवास बांधले म्हणून फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करता येऊ शकनार नाही. तसेच संस्थान प्रशासनास विनंती करण्यात येते की, मोठ्या प्रमाणावर संस्थानची रक्कम खर्च झाली असल्यामुळे सदर पालखी थांबा संस्थानने स्वतः चालवावा, ग्रामपंचायतीस चालविण्यास देण्यात येऊ नये.<br>**(टिप- संवत्सर येथे संस्थानने कोणत्याही प्रकारचा पालखी थांबा बांधण्यात आला नाही.)** |
| ई. | संस्थानने जिल्हा परिषद शाळेसाठी बेकायदेशीर पणे बेंचेसचे वाटप केले. | सन २००५ सालात रक्कम रुपये ३४,७०,१०,३००/- रक्कमेचे अहमदनगर जिल्हयातील एकुण २,९३४ शाळेंसाठी, एकुण विद्यार्थी ३,३०,४८५ विद्यार्यांना एकुण १,६५,२४३ बेंचेस पुरविणेकामी खरेदी करणेचा निर्णय झाला होता. शासनाने सदर बेंचेस खरेदीसाठी रक्कम रुपये २४,७०,१०,३००/- दिलेले आहेत सदर बेंचेस खरेदीसाठी संस्थानने १० कोटी रुपये संस्थान अधिनियम २००४ अन्वये कलम २१ (२)(१) अन्वये,शासनांची मान्यता घेऊन दिलेले आहे. त्यावेळी जिल्हा परिषद अहमदनगर च्या अध्यक्षा सौ शालीनीताई होत्या.<br>परंतु प्रस्तुत प्रकरणी शासनाची मान्यता घेणेची कार्यवाही अनियमित स्वरुपाने केलेली आहे. बेकायदेशीर स्वरुपाची नाही, सदर कृत्य हे आय पी सी अंतर्गत कोणत्याही कलम अंतर्गत फौजदारी स्वरुपाचा गुन्हा नाही.<br>सदर बेंचेस वाटप करतांना जिल्हा परिषद अहमदनगर च्या अध्यक्षा सौ शालीनीताई यांनी वशिलेबाजीने त्यांच्या तालुक्यातील त्यांच्या मतदारसंघामध्ये येणा-या शाळेंना बेंचवाटपास प्राधान्य दिले,असे नमुद केले. परंतु शासनाने त्याप्रमाणे बेंचेस वाटप केलेले नाही. त्यामुळे सदर कृत्यासाठी विश्वस्तांना दोषी धरता येणार नाही.<br>संस्थानचे अधिनियम २००४ मधील कलम २२ नुसार वेलफेअर फंड खर्च करणेकामी शासनाची मान्यता घेतलेली आहे. त्यामुळे सदरचे कृत्य हे फौजदारी स्वरुपाचे असल्याचे दिसून येत नाही. यावर अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार प्रकरणी सरकारी व खाजगी केस कायदा कलम ११६(३) सी.आर.पी.सी. नुसार मा.ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट यांचेकडे खाजगी फौजदारी केस दाखल करु शकतो. मा.ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट चौकशी करुन प्रथमदर्शनी सदरचे कृत्य हे गुन्हेगारी स्वरुपाचे आहे की नाही हे ठरवतील. |
| एफ. | संस्थानने विमान विकास कंपनीला विमानतळ बांधकाम करणेकामी दि. ०५/०७/२०११ व दि. २७/०७/२०११ रोजी रु. ३५ कोटी रुपये घटना बाह्य व अनाधिकृत पणे दिलेले आहे. | सदर प्रकरणी संस्थान अधिनियम २००४ मधील कलम २२ नुसार शासनाची मान्यता घेतलेली आहे. त्यामुळे सदर प्रकरणी विश्वस्तांनी केलेला ठराव मंजूर केला याला फौजदारी कृत्यकेले असे म्हणता येणार नाही. |
| जी. | बेकायदेशीररित्या काही सरकारी अधिकारी व कर्मचारी संस्थानचे जागेत राहण्यासाठी निवासस्थाने दिली. | अर्जदारांनी असा आरोप केला की, असिस्टंट सुपरिंटेंन्डट ऑफ पोलीस श्री श्रीकांत जावळे, तहसिलदार, श्री राहुल मुंडके, शिर्डी नगरपंचायतचे मुख्याधिकारी,श्री शिवाजी खोसे, यांना संस्थानने रहाणेसाठी निवासस्थान दिले आहे.<br>तसेच काही संस्थानचे क्वार्टर्स कॉन्स्टेबल श्री रमेश बोरुडे, बाळासाहेब मधुकर यादव, पुंजाराम ढवळे, यांना रहाणेसाठी दिले, परंतु त्यांचे समवेत सदर कवार्टर्स त्यांना वापरास दिले त्याबाबत करारनामा योग्य कालावधीत केलेला नाही. त्यांचेकडुन संस्थानने रेंट मुदतीत वसुल केले नाही.<br>सदरचे आरोपा बाबत विश्वस्तांना दोषी ठरवता येणार नाही. रेंट मुदतीत वसुल करण्याची जबाबदारी संस्थानचे अधिकारी यांची आहेसदर कर्मचा-यांना क्वार्टर्स संस्थानने वापरांसाठी देणेचे कारण म्हाजे सदर कर्मचारी संस्थानचा कामासाठी मदतीचे आहेत सदर कर्मचा-यांना संस्थानचे वापरांसाठी दिलेल्या क्वार्टर्सचे रेंट सदर कर्मचा-यांच्या पगारातुन संस्थानकडे मुदतीत जमा होत होते.<br>सदर प्रकरणी विश्वस्तांना जबाबदार धरता येणार नाही.<br>**सदर निवासस्थानांचे नियमीतपणे भाडेवसुल करण्याचे काम संस्थानचे कार्यालयाचे आहे. तसेच रुम वापरांस देणे व रेंट आकारणेबाबत संस्थान प्रशासनाने त्याकामी नियमावली तयार करणे आवश्यक आहे.** |

| | | |
|---|---|---|
| एच. | साईटेक प्रोजेक्ट कॉग्नीझंट कंपनी चेन्नई यांना दिलेला आहे, त्याचे ॲग्रीमेंट पोस्ट फॅक्टो केले आहे, जानेवारी २०११ पासून जुन २०११ पावेतो काम पुर्ण होणे आवश्यक होते, परंतू ६ जुन २०११ मध्ये पहिले पेमेंट रिलीज झाले आहे व संस्थानला आर्थीक नुकसान केलेले आहे. | सदर प्रकरणी श्री रमणी यांचे मुळे कॉग्नीझंट कंपनीला काम दिल्यामुळे व त्यांनी काम विहीत मुदतीत पुर्ण न केल्यामुळे करारातील अटींचे उलंघन झाले आहे. त्यामुळे संस्थानला नुकसान सहन करावे लागले, करारातील अटी शर्ती नुसार सदर कंपनी वेळेत काम पुर्ण करत नसेल तर संस्थानला सदर कंपनी विरुध्द योग्य त्या न्याय कक्षेत दाद मागता येते.<br>परंतू विश्वस्तांना सदर प्रकरणी दोषी धरता येणार नाही.<br>**सदर कंपनीने करारातील अटी नुसार काम करण्यास विलंब केला असल्यास सदर कंपनी विरुध्द योग्य त्या कोर्टाकडे नुकसान भरपाई मागण्याची मुभा आहे.** |
| आय. | शिर्डी नगरपंचायतीने बी.ओ.टी तत्वावर साई कॉम्प्लेक्स आणी राधाकृष्ण विखे पा. व्यापारी संकुल बांधण्यास परवानगी दिली सदर इमारतीच्या बांधकामामध्ये व कंम्प्लीशन सर्टफिकेट देण्यामध्ये काही नियमांचे उल्लंघन झाले आहे. | याबाबत शिर्डी नगरपंचायत, संबंधीत बिल्डर विरुध्द योग्य ती कारवाई करु शकते आणी याबाबत विश्वस्तांना जबाबदार धरता येऊ शकत नाही.<br>तक्रार दारांची अशी तक्रार आहे की, संस्थानने नगरपरिषद (कोपरगांव) यांना पालखी रोडच्या कामासाठी १,१२,४९,४१०/- इतकी आर्थीक मदत केलेली असूनही काम पुर्ण करण्यात आलेले नाही तरी ही त्याबाबत विश्वस्तां विरुध्द फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्याचे कारण होऊ शकत नाही.<br>अपुर्ण कामासाठी नगरपरिषद जबाबदार असून, त्यास विश्वस्त जबाबदार नाहीत.<br>**त्याबाबत शिर्डी संस्थानने, नगरपरिषदेला कामाच्या दिरंगाईबाबत नाराजी दर्शविण्याचे कळवावे.** |
| जे. | विश्वस्तांनी त्यांचे मतदारांना हॉस्पीटल सुविधेच्या बीलामध्ये बेकायदेशीर सवलती दिलेल्या आहे. | तक्रार दाराची अशी तक्रार आहे की, काही विश्वस्तांनी राजकीय हेतूने रुग्णांचे हॉस्पटल बीलात काही सवलती दिल्या.<br>तथापी, रुग्णांच्या बीलात देण्यात आलेल्या सवलती या राजकीय हेतूने किंवा वशीलेबाजीने दिल्या हे ठरविणे अत्यंत अवघड आहे.<br>हे सत्य आहे की, भक्तांच्या देणगीतून संस्थानने सुपर स्पेशालीटी रुग्णालय उभारले असून, सदर हॉस्पीटल व्दारे परिसरातील रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरविण्याचे मोलाचे कार्य करण्यात येत आहे. प्रत्येक रुग्णाच्या आकडेवारी शिवाय बीलातील सवलती राजकीय हेतूने, वशीलेबाजीने किंवा मानवता वादी दृष्टीकोणातून दिल्याचे अनुमान काढणे अत्यंत कठीण आहे. आस पासच्या परिसरातील लाभार्थी ची संख्याफार मोठी आहे. परंतू असे म्हणता येत नाही की, काही रुग्णांना काही सवलती दिल्या म्हणजे विश्वस्तांना त्यांची आर्थीक परिस्थीती माहित असू शकते असे नाही. त्यामुळे विश्वस्तांनी कोणतेही गुन्हेगारी स्वरुपाचे कृत्य केलेले नाही.<br>माझे असे मत आहे की, काही रुग्णांना सवलती दिल्या म्हणून, विश्वस्तांविरुध्द फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्याचे सबळ कारण ठरु शकते.<br>**प्रशासनाने रुग्णांच्या बीलात सवलती देण्याबाबतची नियमावली तयार करणे.** |
| के. | संस्थानचे सन २००५-२००६ ते सन २००८ -२००९ चे ऑडीट रिपोर्ट मध्ये, ऑडीटर्सने काही पात्रता/ अहर्तता नमुद केल्या आहेत.<br>"व्यवस्थापन समिती सदस्यांचे इतर फर्म/कंपन्या मध्ये काही हितसंबंध आहेत किंवा कसे याबाबत माहिती मिळविण्यासाठी संस्थानकडे कोणतीही व्यवस्था नाही की, ज्यामुळे ऑडीटर्सना विश्वस्तांचे सदस्यांचे हितसंबंधा बाबत काही भाष्य कारता येईल संस्थान अधिनियम २००४ च्या सेक्शन ९ (१)(डी)(ई) व सुधारीत शासन निर्णय जर सदस्यांचे असे हितसंबंध असतील तर ते व्यवस्थापन समिती सदस्य होण्यासाठी अपात्र ठरु शकतात." | याबाबत संबंधीत ऑडीटरने, विश्वस्तांनी कोणत्याही गुन्हेगारी स्वरुपाचे कृत्य केले असल्याचे नमुद केलेले नाही, तसेच सन २००८-२००९ नंतरच्या ऑडीट रिपोर्टस मध्ये सदर पात्रता/ अहर्तता नमुद केलेल्या नाहीत. आणी म्हणून कोणत्याही विश्वस्तांच्या विरुध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्याचा प्रश्नच नाही. |

| | | |
|---|---|---|
| एल. | तक्रार दाराने संस्थान व जिल्हा परिषद यांचेत झालेल्याजागेच्या आदलाबदली मध्ये संस्थानचे नुकसान झालेले आहे अशी तक्रार आहे. | सदर अदलाबदली मध्ये बाजारभाव ग्राह्य न धरता परस्परांची सोयीला प्राधान्य असते, जर विकास आराखड्याला काही बाधा पोहचत असेल तर सदर अदलाबदलीतील काही अनियमीतता असेल तर, ती अनियमीतता आहे, त्यामुळे सदर जागेची अदलाबदल बेकायदेशीर नाही. |
| एम. | संस्थानने येसगांव येथे अनाधिकृत पणे साईभक्तांसाठी पालखी थांब्याचे बांधकाम केले | सदर प्रकरणी येसगांव ग्रामपंचायतीने भक्तनिवास बांधकामासाठी १० गुंठे जागा संस्थानला देणार असल्याचा ठराव केला होता. तथापी सदरची जागा संस्थानचे नावावर वर्ग / नोंद झालेली नसतांनाही घाई घाईने टेंडर काढून वाघ बिल्डर्स् यांना सदरचे कामाचा ठेका देण्यात आला, सदर कामी रु. ४१,८९,५९०/- इतका खर्च झालेला आहे. ज्या जागेत भक्तनिवास बांधण्यात आले आहे. ती जागा अद्यापही संस्थानकडे हस्तांतरी झालेली नसुन ग्रामपंचायत येसगांव यांचे नावावर आहे त्यामुळे संस्थानचे तत्कालीन प्रशासक संस्थानचे हित जपण्यात अयशस्वी ठरले आहेत.<br>तथापी सर्वबाबी विचारात घेता सदर प्रकरणात विश्वस्तांकडून कोणत्याही प्रकारची अफरातफर केलेली आहे असे म्हणता येत नाही, सदर प्रकरणी वशीलेबाजी झालेली असू शकते कारण भक्तनिवासाचे बांधकाम हे मंगल कार्यालयाच्या अगदी शेजारी करण्यता आलेले आहे, त्यामुळे सदर भक्तनिवासाचा वापर मंगल कार्यालयातील व-हाडीमंडळींच्या निवासासाठी केला जाऊ शकतो. तसेच सदर भक्तनिवासाचे व्यवस्थापन संस्थान मार्फत केले जाणार आहे की, सदर भक्तनिवासाच्या चाव्या अद्यापही ग्रामपंचायत यांच्याच ताब्यात आहेत हेही स्पष्ट होत नाही.<br>**सदर विषयी, विविध विभागांनी सदर बांधकाम नियमीत करण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न करुनही काही अनियमीततेची अद्यापही पुर्तता करणेबाकी आहे. त्यामुळे संस्थान प्रशासकास विनंती की, संस्थानचे हित जपण्यासाठी सर्वबाबींची पुर्तता करुन घेणे.**<br>**संस्थान प्रशासनास सर्वबाबींची सह महिन्यांचे कालावधीत पुर्तताकरुन घेण्यास विनंती आहे. आणी भक्तनिवासाच्या जागेचे संस्थानचे नावावर हस्तांतरण करुन घ्यावे आणी यापुढे शक्य झाल्यास सदर भक्तनिवासाची व्यवस्थापन संस्थान कर्मचा-या मार्फत करण्यात यावी.**<br>माझे असे स्पष्ट मत आहे की, यामध्ये संस्थानच्या अधिका-यांकडून काही तृटी व निष्काळजीपणा झालेला असला तरीही, कोणाही विरुध्द गुन्हेगारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करता येवू शकणार नाही किंवा संस्थान अधिका-यांच्या असहाय्यते मुळे ही झालेले असू शकते<br>मी आधीच नमुद केल्यानुसार सदर बाब काही विश्वस्तांच्या वशीलेबाजी मुळे झालेले असू शकते परंतू निश्चितपणे गुन्हेगारी स्वरुपाचे कृत्य ठरु शकत नाही. |

उपरोक्त प्रमाणे मुद्यांचे संदर्भात चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्याअहवाला संदर्भात थोडक्यात माहिती सादर आहे. तसेच संबंधीत सर्व विश्वस्तांना सदर अहवालाच्या प्रती टपालाने पाठविणेचे निर्णयार्थ सादर. (सोबत अहवालाची इंग्रजी प्रत जोडली आहे.

**निर्णय क्र.३३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जनहित याचीका क्र.२५/ २०१२ मधील चौकशी अधिकारी श्री.पी.एस. परांजपे साहेब यांनी अहवाल सादर केलेला आहे. सदरचा विषय मा.उच्च न्यायालयासमोर प्रलंबीत आहे व मा.उच्च न्यायालयाचे त्याबाबत कोणतेही निर्देश नाहीत. तेव्हा हा अहवाल मा.उच्च न्यायालयाने स्वीकारला किंवा कसे याबाबत संबंधीतसंस्थानचे वकिलाचा स्पष्ट अहवाल मागविणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.१७** **जनहित याचीका क्र.२५/ २०१२ मधील चौकशी अधिकारी श्री.पी.एस. परांजपे साहेब यांचे चौकशी कामाकाजाचे उर्वरित बील अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे कोर्टात श्री संजय भाकाळे यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक २५/२०१२ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. १०/१२/२०१४ रोजी दिलेल्या आदेशा नुसार चौकशी अधिकारी श्री पी.एस. परांजपे साहेब रिटायर्ड प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज, यांची नेमणुक करण्यात आली होती.

श्री.ॲड.पी.एस. परांजपे साहेब, चौकशी अधिकारी यांनी दि.२४/०१/२०१५ पासून चौकशीचे कामकाजास सुरुवात केली. ते चौकशीकामी दि. २४/०१/२०१५ , दि. १४/०२/२०१५ व दि. ०८/०३/२०१५ रोजी उपस्थित होते. सदर चौकशीचे कामकाजाचे तीन बीले मा. श्री पी.एस. परांजपे साहेबयांनी दि.१०/०३/२०१५ रोजी संस्थानला सादर केली असुन त्याचा खालील प्रमाणे तपशिल आहे.

| अ.नं. | चौकशीकामी हजर दिनांक | बील / दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १) | दि. २४/०१/२०१५ | पीएसपी /१४-१५/५५<br>दि. १०/०३/२०१५ | २५,०००/- |
| २) | दि. १४/०२/२०१५ | पीएसपी /१४-१५/५७<br>दि. १०/०३/२०१५ | २५,०००/- |
| ३) | दि. ०८/०३/२०१५ | पीएसपी /१४-१५/६०<br>दि. १०/०३/२०१५ | २५,०००/- |
| ४) | इतर खर्च बील | पीएसपी /१४-१५/६२<br>दि. १०/०३/२०१५ | १५,०००/- |
| | | **एकुण रक्कम रुपये** | **९०,०००/-** |

चौकशी अधिकारी, मा. श्री पी.एस. परांजपे साहेब, यांनी मागणी केल्या प्रमाणे तीन तारखांची रक्कम रु. ९०,०००/- दिले अदा करणेचे कार्यात्तर मंजूरीस सादर व पुढील येणारे बीले अदा करणेचे निर्णयार्थ सादर असा विषय मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०५/०५/२०१५ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. १४४ अन्वये प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, "जनहित याचीका क्र. २५/२०१२ मधील चौकशीचे कामकाजाकामी चौकशी अधिकारी, मा. श्री पी.एस.परांजपे साहेब यांना त्यांनी मागणी केल्या प्रमाणे तीन तारखांची रक्कम रु. ९०,०००/- मात्र फी सध्या अदा करण्यात यावी. तसेच चौकशी अधिकारी यांना प्रत्येक तारखेस किती फी द्यावी, याबाबत विधीज्ञा कडून मार्गदर्शन घेण्यात येवून फी निश्चीत करण्यात यावी, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली असल्याचा निर्णय झालेला आहे."

प्रस्तुत ठरावास अनुसरुन दि. ०६/०६/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीने व जाक्र. एसएसएस वशी-विधी/२१६९/२०१५ दि. २०/०७/२०१५ चे पत्राने कोपरगांव येथील ॲडव्होकेट श्री एस.एम.वाघ, कोपरगांव यांना मा. श्री पी.एस.परांजपे, चौकशी अधिकारी यांना जनहित याचीका क्र. २५/२०१२ मध्ये चौकशी कामकाजाकामी अदा करावयाचे फी बाबत मार्गदर्शन करणेबाबत विनंती करण्यात आली होती. त्यांनी दि. १४/०८/२०१५ रोजीचे पत्राने खालील प्रमाणे कळविले आहे.

"..श्री परांजपे साहेब यांनी काय कामकाज केले व किती कामकाज केले तसेच मा.हायकोर्टाचे बीलाबाबत काही आदेश होते किंवा काय याबाबत व्यक्तीशा माहिती नसल्याने त्यांच्या कामकाजाची फी किती मंजूर करावी याबाबत मत प्रदर्शन करणे अशक्य आहे.

तथापी संस्थानचे पॅनलवरील ना. हायकोर्टातील वकीलाकडून अथवा याचीका क्रमांक २५/२०१२ मधील संबंधीत आपले पॅनलवरील वकीलाकडून बीलाबाबत मत घेणे योग्यव संयुक्तिक राहील. " असे कळविले आहे.

ॲडव्होकेट श्री. एस.एम.वाघ यांनी कळविल्यानुसार पी.आय.एल. २५/२०१२ मध्ये संस्थानचे वतीने कामकाज पाहीलेले, ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे यांचे वकिलपत्र दिलेले होते. त्यांचेकडून पी.आय.एल. २५/२०१२ मधील चौकशी अधिकारी मा. श्री पी.एस.परांजपे साहेब यांना किती फी द्यावी याबाबत त्यांचे लेखी ओपिनिअन/ मार्गदर्शन घेणेचे मान्यतेसाठी व ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे औरंगाबाद यांना द्यावयाचे पत्रावर स्वाक्षरी होणेसाठी दि. ०४/०९/२०१५ रोजी टिपणी सादर करण्यात आली होती. सदरचे मंजूर टिपणी अन्वये जा.क्र. एसएसएस वशी-विधी/३३८१/२०१५ दि. १५/०९/२०१५ रोजीचे पत्र ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे यांना पाठविली होते.

प्रस्तुत पत्राचे अनुशंगाने विधी विभागाचे लिपीक टंकलेखक सालकर यांनी दि.१०/१०/२०१५ रोजी औरंगाबाद येथे ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे यांची समक्ष भेट घेऊन चर्चा केली असता . त्यांनी असे सांगितले की, श्री.पी.एस.परांजपे चौकशी अधिकारी यांना जनहितयाचिका क्रमांक २५/१०१२ मध्ये चौकशीचे कामकाजामध्ये किती फी अदा करावयाची, याबाबत प्रत्येक वकीलांचे वेगवेगळे मत असू शकते मी एखादी ठरावीक रक्कम सांगितल्यानंतर कोणी हरकत घेण्याची शक्यता नाकाराता येत नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी कोणत्याही प्रकारचे लेखी मार्गदर्शन मी करु शकत नाही, असे ॲड श्री आर एन धोर्डे यांनी तोंडी सांगितले आहे, लेखी दिलेले नाही.

श्री ॲड.पी.एस.परांजपे साहेब चौकशी अधिकारी यांनी दि१५/६/२०१५ रोजी संस्थानला चार बिले सादर केली असून, त्याचा तपशिल खालील प्रमाणेआहे.

| अ.नं. | चौकशीकामी हजर दिनांक | बील / दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १) | १२/०४/२०१५ | पीएसपी /१५-१६/००१<br>दि.०१/०६/२०१५ | २५,०००/- |
| २) | १३/०५/२०१५ | पीएसपी /१५-१६/००२<br>दि.०४/०६/२०१५ | २५,०००/- |
| ३) | १४/०५/२०१५ | पीएसपी /१५-१६/००३<br>दि.०४/०६/२०१५ | २५,०००/- |
| ४) | १४/०६/२०१५ | पीएसपी /१५-१६/००४<br>दि.१५/०६/२०१५ | २५,०००/- |
| ५) | इतर खर्च बील | पीएसपी /१५-१६/००५<br>दि.१५/०६/२०१५ | २०,०००/- |
| | | **एकुण रक्कम रुपये** | १,२०,०००/- |

दि.१५/०६/२०१५ रोजीचे बीलानुसार दि ३०/०७/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीने श्री पीएस. परांजपे यांना निम्मी रक्कम रु. ६०,०००/- अदा करणेत आलेली आहे. उर्वरीत रक्कम ६०,०००/- विधीज्ञाचे मार्गदर्शन मिळाल्यानंतर अदा करावयाची आहे. आतापर्यंत श्री पी.एस.परांजपे यांना रक्कम रु. ९०,०००/- + ६०,०००/- = १,५०,०००/- (अक्षरी एक लाख पन्नास हजार मात्र) रक्कम अदा केलेली आहे.

उपरोक्त परिस्थीतीत श्री.पी.एस.परांजपे, चौकशी अधिकारी यांनी मागणी केलेली चौकशीच्या कामकाजाची उर्वरीत फी रु. ६०,०००/- व यापुढे मागणी केलेली रक्कम अदायीबाबतचे निर्णयार्थचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २८/११/२०१५ रोजीचे सभेपुढे विषय नं. २८ सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ५४६ अन्वये "सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, मा.श्री.पी.एस. परांजपे साहेब रिटायर्ड प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज, यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणुक करतेवेळेस किती फी ठरलेली होती तसेच त्यांनी काय काम केलेले आहे, चौकशी पूर्ण झालेली आहे काय व त्याप्रमाणे मा.उच्च न्यायालयामध्ये अहवाल सादर केलेला आहे काय, यासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा". असा निर्णय झालेला आहे.

प्रस्तुतचे निर्णयास अनुसरुन खालील प्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे.

| अ.नं. | मा. व्यवस्थापन समितीचा मुद्दा | मा. व्यवस्थापन समितीचे मुद्याचा खुलासा. |
|---|---|---|
| १ | मा.श्री.पी.एस. परांजपे साहेब रिटायर्ड प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज, यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणुक करतेवेळेस किती फी ठरलेली होती. | मा.श्री.पी.एस. परांजपे साहेब रिटायर्ड प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज, यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणुक करतेवेळेस फी ठरलेली नाही.<br>मा. उच्च न्यायालयाने दि. १०/१२/२०१४ रोजीचे आदेशात मा.श्री.पी.एस. परांजपे साहेब रिटायर्ड प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज यांचे नियुक्तीव फी बाबत खालील प्रमाणे नमुद केले आहे<br>4] In this situation, we hereby appoint Shri P.S.Paranjape, retired Principal District Judge, to conduct inquiry in the matter. Schedule thereof be drawn by inquiry officer in consultation with the officers of Saibaba Sansthan, Shirdi, Dist. Ahmednagar, as the said judicial officer will be required to visit the office of respondent no.2 for conducting the inquiry. Needless to mention that during inquiry, petitioner and all other concerned persons may be given opportunity by such judicial officer if their assistance or evidence is found necessary.<br>5] The expenditure and charges of such inquiry shall be borne by respondent no.2. |
| २ | त्यांनी काय काम केलेले आहे. | मा.श्री.पी.एस. परांजपे साहेब रिटायर्ड प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज यांनी दि. २४/०१/२०१५, दि. १४/०२/२०१५, दि. ०८/०३/२०१५, दि. १२/०४/२०१५, दि.१३/०५/२०१५,दि. १४/०५/२०१५, दि. १४/०६/२०१५, दि. १२/०७/२०१५, दि. ०२/०८/२०१५ रोजी शिर्डी येथे उपस्थीत राहून वेळोवेळी पिटीशनर व रिस्पॉन्डंट यांचे शपथपत्र घेवून दि ०२/०८/२०१५ रोजी तोंडी ऑर्ग्यूमेंट करणेस सांगीतले त्याप्रमाणे काही रिस्पॉन्डंट यांचे प्रतिनिधींनी तोंडी ऑर्ग्यूमेंट केले. |
| ३ | चौकशी पूर्ण झालेली आहे काय व त्याप्रमाणे मा.उच्च न्यायालयामध्ये अहवाल सादर केलेला आहे काय. | चौकशी दि. ०२/०८/२०१५ रोजी पूर्ण झालेली आहे. त्यांनी मा.उच्च न्यायालयामध्ये अद्याप अहवाल सादर केलेला नाही. |

उपरोक्त प्रमाणे मा. व्यवस्थापन समितीचे मुद्याचा खुलासा सादर, मा. श्री पी.एस.परांजपे, चौकशी अधिकारी यांनी मागणी केलेली चौकशीच्या कामकाजाची उर्वरीत फी रु. ६०,०००/- व यापुढे मागणी केलेली रक्कम अदायीबाबतचे निर्णयार्थ सादर करण्यता आला होता. त्यावर निर्णय क्र. १२४ अन्वये सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, चौकशी अधिकारी श्री पी.एस.परांजपे साहेब यांनी चौकशीचा अहवाल मा उच्च नयायालयामध्ये सादर केल्यानंतर त्यांना अदा करणेच्या फी बाबत निर्णय घेण्यात यावा तोपर्यंत सदरहू प्रस्ताव तहकूब ठेवणेत यावा असे ठरले आहे.

श्री.पी.एस. परांजपे यांनी दि ०१/०४/२०१६ रोजी आणखी दोन बीले सादर केली आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.नं. | चौकशीकामी हजर दिनांक | बील / दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १) | १२/०७/२०१५ | पीएसपी /१५-१६/००७ दि.१५/०३/२०१६ | २५,०००/- |
| २) | ०२/०८/२०१५ | पीएसपी /१५-१६/००८ दि.१५/०३/२०१६ | २५,०००/- |
| ३) | इतर खर्च बील | पीएसपी /१५-१६/००९ दि.१५/०३/२०१६ | १०,०००/- |
| | | **एकुण रक्कम रुपये** | ६०,०००/- |

चौकशी अधिकारी श्री पी.एस. परांजपे यांनी यापुर्वी मागणी केलेल्यारक्कमे पैकी रक्कम रु. ६०,०००/- बाकी आहे तसेच दि. ०१/०४/२०१६ रोजी दिलेल्या बीलांची रक्कम रु. ६०,०००/- असे एकुण रु. १,२०,०००/- रक्कमे पैकी इतर खर्चाचे रु. ५,०००/- (दि. १३/०५/२०१५ व दि. १४/०५/२०१५ रोजी शिर्डी येथे मुक्काम केल्याने) कपात करुन रु. १,१५,०००/- चौकशी अधिकारी श्री पी.एस. परांजपे यांना अदा करावयाचे आहे

तरी मा.त्रिसदस्य समितीचे दि. १६/०२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१२४ प्रमाणे व दि. १८/०२/२०१६ रोजी चौकशी अधिकारी श्री पी.एस. परांजपे यांनी मा कोर्टात रिपोर्ट सादर केला असल्याने चौकशी अधिकारी श्री.पी.एस. परांजपे यांनी यापुर्वी व आत्तामी मागणी केलेली रक्कम रु. १,१५,०००/- अदा करणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निर्णय क्र.३३७ वरील कार्यवाही पुर्ण झालेनंतर सदरहू विषय सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.१८** **श्री साईलीला अंक इंग्रजी- हिंदी चे जादा बील आदा होणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** ओरियंट प्रेस लि. मुंबई यांना छपाई कार्यादेश एसएसएस/वशी/ प्रकाशने/२९३३/२०१५ दि.२२.०८.२०१५ उपरोक्त श्री साईलीला इंग्रजी-हिंदी अंकांची जादा छपाई झाल्याने मा. श्री कवडे साहेब, सदस्य मा.व्यवस्थापन समिती तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी प्रश्न/मुद्दे उपस्थित केले आहे. सदर मुद्यांचे निरसन खालील प्रमाणे.

**"अ"**

<table>
<tr><th>अं.नं.</th><th>उपस्थित प्रश्न/ मुद्दे</th><th>निरसन</th></tr>
<tr><td>०१</td><td>छपाई आदेश कधी दिला ?</td><td>एसएसएस/वशी/ प्रकाशने/२९३३/२०१५ दि.२२.०८.२०१५</td></tr>
<tr><td>०२</td><td>छपाई संख्या व दर ?</td><td>श्री साईलीला व्दैमासिक<br>१)श्री साई पुण्यतिथी विशेषांक- मराठी- आवृत्ती ०१ अंक<br>छपाई संख्या - ९,००० नग दर-१६/-<br><br>२) श्री साई पुण्यतिथी विशेषांक- हिंदी- इंग्रजी- आवृत्ती ०१ अंक<br>छपाई संख्या - १४,००० नग दर-१६/-<br><br>३) साईलीला अंक मराठी- आवृत्ती- ९००० नग X ०५ अंक<br>छपाई संख्या - ४५,००० नग दर-११/-<br><br>४) श्री साई पुण्यतिथी विशेषांक- हिंदी- इंग्रजी- आवृत्ती-१४,००० नग X ०५ अंक<br>छपाई संख्या -७०,००० नग दर-११/-</td></tr>
<tr><td>०३</td><td>भक्तांकडून किती पैसे आले ?</td><td>साईभक्त देणगी काऊंटरवर अगाऊ रोख रक्कम भरुन सभासद होत असतात. व नंतर त्यांना पोस्टाने अंक पाठविले जातात.<br>सन २०१४- २०१५<br>
<table>
<tr><td>सभासद संख्या भारतातील- ८६८०७</td><td>सभासद संख्या विदेशातील-१७१</td></tr>
<tr><td>सभासद वार्षिक वर्गणी रुपये.५०/-<br>एकूण रक्कम रुपये. ४३,४०,३५०/-<br>पुस्तके विक्री काऊंटर विक्री-००</td><td>सभासद वार्षिक वर्गणी रुपये.१०००/-<br>एकूण रक्कम रुपये. १,७१,०००/-</td></tr>
</table>
<br>सन २०१५- २०१६<br>
<table>
<tr><td>सभासद संख्या भारतातील- ९२०००</td><td>सभासद संख्या विदेशातील-३१५</td></tr>
<tr><td>सभासद वार्षिक वर्गणी रुपये.५०/-<br>पुस्तके विक्री काऊंटर विक्री-१००० नग<br>एकूण रक्कम रुपये. ४६,००,०००/-</td><td>सभासद वार्षिक वर्गणी रुपये.१०००/-<br>एकूण रक्कम रुपये. ३,१५,०००/-</td></tr>
</table>
सोबत व्दैमासिक सभासद संख्या व रक्कम जमा तक्ता जोडलेला आहे.</td></tr>
<tr><td>०४</td><td>आदेश प्रती नग ?</td><td>श्री साई पुण्यतिथी विशेषांक- रु.१६/- (मराठी / हिंदी- इंग्रजी)<br>०१ अंक पाने संख्या- ६८<br>श्री साईलीला अंक (मराठी / हिंदी- इंग्रजी) रु.११/-<br>०५ अंक पाने संख्या- ३६<br>वर्षात एकुण ०६ अंकाची छपाई होत असते.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| ०५ | संख्या वाढली कशी ? | श्री साईभक्तांनी देणगी काऊंटरवर रोखीने रक्कम भरुन साईलीला अंकांचे सभासद होतात. माहे सप्टेंबर २०१५ पासून दरम्यानच्या काळात महाराष्ट्राबाहेरुन शिर्डीत येणा-या साईभक्तांनी हिंदी-इंग्रजी व्दैमासिक नियतकालीकाची माहिती होऊन ते सदर व्दैमासिकाच्या अंकांची मागणी करीत असल्याने व व्दैमासिकाचे सभासद होत असल्याने तसेच काऊंटरवर विक्री संख्येत वाढ होऊन ती सुमारे १६,५०० नग झाली आहे. |

**"ब"** ओरियंट प्रेस लि. मुंबई प्रलंबीत बिले तपशिल

| अ.नं. | बिल क्र. / दिनांक | आदेशीत छपाई नग संख्या | प्रत्यक्ष छपाई नग संख्या | आदेशीत संख्यापेक्षा जादा अंक छपाई नग संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | B-१२/४४/१५-१६<br>दि. २९.१२.२०१५<br>सप्टेंबर-आक्टोबर २०१५<br>पुण्यतिथी विशेषांक | १४००० नग<br>छपाई दर रु.१६/-<br>आदेशीत देय रक्कम<br>रुपये. २,२४,०००/- | १६५०० नग<br>छपाई दर रु.१६/-<br>बिलांची रक्कम<br>रुपये.२,४६,०००/- | २५००<br>छपाई दर रु.१६/-<br>**जादा रक्कम रुपये. ४०,०००/-**<br>( कार्योत्तर मान्यता घेणे आहे.) |
| ०२ | B-०२/ ०९/१५-१६<br>दि. १०.०२.२०१५<br>माहे नोव्हेंबर– डिसेंबर २०१५<br>हिंदी-इंग्रजी | १४,०००<br>छपाई दर रु.११/-<br>आदेशीत देय रक्कम<br>रुपये.१,५४,०००/- | १६,०००<br>छपाई दर रु.११/-<br>बिलांची रक्कम<br>रुपये.१,७६,०००/- | २०००<br>छपाई दर रु.११/-<br>**जादा रक्कम रुपये. २२,०००/-** |
| ०३ | B-०३/७७/१५-१६<br>दि.३१.०३.२०१६<br>माहे जानेवारी फेब्रुवारी २०१६<br>हिंदी–इंग्रजी | १४,०००<br>छपाई दर रु.११/-<br>आदेशीत देय रक्कम<br>रुपये.१,५४,०००/-<br>(बिल क्र. B-०३/७८/१५-१६ दि.३१.०३.२०१६ रु.१,५४,०००/- )<br>आदेशीत संख्येनुसार स्वतंत्र बिल घेऊन आदा केले आहे) | १६,०००<br>छपाई दर रु.११/-<br>बिलांची रक्कम<br>रुपये.१,७६,०००/- | २०००<br>छपाई दर रु.११/-<br>**जादा रक्कम रुपये. २२,०००/-** |

उपरोक्त प्रमाणे ०२ बिले प्रलंबीत असून श्री साईलीला संपादकीय विभाग,मुंबई कार्यालय यांचेकडील हिंदी-इंग्रजी नियतकालीकाची सभासद संख्येत वाढ झाल्याने (ऑनलाईन सभासद, पुस्तके पुस्तके विक्री काऊंटर विक्री, देणगी काऊंटरवर अगाऊ रक्कम जमा झाल्याने) पोस्टाने अंक पाठविणेकामी जादा छपाई आदेश वेळोवेळी देण्यात आला आहे. साईभक्तांनी हिंदी- इंग्रजी अंकास उत्स्फुर्त प्रतिसाद दिल्याने हे भुषणावह आहे त्यामुळे श्री साईबाबांचा प्रचार प्रसार होण्यास मदत होत आहे.

जादा छपाईकामी जादा नग छपाई आदेश संपादकीय विभाग, श्री साईलीला कार्यालय, मुंबई यांनी वेळोवेळी पारीत केल्याने ओरियंट प्रिंटर्स, मुंबई यांनी आदेशाप्रमाणे जादा अंक छपाई केली आहे बिल मिळत नसल्याने सदर प्रिंटर्स यांनी बिल मिळावे अशी विनंती केली आहे

भविष्यात श्री साईलीला नियतकालीकाच्या हिंदी- इंग्रजीची मागणी वाढत जाणार असून, यापुढे छपाई होणा-या जादा अंकास त्याच छपाई मंजूर दराने बिल आदा करावे लागणार आहेओरियंट प्रिंटर्स, मुंबई यांचे मंजूर दर हा छपाई कार्यादेश ई निविदा एसएसएस/वशी/ प्रकाशने/२९३३/२०१५ दि.२२.०८.२०१५ अन्वये आहे.

सबब उपरोक्त तक्ता "ब" बिले अं.नं.०१ कार्योत्तर मान्यता, व अं.नं. २ ते ३ ओरियंट प्रिंटर्स, मुंबई यांना आदा करणेस व भविष्यात सभासद संख्येत ३००० ते ४००० ने वाढ होऊन जादा अंक छपाई झाल्यास त्यांचीही बिले आदा करणे मान्यता असावी हि विनंती.

**निर्णय क्र.३३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईलीला अंक इंग्रजी- हिंदी चे जादा बील आदा होणेस मंजूरी मिळणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच भविष्यात सभासद संख्येमध्ये वाढ होऊन जादा अंक छपाई झाल्यास त्यांचीही बीले याच मंजूरदराने आदा करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१९** **श्री साईबाबा संस्थान शिर्डी करीता पाणी पुरवठा करणेसाठी निळवंडे धरणातून थेट पाईपलाईन प्रस्तावित योजनेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/तरतुद क्रमांक | कलम/तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थम विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (त्र) | भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे. |

**प्रस्तावना:- अ)** सदरची पाणी पुरवठा योजना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, कनकुरी व पिंपळवाडी अशी संयुक्तपाणी पुरवठा योजना आहे. सदर योजनेतून श्री साईबाबा संस्थान, पिंपळवाडी व कनकुरी या गावांसाठीही पाणी पुरवठा करण्यात येतो. संस्थानकरीता वाढीव पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत राबविणेबाबत संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३/०२/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ०४ अन्वये ठरलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान, शिर्डीकरीता पाणी पुरवठा करणेसाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन प्रस्तावित योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करणे इ. कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी शासनाकडे सादर केलेल्या सदरहू योजनेत शिर्डी संस्थान तसेच सभोतालची २ गांवे कनकुरी व पिंपळवाडी यांचा समावेश आहे या योजनेची एकुण किंमत रु.२१५.९७ कोटी असून, त्यापैकी योजनेतील २ गावांसाठी किंमत रु.१९.०४ कोटी इतकी येते. त्यामुळे एकुण योजनेच्या किमतीपैकी शिर्डी संस्थानसाठी रु.२१५.९७ – रु.१९.०४ = रु.१९६.९३ कोटी इतकी किंमत येते. सदर योजनेत संस्थानसाठी रु.१९६.९३ कोटी इतका हिस्सा येतो.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सादर केलेल्या सदर योजनेसाठी निळवंडे धरण हा उद्भव प्रस्तावित करण्यात आलेला आहे. निळवंडे धरणांतून पाणी आरक्षणास पाटबंधारे खात्याची तत्वत: मान्यता आहे. पाटबंधारे खात्याच्या दि.१०/०४/२०१३ च्या पत्रान्वये रु.१८३.९३ कोटी हिस्सा शिर्डी संस्थानने उचलावा, असे कळविण्यात आलेले आहे. सदर अंशदानाच्या रकमेचा समावेश योजनेच्या अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आलेला नाही. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संगमनेर यांनी कळविल्यानुसार प्रस्तुतची योजना ही शिर्डी संस्थानकडुन पूर्ण ठेव पध्दतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत राबवावयाची झाल्यास कनकुरी व पिंपळवाडी या दोन गावांसाठीची किंमत वगळता संस्थानसाठी रु.१९६.९३ कोटी मात्र इतका हिस्सा येतो. तसेच लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर यांनी कळविल्यानुसार प्रकल्प खर्चाचा प्रमाणशिर वाटा रु.१८३.९३ कोटी खर्च संस्थानने उचलणे अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे योजनेची किंमत रु.१९६.९३ कोटी व पाणी आरक्षणासाठी प्रकल्प खर्चाचा प्रमाणशिर वाटा रु.१८३.९३ कोटी याप्रमाणे एकुण रु.३८०.८६ कोटी मात्र इतका निधी संस्थानकडुन उपलब्ध करणेबाबत **तसेच,**

**मा.ना.राधाकृष्ण ए.विखे पाटील,** तत्कालिन मा.मंत्री कृषी व पणन महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांनी पाणी पुरवठा योजनेबाबत मा.श्री अनिल कवडे, सदस्य श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तथा जिल्हाधिकारी,अहमदनगर यांना अग्रेषित केलेले **दि.२५/०६/२०१४** रोजीचे पत्राची प्रत इकडील कार्यालयास प्राप्त झालेली होती. उपरोक्त पत्रात तत्कालिन मा.मंत्री महोदय यांनी कळविले होते की, शिर्डी करीता पाणी पुरवठा करणेसाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन योजना प्रस्तावित केलेली आहे. सदर योजना संस्थानमार्फत ठेव स्वरुपात रक्कम जमा करुन राबविण्यात यावी असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने सुचविले आहे.

तथापि केवळ संस्थानकरीताच स्वतंत्र व थेट पाईपलाईन करणे योग्य होणार नाही. तसेच योजनेचा संपुर्ण खर्च सुध्दा संस्थानमार्फत करणे उचित वाटत नाही. याच योजनेत शिर्डी शहरासह नजिकच्या केलवड, खडकेवाके, को-हाळे, डो-हाळे, वाळकी, नांदुर्खी बु, नांदुर्खी खु, कनकुरी व पिंपळवाडी या कायमस्वरुपी टंचाईग्रस्त गावांचा समावेश केल्यास केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनेसाठी निधी उपलब्ध होऊ शकेल. त्यामुळे संस्थानवरील खर्चाचा बोजा कमी होईल.

त्यानुसार योजनेची किंमत रु.१९६.९३ कोटी व पाणी आरक्षणासाठी प्रकल्प खर्चाचा प्रमाणशिर वाटा रु.१८३.९३ कोटी याप्रमाणे एकुण रु.३८०.८६ कोटी मात्र खर्चाच्या प्रस्तावास व मा.ना.राधाकृष्ण ए.विखे पाटील, तत्कालिन मा.मंत्री कृषी व पणन महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांनी मागणी केलेप्रमाणे योजनेत शिर्डी शहरासह नजिकच्या केलवड, खडकेवाके, को-हाळे, डो-हाळे, वाळकी, नांदुर्खी बु, नांदुर्खी खु, कनकुरी व पिंपळवाडी या

कायमस्वरुपी टंचाईग्रस्त गावांचा समावेश करणेबाबत उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर करण्यात आलेला होता.

सदरहू प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०७/२०१४ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

**"**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीकरीता पाणी पुरवठा करण्यासाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन आणणेच्या योजनेमुळे शिर्डी शहरासह आजुबाजुच्यागावांना पाण्याची सुविधा उपलब्ध होणार असून त्यामुळे संस्थान आणि शिर्डी शहराच्या पाणी पुरवठा योजनेवर ताण येणार नाही व कायसवरुपी टंचाईग्रस्त गावांना पिण्याचे पाण्याची शाश्वत सुविधा उपलब्ध झाल्याने स्थानिक नागरीकांबरोबरच साईभक्तांनाही याचा लाभ होणार आहे. तसेच श्री साईबाबा शताब्दी महोत्सवापुर्वी याबाबत कार्यवाही होणे गरजेचे असल्याने सदरच्या योजनेसाठी श्री साईबाबा संस्थानने पुढाकार घेवून स्वतंत्र प्रकल्प सल्लागाराची नेमणूक व आवश्यक लोकवर्गणी उपलब्ध करुन देणे समितीला आवश्यक वाटते.

यावर सविस्तर चर्चा होवून, प्रस्तावित बाब धोरणात्मक व मेजर फायनान्शीयल असल्यामुळे समिती त्यावर निर्णय घेऊ शकत नाही. यासाठी, सदरहू योजना का आवश्यक आहे, याबाबतची सर्व कारणे नमूद करुन प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावा काय? अशा मार्गदर्शनपर सुचना व आदेश मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत यावा व मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी, असे ठरले.**"**

उपरोक्त विषयास अनुसरुन प्रस्तुत प्रकरणी संस्थानचे विधी विभागामार्फत ॲड. आर.एन.धोर्डे यांचेमार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ येथे सिव्हील ॲप्लिकेशन नं. १२३४६ दाखल करण्यात आलेले होते.

प्रस्तुत सिव्हील ॲप्लिकेशनमध्ये मे.कोर्टाने दि.२२/१२/२०१४ रोजी व दि.२१/०४/२०१६ रोजी तारीख नेमलेली होती. उपरोक्त सिव्हील अर्जामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात दि.२२/१२/२०१४ व दि.२१/०४/२०१६ रोजी दिलेल्या आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात याबाबतचा अंतिम निर्णय प्रलंबित असून मा.कोर्टाने दि.२२/१२/२०१४ रोजी सदर योजनेचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणेबाबत दिलेल्या आदेशान्वये मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणीपुरवठा/४०२६/२०१५, दि.१९/१०/२०१५ अन्वये प्रशासकिय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. **दि.१९/१०/२०१५** रोजीचे प्रशासकिय मान्यतेसाठी सादर करणेत आलेल्या प्रस्तावास अनुसरुन मा.कक्ष अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांनी मा.कक्षअधिकारी नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अग्रेषित पत्र क्रमांक संकिर्ण-२०१५/ प्र.क्र.३३७/ पापु-२२, दि.०९/१२/२०१५ ची प्रत माहितीस्तव इकडील कार्यालयास दि.३१/१२/२०१५ रोजी प्राप्त झालेली आहे. सदरचे पत्रात महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या, महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानास, शासन निर्णय, दि.२३/०१/२०१४ अन्वये, दि.३१/०३/२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून यानंतर या अभियानांतर्गत कोणतेही नविन प्रस्ताव मंजुर करण्यात येणार नसल्याचा व पुढील कामे नगर विकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या JNNURM व नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत घेण्याबाबतचा निर्णय, शासन निर्णय, दि.२३/०१/२०१४ अन्वये घेण्यात आला आहे. तसेच, शासन निर्णय, नगर विकास विभाग, दि.२१/०८/२०१४ अन्वये राज्यातील सर्व शहरामध्ये नागरी, पायाभुत व सामाजिक सुविधा निर्माण करणे व त्यांच्या बळकटीकरणांसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत पाणी पुरवठा, मलनि:सारण, घनकचरा व्यवस्थापन या योजनांचाही समावेश करण्यात आला आहे व त्या अनुषंगाने सदर प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

सदर योजनेतून होणारा पाणी वापर हा साईभक्तांसाठी होणार आहे. व्यावसायिक नाही. त्यामुळे पाणी आरक्षणाची रक्कम रु. १८४ कोटी शासनाकडुन माफ होणेबाबत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता. मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णयास अनुसरुन वाढीव श्री साईबाबा संस्थान शिर्डी साठी निळवंडे जलाशयातुन १४.६५ दलघमी. पाणी आरक्षणापोटी भाग भांडवल रक्कम रु.१८४ कोटी शासनाकडुन माफ होणेसाठी मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय महाराष्ट्र शासन मुंबई यांचेकडे जा.नं.एसएसएस/ वशी/ पाणीपुरवठा/५६९१/२०१६, दि.१४/०१/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

**ब)** सदरहू योजनेत समावेश होणेसाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे दि.०७/०२/२०१४ रोजीचे पत्र, ग्रामपंचायत डो-हाळे यांचे दि.१९/०२/२०१४ रोजीचे पत्र व ग्रामपंचायत निमगांव (को) यांचे दि.२५/०२/२०१४ रोजीचे पत्र संस्थान कार्यालयास प्राप्त झालेले होते. सदरहू पत्रात केलेल्या मागणीप्रमाणे सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे निर्णयार्थ सादर करण्यात आलेला होता. मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.०५/०६/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्रं.३९५ अन्वये सदरहू प्रस्तावाबाबत खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेलाआहे.

"यावर सविस्तर चर्चा होवून, संस्थानच्या पाणी पुरवठा योजनेत समोवश होणेसाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, ग्रामपंचायत डो-हाळे व ग्रामपंचायत कार्यालय, निमगांव (को) यांनी विनंती केलेली आहे परंतु शिर्डी नगरपंचायत यांचेसाठी निळवंडे धरणांमध्ये पाण्याचे आरक्षण आहे काय? संस्थानचे योजनेत समावेश केल्यानंतर पाणी आणणेसाठी वापरल्या जाणा-या पाईपलाईनची क्षमता किती आहे, तसेच पाणी वाटप,पाणी शुध्दीकरण, दुरुस्ती

देखभाल या सर्व बाबींचा तांत्रिक दृष्ट्या तपशीलवार सविस्तर अहवाल मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागरी व ग्रामीण विभाग, संगमनेर यांचेकडुन घेऊन सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले."

वरील निर्णयानुसार मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण विभाग, संगमनेर यांना जा.क्रं.एसएसएस/ वशी/पाणीपुरवठा/२२२३/२०१४, दि.६ ऑगस्ट, २०१४ रोजीचे व जा.क्रं.एसएसएस/ वशी/ पाणीपुरवठा/ ५२९१/ २०१५,दि.२६/१२/२०१५ रोजीचे पत्रान्वये विषयांकित मागणीबाबत तांत्रिक दृष्ट्या छाननी करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल इकडील कार्यालयास पाठविणेसाठी कळविण्यात आलेले होते.

याबाबत मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागरी व ग्रामीण विभाग, संगमनेर यांचे जा.क्रं./ तांशा/ २४/२०१६, **दि.०५/०१/२०१६** रोजीचे पत्र इकडील कार्यालयास दि.१६/०१/२०१६ रोजी प्राप्त झालेले आहे. सदरचे पत्रात त्यांनी वाढीव शिर्डी संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी ग्रामपंचायतीसाठी संयुक्तपाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण विभाग, संगमनेर मार्फत निळवंडे धरण उद्भव धरुन सर्वेक्षण करुन सविस्तर अंदाजपत्रके रु.२१५.९७ लक्ष किमतीचे वेळोवेळी शेरे पुर्तता करुन मा.सदस्य सचिव (म.जी.प्रा) यांचे स्तरावरुन त्यांचे पत्र क्रं.मजीप्रा/मनिसंवस कक्ष/ना-३६५/५८/२०१४, दि.१३/०१/२०१४ अन्वये शासनास सादर करण्यात आली आहे. विषयांकित योजनेचा प्रस्ताव शासनास सादर झालेवर शासनाने प्रस्तुतची योजना शिर्डी संस्थानसाठीच करणे योग्य राहील व यासाठी लागणारा पुर्ण निधी शिर्डी संस्थानकडुन प्राप्त करुन पुर्ण ठेव पध्दतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने ही योजना करावी व योजनेत समाविष्ठ असलेली अन्य दोन गांवे स्वतंत्रपणे राष्ट्रीय ग्रामिण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाताळावित असे स्पष्ट आदेश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने निळवंडे धरणात १४.४० द.ल.घ.मि.पाणी आरक्षणाचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर पाणी आरक्षणात शिर्डी नगरपंचायत,शिर्डी, ग्रामपंचायत डो-हाळे व ग्रामपंचायत निमगांव (को) यांच्यासाठी आवश्यक पाणी मागणीचा समावेश केलेला नाही. तसेच यातील शिर्डी शहर नागरी योजने अंतर्गत तर ग्रामपंचायत डो-हाळे व ग्रामपंचायत निमगांव (को) ग्रामीण योजने अंतर्गत येतात. त्यामुळे सदर ग्रामपंचायतीचा समावेश करणेसाठी जिल्हा परिषदेचा ठराव होणे आवश्यक आहे. तसेच सदरचे योजनेत शिर्डी नगरपंचायत,शिर्डी, ग्रामपंचायत डो-हाळे व ग्रामपंचायत निमगांव(को) यांचा समावेश केल्यास खर्चात वाढ अपेक्षित आहे.

तसेच या योजनेचे सर्वेक्षण करुन अंदाजपत्रके तयार करणेकामी रु७० लक्ष किमतीची निविदा निश्चित करण्यात येवून या योजनेचे सर्वेक्षण, अंदाजपत्रके व आराखडे तयार करण्यात येवून शासनास सादर केलेले आहेत. याकामी संस्थानने भरलेली रु.१० लक्ष इतकी रक्कम ठेकेदारास अदा केलेली असुन उर्वरीत ६० लक्ष रकमेचा निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे जमा करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. तरी वरीलप्रमाणे नमुद ठराव व सर्वेक्षण निविदेच्या देयक अदायगीसाठी आवश्यक असणारी उर्वरीत रु.६० लक्ष इतकी रक्कम जमा करावी म्हणजे विषयांकित योजनेत सुचविलेली शिर्डी नगरपंचायत,शिर्डी, ग्रामपंचायत डो-हाळे व ग्रामपंचायत निमगांव(को) यांचा समावेश घेवून योजना पुन्हानव्याने तयार करणेत येवून शासनास सादर करता येईल व पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल असे कळविलेले होते.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण विभाग संगमनेर यांचेकडील दि०५/०१/२०१६ रोजीचे पत्रास अनुसरुन, वाढीव शिर्डी संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी संयुक्तपाणी पुरवठा योजनेत (निळवंडे धरण उद्भव धरुन) समावेश होणेबाबत शिर्डी नगरपंचायत शिर्डी, ग्रामपंचायत डो-हाळे व निमगांव (को) यांनी केलेल्या मागणीबाबतचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे निर्णयार्थ सादर करण्यात आलेला होता. मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.१६/०२/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रं.८३ अन्वये सदरहू प्रस्तावाबाबत खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी निळवंडे धरणावरुन संस्थानला पाणी आणणेसाठी दररोज किती तास पाणी देऊ केलेले आहेत व किती तास चालल्यास संस्थानची आवश्यकता भागणार आहे. तसेच काही तास उरत असतील तर प्रस्तावित गावांना पाणी देता येईल किंवा असे याबाबतचा तौलानिक अभ्यास करुन, सविस्तर प्रस्ताव सभेसमोर फेरसादर करणेत यावा, असे ठरले."

श्री साईबाबा संस्थान, शिर्डीकरीता पाणी पुरवठा करणेसाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन प्रस्तावित योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करणे इ. कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात आलेली असल्याने, सदरहू योजनेत समावेश होणेसाठी शिर्डी नगरपंचायत शिर्डी, ग्रामपंचायत डो-हाळे व निमगांव (को) यांनी केलेल्या मागणीबाबत मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.१६/०२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णयास अनुसरुन याबाबतचा तौलानिक अभ्यास करुन सविस्तर प्रस्ताव सादर करणेसाठी मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागरी व ग्रामीण विभाग, संगमनेर यांना पत्र देणेसाठी टिपणी मान्यतेसाठी सादर करणेत आलेली आहे.

**प्रस्ताव:-** जा.नं.एसएसएस/विधी/१७/१६, दि.१९/०४/२०१६ अन्वये विधी विभागाकडुन टिपणी इकडील कार्यालयास प्राप्त झालेली आहे. सदरचे टिपणीत नमुद केलेप्रमाणे निळवंडे धरण ते शिर्डी पाईपलाईनने पाणी आणणेबाबत प्रस्तुत प्रकरणी मा.अध्यक्ष साहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांनी खालीलप्रमाणे सुचना केलेल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणी मा.अध्यक्ष साहेब यांनी निळवंडे धरण ते शिर्डी पाईपलाईनने पाणी आणतांना रस्त्यात येणारे गावांना पाणी देणेबाबत ठरावही झालेला आहे, तसेच सदरचे गावांचा नावाचा सिव्हील अर्जात समावेश केलेला आहे. परंतू सदरची पाईपलाईन टाकतांना प्रस्तुत गावांचे ठिकाणी टॅब दिल्यानंतर सदर ठिकाणी मिटरने पाणी देणार का? सदर गावांकडुन संस्थानला पाणीपट्टी म्हणून काही रक्कम मिळणार का? याबाबत विचारणा केलेली आहे. तसेच

ठरावामध्येही काहीही नमुद नाही त्यामुळे भविष्यात अडचण येणाची शक्यता नाकारता येत नसल्याने पाणी पुरवठा विभागाने पाईपलाईनने पाणी देणेबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबत सुचीत केलेले आहे. यावर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी संबंधीत विभागप्रमुख तात्काळ कार्यवाही करणेबाबत सुचना केलेल्या आहेत.

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** श्री साईबाबा संस्थान, शिर्डीकरीता पाणी पुरवठा करणेसाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन प्रस्तवित योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करणे इ. कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात आलेली आहे. सदरहू योजनेत श्री साईबाबा संस्थान, पिंपळवाडी, कनकुरी याबरोबर शिर्डी शहरासह नजिकच्या केलवड, खडकेवाके, को-हाळे, डो-हाळे, वाळकी, नांदुर्खी बु, नांदुर्खी खु, कनकुरी व पिंपळवाडी या कायमस्वरुपी टंचाईग्रस्त गावांचा समावेश करावयाचा झाल्यास सदरची पाईपलाईन टाकतांना प्रस्तुत गावांचे ठिकाणी टॅब दिल्यानंतर सदर गावांकडुन पाणीपट्टी रक्कम वसूल करावी किंवा कसे याबाबत व सदरहू योजनेत वरील नमुद गावांचा समावेश करावयाचा झाल्यास सदरची योजना करणेसाठी सद्यस्थितीस किती खर्च येईल, तसेच सदरहू योजनेची देखभाल, दुरुस्ती, पाणी वाटप, पाणी शुध्दीकरण यासाठी येणारा व योजना पुर्ण करणेसाठी आवश्यक खर्च कोणी करावयाचा याबाबतचा स्पष्ट निर्णय होणे आवश्यक आहे. याबाबत मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागरी व ग्रामीण विभाग, संगमनेर यांना पत्र देवून याबाबतची माहिती घेता येईल.

उपरोक्त प्रस्ताव निणयार्थ सादर.

**निर्णय क्र.३४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान शिर्डी करीता पाणी पुरवठा करणेसाठी निळवंडे धरणातून थेट पाईपलाईन प्रस्तावित योजनेबाबत पूर्वी मा.त्रिसदस्यीय समितीच्या दि.१६/०२/२०१६ रोजीचे सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन, निर्णय क्र.८३ संमत झालेला असून त्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेत येऊन, प्रस्ताव समिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले. सबब उपरोक्त प्रस्ताव रद्द करणेत आला.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२०** **संस्थान परिसरात तयार करणेत येत असलेल्या शौचालयासाठी पाणी पुरवठा जोडून देणेसाठी आवश्यक प्लंबींग मटेरीयल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/तरतुद क्रमांक | कलम/तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्त व्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (त्र) | भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे. |

**प्रस्तावना:-** सन २०१५ चे कुंभमेळा कालावधीत शिर्डीत भाविकांची जादा गर्दी झालेली होती. त्यासाठी शिर्डी परिसरात साईभक्तांसाठी अतिरिक्त सोईसुविधा विशेषत: सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, (विशेषत: महिलासाठी) पाणी पुरवठा, सुरक्षा, अतिरिक्त प्रसाद भोजन व्यवस्था, अल्पोपहार इत्यादी, सोयी-सुविधा संस्थान मार्फत करण्यात आलेल होत्या. सन २०१७-१८ मध्ये होणा-या श्री साईबाबा महासमाधि शताब्धी महोत्सवाचे कालावधीत होणारे संभाव्य गर्दीचे अनुषंगाने करावयाचे सोयी-सुविधांचे नियोजन करणेत येत आहे.

शिर्डी येथे भक्तांचे सोईसुविधेसाठी खालील ठिकाणी शौचालय उभारणेकामी मा.त्रिसदस्यीय समितीकडुन मान्यता देण्यात आलेली आहे.

१. सेवाधाम इमारतीचे तळमजल्यावर रथ पालखी रस्त्यालगत.

२. साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) परिसरात नगर-मनमाड रस्त्यालगत.

३. शिर्डी बसस्थानकाचे समोरील पुर्वीचे स्वागत कक्षाचे जागेत.

४. जुने प्रसादालय परिसरात.

**प्रस्ताव:-** वरील नुमद उपरोक्त ठिकाणी बांधकाम विभागाकडुन शौचालयाची बांधकामे ठेकेदारांमार्फत सुरु करण्यात आलेली आहेत. या शौचालयासाठी पाणी पुरवठा उपलब्ध करुन दयावा लागणार आहे. यासाठी आवश्यक मटेरियल पाणी पुरवठा विभागाकडे उपलब्ध नसल्याने ते खरेदी करावे लागणार आहे.

याकरीता खरेदी करावयाच्या साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | साहित्य तपशिल | कंपनी | परिमाण | एकक | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | १.१/२" जी.आय.पाईप- सी क्लास. | झोनिथ/जिंदाल. | १४०० | फुट | ९०.०० | १,२६,०००.०० |
| ०२ | १.१/२" जी.आय.एलबो- हेवी. | | ४५ | नग | ७८.०० | ३,५१०.०० |
| ०३ | १.१/२" जी.आय.युनियन-हेवी. | | २० | नग | ११०.०० | २,२००.०० |
| ०४ | १.१/२" जी.आय.टी- हेवी. | | २० | नग | ८८.०० | १,७६०.०० |
| ०५ | १.१/२" जी.आय.सॉकेट- हेवी. | | ६० | नग | ६५.०० | ३,९००.०० |
| ०६ | १/२" जी.आय.सॉकेट- हेवी. | | २०० | नग | ११.०० | २,२००.०० |
| ०७ | १/२" जी.आय.एलबो- हेवी. | | २५० | नग | १२.०० | ३,०००.०० |
| ०८ | १/२" जी.आय.युनियन- हेवी. | | ५० | नग | ३०.०० | १,५००.०० |
| ०९ | १.१/२" पट्टीव्हॉल (पितळी)- क्लास-१ | लिडर | १५ | नग | १८००.०० | २७,०००.०० |
| १० | २" पट्टीव्हॉल (पितळी)- क्लास-१ | लिडर | १० | नग | २२००.०० | २२,०००.०० |
| ११ | १/२" पट्टीव्हॉल (पितळी)- क्लास-१ | लिडर | ३० | नग | ५००.०० | १५,०००.०० |
| १२ | १" पट्टीव्हॉल (पितळी)- क्लास-१ | लिडर | ३० | नग | ६५०.०० | १९,५००.०० |
| १३ | होलटाईट (२०० ग्रॅम पॅकिंग) | | ०३ | किलो | ४००.०० | १,२००.०० |
| | | | | | **एकुण रक्कम-** | **२,२८,७७०.००** |

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** भक्तांचे सोई-सुविधेसाठी शौचालयासाठी पाणी पुरवठा जोडुन देणे आवश्यक असल्याने याकामी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ नुसार वरील नमुद तरतुदीस अनुसरुन मात्रिसदस्यीय समितीची मान्यता घेतल्यानंतर सदरचे साहित्य खरेदी करता येईल असे मत आहे.

तरी वरीलप्रमाणे नमुद साहित्य खरेदी करणेसाठी अंदाजे रु.२,२८,७७०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचे साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.२,२८,७७०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.३४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरात तयार करणेत येत असलेल्या शौचालयांसाठी पाणी पुरवठा जोडून देणेसाठी प्रस्तावात नमुद केलेले आवश्यक प्लंबींग मटेरीयल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,२८,७७०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२१** **स्वच्छता साहित्य खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** आरोग्य विभागामार्फत संस्थान इमारती आणि परिसरातील साफसफाई केली जाते. साफसफाईचे कामासाठी स्वच्छता साहित्याची नेहमीच गरज असते यासाठी आवश्यक लागणा-या साहित्याची खरेदी वारंवार करण्यापेक्षा वार्षिक खरेदी करण्यात येते. सध्या आरोग्य विभागाकडील साहित्य वापरुन संपत आलेले आहे या विभागाकडील शिल्लक असलेले साहित्य ऑगस्ट २०१६ अखेर पर्यंत पुरेसे आहे तो पर्यंत सन २०१६-१७ या कालावधीसाठी लागणा-या साहित्याची खरेदीची कार्यवाही पुर्ण होईल.

आरोग्य विभागासाठी सन २०१६-२०१७ करिता दैनंदिन कामासाठी आवश्यक असणा-या साहित्याची यादी सोबत परिशिष्ठ 'अ' मध्ये जोडली आहे. परिशिष्ठातील अ. नं. ०१ ते ०६ नुसार साहित्य खरेदीकामी अंदाजे रु. ९,७१,२५०/- (अक्षरी रु. नऊ लाख एकाहत्तर हजार दोनशे पन्नास मात्र) खर्च अपेक्षित आहे.

सन २०१६-२०१७ स्वच्छता साहित्य खरेदीसाठी मंजूर अंदाजपत्रक रुपये २१,००,०००/- पैकी रुपये ११,००,०००/- स्वच्छता साहित्य खरेदीकामी खरेदी विभागाकडे वर्ग करण्यात आले आहे. सदरचे साहित्य, खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करावे लागेल.

तरी सोबतचे परिशिष्ठातील यादीप्रमाणे साहित्य खरेदी करणेसाठी येणा-या अंदाजे रुपये ९,७१,२५०/- (अक्षरी रु. नऊ लाख एकाहत्तर हजार दोनशे पन्नास मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.३४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६-१७ करीता आरोग्य विभागासाठी आवश्यक असणारे स्वच्छता साहित्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,७१,२५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

**विषय नं.२२** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत साजरे करण्यात येणारे साईबाबा समाधी शताब्दी वर्ष देणगीदार साईभक्तांचे देणगीतून मोफत अन्नदान वर्ष म्हणून घोषित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१(१घ) नूसार भक्तांना जेवण पुरिवणे व अन्नछत्र चालवणे.

**प्रस्तावना:-** मा.व्यवस्थापन समितीने साईभक्तांचे इच्छेनुसार स्वत:चे अथवा नातेवाईकांचे वाढदिवस किंवा पुर्वजांच्यास्मृतीप्रित्यर्थ अथवा अन्य कारणास्तव एका दिवसाचा एकत्रित आकार भरुन प्रसादालयामध्ये भोजन घेणा-या भक्तांना मोफत प्रसाद देणेकामी योजना सुरु केलेली आहे

सदर योजनेस देणगीदार भक्तांचा चांगला प्रतिसाद मिळत असून बरेच दानशुर भक्त मोफत भोजन योजनेमध्ये देणगी रक्कम जमा करीत आहेत.

मा.व्यवस्थापन समितीने साईभक्तांचे इच्छेनुसार मोफत प्रसादभोजन योजनेबाबत घेतलेल्या निर्णयामुळे दिवसेंदिवस सदर मोफत प्रसादभोजन योजनेस साईभक्तांचा उस्त्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. त्यानुसार देणगीदार साईभक्तांचे देणगी रक्कमेचा सन-२००७ ते २०१७ पर्यंत मोफत प्रसादभोजन योजनेमध्ये जमा झालेली देणगी रक्कमेची सांख्यकीय खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कालावधी (जानेवारी ते डिसेंबर) | प्रसादभोजन दिवस संख्या | देणगीची रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | सन-२००७ | १० | १७,४९,६००/- |
| ०२ | सन-२००८ | १३ | १९,२३,५१५/- |
| ०३ | सन-२००९ | २८ | ६४,७६,००४/- |
| ०४ | सन-२०१० | ७१ | १,५९,८८,२८०/- |
| ०५ | सन-२०११ | ११२ | २,५०,०७,२१४/- |
| ०६ | सन-२०१२ | १६७ | ४,३१,०७,८५१/- |
| ०७ | सन-२०१३ | २०४ | ५,११,८८,८१२/- |
| ०८ | सन-२०१४ | २६१ | ६,७६,३७,०२७/- |
| ०९ | सन-२०१५ | २९५ | ८,३२,५७,६८८/- |
| १० | सन-२०१६ (दि.२५.०५.२०१६ अखेर) | २०३ | ६,००,८५,६२२/- |
| ११ | सन-२०१७ (दि.२५.०५.२०१६ अखेर) | ०६ | ६,९६,६६६/- |

प्रसादभोजन मोफत भोजन योजनेच्या देणगीचा तपशिल विचारात घेता जनसंपर्क विभागाचे दि.०५/०५/२०१६ रोजीचे मंजूर टिपणीनुसार श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साईभक्तांचे देणगीतून मोफत अन्नदान वर्ष (दि.०१.१०.२०१७ ते १८.१०.२०१८) घोषित करावयाचे झाल्यास त्यास उत्कृष्ट प्रतिसाद मिळणे आवश्यक असून त्यासाठी खालील प्रमाणे उपाययोजना करणे आवश्यक राहील.

**मागणी:-** १) प्रसादालयात मोफत भोजन योजनेअंतर्गत जास्तीत जास्त देणगी जमा करणेसाठी साईभक्तांना माहिती मिळावी म्हणून मंदीर व परिसरात आकर्षक डिजीटल माहितीफलक तयार करुन देणगी देणाऱ्या भक्तांची नावे डिजीटल बोर्डेवर प्रकाशित करुन सदर दिवशी भक्तांना दर्शन व प्रसादभोजन मोफत देणेबाबतची माहिती टाकणेत येऊन अशा अशायाचे माहितीफलक बसवून साईभक्तांना देणगी देणेसाठी प्रेरीत करता येईल. सदरच्या फलकावर श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाकरीता मोफत भोजन योजनेसाठी अगाऊ देणगी जमा करणेबाबतचे अवाहन करता येईल.

२) साईबाबा समाधी शताब्दी वर्षकरीता मोफत भोजन व्यवस्था योजनेसाठी मंदीरविभाग, जंनसंपर्क विभाग या ठिकाणी काही कालावधीकरीता विशेष काऊंटर उघडून तेथे यासंबधीत माहिती देणेसाठी तात्पुरत्या स्वरुपात कर्मचारी नियुक्त करता येईल.

३) या योजनेसंबधीत जगातील सर्व साईभक्त सभासद मंडळ यांनाही याबाबत जनसंपर्क विभाग व लेखाशाखेकडील संबधीत कार्यासन यांचेकडून माहितीपत्रक देऊन सदर योजनेत देणगी देणेसंदर्भात अवाहन करता येईल

४) विविघ चित्रवाहिन्या (टी.व्ही.चॅनल) यांचे माध्यमातून सदर योजनेची माहिती संबधीत विभागामार्फत प्रसारीत करुन साईभक्तांना या योजनेत प्रोत्साहीत करता यईल.

५) या योजनेसंदर्भात माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थान अधिकृत सर्व संकेत स्थळावर (वेबसाईटवर) याबाबत परिपूर्ण माहिती देऊन या योजनेत साईभक्तांना सहभागी होण्याचे अवाहन करता येईल.

६) साईबाबा समाधी शताब्दी वर्ष (दि.०१.१०.२०१७ ते १८.१०.२०१८) कालावधीत ज्या दिवसांकरीता साईभक्तांची मोफत भोजन योजनेअंतर्गत देणगी प्राप्त होणार नाही त्या दिवशी प्रसादालयामध्ये श्री साईबाबा संस्थानने साईभक्तांसाठी मोफत प्रसादभोजनाची व्यवस्था करणेबाबतचा विषय आर्थिक दुष्ष्या महत्वाचा असल्यामुळे त्याबाबत लेखाशाखा विभागामार्फत सविस्तर प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

७) मोफत भोजन देणगीदार साईभक्तांचे नावे साईलिला मसिकामध्ये दरमहिन्याला प्रकाशित करण्यात यावीत. त्यामुळे इतर भक्तांनाही सदर योजनेची माहिती होऊन तेही या योजनेत सहभागी होण्यास उदिक्त होतील.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:-** आर्थिक.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) मार्फत साजरे करण्यात येणारे साईबाबा समाधी शताब्दी वर्ष (दि.०१.१०.२०१७ ते १८.१०.२०१८) कालावधीत लाखोच्या संख्येने साईभक्त शिर्डीत दाखल होणार असल्यामुळे या कालावधीत साईभक्तांना मोफत प्रसादभोजन दिल्यास त्यांना समाधान वाटेल व संस्थानचे लौकीकातही वाढ होणार असल्यामुळे या कालावधीत मोफत भोजन योजनेअतर्गत देणगी देणेबाबत जास्तीत जास्त साईभक्तांना प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे.त्यासाठी आय.टी.,विघुत व बांधकाम विभागामार्फत आवश्यक त्या मोजमापाचे डिजीटल माहितीफलक लावणे आवश्यक आहे असे नम्र मत आहे.

तसेच वरील मागणीतील अ.नं. १ ते ७ प्रमाणे संबधीत विभागाकडून विषयाकिंतकामी उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करुन घेतल्यास श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष(दि.०१.१०.२०१७ ते १८.१०.२०१८) या कालावधीसाठी मोफत प्रसादभोजन व्यवस्था योजना योग्यरीतीने व सुखकर पार पाडणे शक्य होईल असे नम्र मत आहे.

ज्या दिवसांकरीता साईभक्तांची मोफत भोजन योजनेअंतर्गत देणगी प्राप्त होणार नाही त्या दिवशी प्रसादालयामध्ये श्री साईबाबा संस्थानने साईभक्तांसाठी मोफत प्रसादभोजनाची व्यवस्था मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मोफत करता येईल

तरी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) मार्फत साजरे करण्यात येणारे साईबाबा समाधी शताब्दी वर्ष देणगीदार साईभक्तांचे देणगीतून मोफत अन्नदान वर्ष म्हणून घोषित करणेकामी अ.नं. १ ते ७ प्रमाणे संबधीत विभागास कार्यवाही करणेबाबत कळविणेस मान्यता असावी. याबाबतचा निर्णयाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.३४३ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत साजरे करण्यात येणारे साईबाबा समाधी शताब्दी वर्ष देणगीदार साईभक्तांचे देणगीतून मोफत अन्नदान वर्ष म्हणून घोषित करणेस व प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

**सदरहू मोफत अन्नदान (प्रसाद भोजन) व्ही.आय.पी. व व्ही.व्ही.आय.पी. हॉलमध्ये देण्यात येऊ नये, त्यांचेसाठी चालू पध्दतीप्रमाणेच शुल्क आकारणेत यावे, असे ठरले.**

**तसेच याबाबत साईभक्तांना आवाहन करणेसाठी दि.०१ जुलै २०१६ पासूनच वर्तमानपत्रामध्ये व संस्थानचे संकेतस्थळावर विस्तृत प्रसिध्दी देण्यात यावी.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख/ जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.२३ खोल्यामध्ये छोटे साबण पुरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** १) २१ चा १ चा ग– भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्राथनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव-** दि. १४/११/२०१३ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे समितीचे बैठकीमधील विषय नंबर-१० व निणर्य क्र-९२९

**प्रस्तावना–** श्री साईबाबा संस्थानकडील सर्व निवासस्थानातील खोल्यांमध्ये साईभक्तांना हात धुण्यासाठी छोटा साबण ठेवण्यात यावा असा निर्णय संदर्भिय सभेत समंत झालेला आहे साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडे सध्या खालीलप्रमाणे खोल्या साईभक्तांचे वापरात आहे.

| अ.क्रं | एकुण खोल्या | कायम वास्तव्यासाठी दिलेल्या खोल्या | भक्तांचे वापरासाठी शिल्लक खोल्या |
|---|---|---|---|
| १ | ५४४ | ६० | ४८४ |

| अ.क्रं | एकुण खोल्या | प्रति दिवशी आवश्यक साबण वडया | एक महिन्यासाठी आवश्यक साबण वडया | एक वर्षासाठी अंदाजे आवश्यक साबण वडया | अंदाजे दर रु. पै. | एकुण अंदाजे खर्च रु. पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४८४ | ९६८ (प्रति वडी १२ ते १५ ग्रॅम) | २९०४० | ३,४८,४८० | ०२.२० प्रति वडी | ७,६६,६५६.०० |
| पुर्णाकिंत करुन रुपये- ७,६०,०००/- अक्षरी रुपये सात, लाख, साठ हजार मात्र. | | | | | | |

अक्षरी रुपये सात लाख, साठ हजार मात्र इतका येणार आहे. सदर खर्चाची तरतुद सन-२०१६/२०१७ चे अर्थसंकल्पात करता येईल. सदरकामी येणारा खर्च दहा लाख रुपयांचे आत असल्याने मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मंजुरी घ्यावी लागणार नाही. प्रस्तुतचा खर्च तथा कार्य साईभक्तांना सेवा/सुविधा पुरविणे संदर्भातील असल्याने याकामी विधी तथा न्याय विभागाची मंजूरी आवश्यक नाही.

तरी आपणास आवश्यक साबण वडया ३,४८,४८० खरेदीकामी येणा-या खर्च रुपये ७,६०,०००/- (अक्षरी रुपये सात लाख, साठ हजार, मात्रला) व खरेदी उपरोक्त संदर्भ क्रं-३ अन्वये खरेदी विभागामार्फत ई टेडंर पध्दतीने करणेकामी सदर प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणस विनंती.

**निर्णय क्र.३४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील खोली साईभक्तांना देते वेळेस प्रत्येक खोलीमध्ये एक याप्रमाणे सर्व खोल्यांमध्ये ठेवण्यासाठी विहीत पध्दतीने छोटे साबण खरेदी करणेत यावे, असे ठरले व याकामी प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.२४** **साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग व स्वच्छता कामे आऊटसोर्सिंगद्वारे करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** १) १७-(१)– राज्य शासनाच्या कोणत्याही सर्व साधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजाअर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे.

२) २१-(१)– त्र– भक्तांच्या निवाससाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव –** निरंक.

**प्रस्तावीक-** सन १९९४ साली ५४४ खोल्यांचे साईबाबा भक्तनिवासस्थान साईभक्तांचे सेवेत दाखल करण्यात आले. सन २०१२ पासुन इकडील खोल्या ऑनलाईन आरक्षणासाठी इंटरनेटवर डाऊनलोड करुन आगावू खोल्या आरक्षणाची पध्दत सुरु करण्यात आली, त्यामुळे दुरवरुन येणाऱ्या साईभकतांची फार मोठया प्रमाणावर निवासाची सोय झाली आहे.

विभागाचे सरासरी मासीक उत्पन्न ३२,००,०००/- (अक्षरी रुपये बत्तीस लाख मात्र) इतके आहे. सुमारे ३७२० साईभक्तांची दररोज सोय केली जाते. साईभक्तांना आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध आहेत. उदा. मोफत २४ तास क्लोकरुम सुविधा, मोफत बस व्यवस्था, चहा, कॉफी, लॉकर सुविधा पुरविल्याजातात. तसेच सकाळी -१० ते रात्रो १०.०० वाजेपर्यंत प्रसाद भोजन व्यवस्था केली जाते.

दि.१३/०३/२०१६ रोजी मा.न्यायमुर्ती श्री.श्रीकांत कुलकर्णी, अध्यक्ष मा.त्रिसदस्यिय समिती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तथा प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधिश अहमदनगर व संस्थान व्यवस्थापनाचे वरीष्ठ अधिकारी यांनी केलेल्या स्थळ पाहणी दरम्यान संदर्भिय परीपत्रकातील अ.नं २२ मध्ये नमुदप्रमाणे "श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारत आऊटसोर्सिंगद्वारे चालविण्याबाबतचा प्रस्ताव सादर करणेबाबत" निर्देश दिले आहेत.

**आऊटसोर्सिंग पध्दतीने करावयाचे कामाबाबतचे तपशिलवार विवरण.**

**(साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे बांधकाम विषयक क्षेत्रफळ. एकुण खोल्या- ५४४. साईभक्तांना देणेकामी उपलब्ध खोल्या ४८४)**

| **बांधकामाचे क्षेत्रफळ-** ४,१९,४७३.३३ **चौ. फु.** | **मोकळया (बखळ) जागेचे क्षेत्रफळ** २,४१,६६७.६५ **चौ. फु.** |
|---|---|
| **समाविष्ट ठिकाणे** | **समाविष्ट ठिकाणे** |
| तळमाळा, पहिला माळा, दुसरा माळा व तिसरा माळयावरील खोल्या, स्टोअर्स, संडास बाथरुम, सार्वजनिक संडास बाथरुम, जनरल लॉकर्स हॉल, पॅसेज, प्रवेशद्वारे, गॅलरी, कॉरीडॉर, प्रतीक्षालय, मुख्य प्रवेशद्वार, बुकींग काऊंटर, कार्यालय, लॉण्ड्री, सेफ्टीकटॅ क् जिने. इमारतीची गच्ची आदी. | आतील परीसर व बगीचा परीसर, बाहेरील चारही बाजु, पार्कीग, रस्ते, मोकळी जागा, मेनरोड ( मेन गेटपासुन ) ते बगीचा ग्रीन हाउसपर्यंत, पार्कीग मधील सार्वजनिक संडास/ बाथरुम आदी. |

| **अ.नं** | **तपशिल** | **एकुण खर्च** |
|---|---|---|
| **१** | **अ- कायम व कंत्राटी कर्मचारी वार्षिक वेतन खर्च** | **३,४८,८१,५७४/-** |
| २ | **ब- आरोग्य विभाग कर्मचारी वार्षिक वेतन खर्च** | ९६,९३,०३४/- |
| ३ | **क- स्वच्छते कामी आवश्यक वार्षिक साहित्य खर्च** | २,३७,६५२/- |
| | **एकुण खर्च** | **४,४८,१२,२६०/-** |

साईबाबा भक्तनिवासस्थान इमारत चालविणेकामी कर्मचारी आकृतीबंधाप्रमाणे मंजुर कर्मचारी पदसंख्या १३६ कायम व ०४ कंत्राटी मिळुन १४० आहे. सध्या विभागाकडे ११२ कायम कर्मचारी व ०२ कुशल कंत्राटी कर्मचारी कार्यरत असुन २६ पदे रिक्त आहेत, रजा सुट्टया सोडविणे, लॉण्ड्रीकामे, विभागाकडील इतर कामे करण्यासाठी ३२ अकुशल व ०२ कुशल कंत्राटी कर्मचारी मंजुर आहेत तसेच आरोग्य विभागाकडील स्वच्छतेकामी ७५ कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहे या सर्व कर्म-यांच्या वेतनापोटी खालीलप्रमाणे प्रती वर्षास खर्च येतो.

**विभागाची मागणी- अ)** प्रत्येक माळयावरील मदतनीसाकडे सरासरी २५ रुम आहेत प्रस्तावीत हाऊसकिपींग कामाचे पॉईटनुसार ९० अकुशल कंत्राटी कामगार व ११ कुशल कंत्राटी कामगार मिळुन= १०१ आऊटसोर्स कुशल/ अकुशल कर्मचां-यांचे वेतनापोटी येणारा अपेक्षित अंदाजे खर्च खालीलप्रमाणे आहे.

**१) कुशल / अकुशल कर्मचारी वेतन**

| **अ.नं** | **एकूण कुशल/ अकुशल कर्मचारी** | **किमान वेतन दर प्रति दिन** | **प्रति माह वेतन** | **वर्षाचे वेतन (१२ महिने )** |
|---|---|---|---|---|
| १ | ११ कुशल कर्मचारी | ३१३.६१ | १,०३,४९१.३० | १२,४१,८९५.६० |
| २ | ९० अकुशल कर्मचारी | २८२.८४ | ७,६३,६६८.०० | ९१,६४,०१६.०० |
| | | एकुण | ८,६७,१५९.३० | १,०४,०५,९११.६० |

**ब) साईबाबा भक्तनिवासस्थानकडील स्वच्छतेची कामाचे पॉईटनुसार** ७२ आऊटसोर्स अकुशल व ०३ कुशल कंत्राटी कर्मचारी कार्यरत असुन कर्मचाऱ्यांचे वेतनापोटी येणारा अपेक्षित अंदाजेखर्च खालीलप्रमाणे येणार आहे.

**२) कुशल/ अकुशल कर्मचारी वेतन**

| अ.नं | एकूण कुशल/ अकुशल कर्मचारी | किमान वेतन दर प्रति दिन | प्रति माह वेतन | वर्षाचे वेतन ( १२ महिने) |
|---|---|---|---|---|
| १ | **०३ कुशल कर्मचारी** | ३१३.६१ | २८,२२४.९० | ३,३८,६९८.८० |
| २ | **७२ अकुशल कर्मचारी** | २८२.८४ | ६,१०,९३४.४० | ७३,३१,२१२.८० |
| | | एकुण | ६,३९,१५९.३० | ७६,६९,९११.६० |

**क) कंत्राटदाराने स्वच्छतेकामी करावयाचा आवश्यक वार्षिक साहित्य खर्च- (२०१६-२०१७) रु.**२,७३,३००/-

| **अ.नं** | **तपशिल** | **वार्षिक खर्च** |
|---|---|---|
| १ | कुशल/ अकुशल वेतन खर्च (हाऊसकिपिंग) | १,०४,०५,९११.६० |
| २ | कुशल/ अकुशल वेतन खर्च (स्वच्छतेकामी) | ७६,६९,९११.६० |
| ३ | स्वच्छतेकामी साहित्य खर्च | २,७३,३००.०० |
| -- | **एकुण-** | **१,८३,४९,१२३.२०** |

अ ब क मिळुन येणारा खर्च

**अ)** साईबाबा भक्तनिवासस्थान कार्यालय व आरक्षण काऊंटर येथे खालीलप्रमाणे कायम कर्मचारी वर्ग उपलब्ध ठेवावा लागेल. त्या कर्मचां-याचे वेतनापोटी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे. ( स्थायी कर्मचारी २००४ चे मंजुर आकृतीबंधाप्रमाणे)

| **अ.नं** | **पदाचे नाव** | मंजुर पद संख्या | भरलेली पदे | रिक्त पद | **आवश्यक कर्मचारी संख्या** | प्रत्यक्षत उपलब्ध कर्मचारी | आवश्यक रिक्त पदी कर्मचारी | एकुण वेतन प्रति महा | **वार्षिक पगार रुपये** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अधिक्षक | ०१ | ०१ | -- | **०१** | **०१** | -- | **३८५००/-** | **४,६२,०००/-** |
| २ | उप अधिक्षक | ०१ | -- | ०१ | **०१** | - | ०१ | ----- | ---- |
| ३ | कनिष्ठ पर्यवेक्षक (वरिष्ठ लिपिक) | ०४ | -- | ०४ | **०४** | - | ०४ | ------ | ---- |
| ४ | काऊंटर /चौकशी लिपिक, कार्यालयीन कामकाज लिपिक व लॉड्री लिपिक. पर्यवेक्षिय कामे करणे. | १६+४ | १०+२ | ०६+०२ | **१८+२** | १०+२ | ६+२ | **२०२७९०/-**<br>**१८८१७/-** | **२४३३४८०/-**<br>**२२५८०४/-** |
| ५ | मदतनीस मेन्टनंस, स्टोअर कामकाज, रजा सुटया सोडविणे, लिपिकांचे कामे करणेसाठी | ११३ | १०० | १३ | २० | २० | -- | **३०१३४०/-** | **३६१६०८०/-** |
| ६ | कार्यालयीन शिपाई | ०१ | ०१ | -- | **०१** | १ | -- | **१५०३७/-** | **१८०४४४/-** |
| | एकुण | १३६+४ | ११२+२ | २४+२ | **४५+२** | ३२+२ | ११+२ | **५७६४८४/-** | **६९,१७,८०८/-** |

**ब) आऊटसोर्सिंगव्दारे कुशल व अकुशल मदतनीस, स्वच्छता कुशल/ अकशुल कर्मचारी यांचा एक वर्षाकरीता अंदाजे खर्च (स्वच्छता मशिनरी/ साहित्य खर्चासह)**

| अं.नं | तपशील | प्रति महा रु. पै. | एका वर्षाकरीता एकूण रक्कम रु. पै. |
|---|---|---|---|
| १ | ९० अकुशल कर्मचारी ( हाऊसकिपिंग कामी ) | ७,६३,६६८.०० | ९१,६४,०१६.०० |
| २ | ११ कुशल कर्मचारी (हाऊसकिपिंग कामी) | १,०३,४९१.३० | १२,४१,८९५.६० |
| ३ | ७२ अकुशल कर्मचारी ( स्वच्छतेकामी ) | ६,१०,९३४.४० | ७३,३१,२१२.८० |
| ४ | ०३ कुशल कर्मचारी (स्वच्छतेकामी मुकादम) | २८,२२४.९० | ३,३८,६९८.८० |
| | एकुण | **१,५०,६३१८.६०** | **१,८०,७५,८२३.२०** |
| १ | स्वच्छता कामी आवश्यक साहित्य खर्च | ---- | २,७३,३००.०० |
| २ | स्वच्छता कामी आवश्यक उपकरणे, यंत्रसामुग्री खर्च | ---- | १०,९४,६५४.०० |
| | | एकुण रुपये | **१,९४,४३,७७७.२०** |

**अधिनियम /ठराव/आर्थिक निकष यानुसार छाननी करुन अनुमान-** महाराष्ट्र शासनाने संमत केलेल्या अधिनियम तथा आर्थिक विश्लेषणानुसार साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील हाऊसकिपींग व स्वच्छतेबाबतची सर्व कामे आऊटसोर्स पध्दतीने करता येतील.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय –** साईबाबा भक्तनिवासस्थान इमारत साईभक्तांसाठी कायम तथा कंत्राटी कमर्चा-यांमार्फत चालविताना येणारा प्रत्यक्ष खर्च व आऊटसोर्स मार्फत चालविल्यास येणारा अंदाजे खर्च यांचा तपशिलवार तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.नं | सध्याचा येणारा खर्च (वार्षिक) | रुपये/पैसे | आऊटसोर्स नंतरचा येणारा तपशीलवार अंदाजे खर्च (वार्षिक) | रुपये/ पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | कायम कर्मचारी वेतन खर्च | ३,०८,५१,५७४/- | हाऊसकिपिगसाठी कुशल / अकुशल कर्मचारी वेतन खर्च | १,०४,०५,९११.६० |
| २ | कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी वेतन खर्च | ४०,३०,०००/- | स्थायी कर्मचारी व कुशल कर्मचारी वेतन खर्च | ६९,१७,८०८.०० |
| ३ | आरोग्य विभाग कुशल/ अकुशल कर्मचारी वेतन खर्च | ९६,९३,०३४/- | आरोग्य विभाग कुशल/ अकुशल कर्मचारी वेतन खर्च | ७६,६९,९११.६० |
| | **एकुण रक्कम** | **४,४५,७४,६०८/-** | -------------- | **२,४९,९३,६३१.२० (अधिक नियमाप्रमाणे देय्य होणारा सेवा कर)** |

१. साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाचे आऊटसोर्सिंगव्दारे येणा-या अंदाजे खर्च रुपये- २,४९,९३,६३१.२० पुर्णाकिंत करुन २,५०,००,०००.०० (अक्षरी रुपये दोन कोटी, पन्नास लाख, मात्रला ) व नियमानुसार देय्य होणारा सर्व्हीस टॅक्स अदा करणेस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे.

२ मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर सदर कामी येणा-या अंदाजे खर्च (रुपये दोन कोटी पन्नास लाख मात्रला ) व नियमानुसार देय्य होणारा सर्व्हीस टॅक्सचे खर्चास विधि विभागामार्फत मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घ्यावी लागणार आहे.

३ मा. खंडपीठाचे मान्यतेनंतर जनसंपर्क विभागामार्फत जाहिरात वर्तमान पत्रात व संस्थानचे बेबसाईटवर प्रसिध्द करुन ई- निविदा पध्दतीने निविदा मागवाव्या लागतील.

४ प्रस्तावात नमुदप्रमाणे ४५+२ कायम व कुशल कंत्राटी कामगार साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडे ठेवुन उर्वरीत ८० कायम व ३२ अकुशल कंत्राटी कामगार व आरोग्य विभागाकडील साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडे कार्यरत असलेले ७२ अुशकल कंत्राटी कामगार व ०३ कुशल कंत्राटी कामगार संस्थानचे इतर विभागाकडे आस्थापना/ कामगार विभागामार्फत वर्ग करावे लागतील.

५ संस्थानचे प्रचलित पध्दतीने प्लबिंग, विदयुत, पाणीपुरवठा, बाधंकाम आदी कामे संबंधित विभागाकडुन करुन घ्यावी लागतील .

तरी उपरोक्तप्रमाणे नमुद एक ते पाच बाबत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.३४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग व स्वच्छता कामे आऊटसोर्सिंगद्वारे केल्यास निश्चितच संस्थानची आर्थिक बचत होणार आहे. परंतु सध्या तेथे काम करत असलेले कायम कर्मचारी कोठे वापरणार याचा सखोल अभ्यास करणेत येऊन, त्यासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवास)

---

**विषय नं.२५** **लोखंडी कपाटे खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील:-** २१ (१) (ग) "भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे" व (२) पोट-कलम (१) (ख) "भक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे."

**प्रस्तावना:-** या अधिनियमातील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थे मार्फत भक्तांची निवासव्यवस्था व त्यातील सुविधा करण्यात येते. त्या अनुषंगाने साईआश्रम भक्तनिवास साईभक्तांच्या निवास व्यवस्थेसाठी दि.११/०४/२०१३ पासून सुरु करण्यात आलेले असून या ठिकाणी १२ इमारतीमधून १५३६ खोल्या आहेत.

मा.न्या.श्री.श्रीकांत कुलकर्णी साहेब, अध्यक्ष, मा.त्रिसदस्यीय समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तथा प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर व संस्थान व्यवस्थापनाचे वरिष्ठ अधिकारी यांनी दि.१३/०३/२०१६ रोजी संस्थानची संपुर्ण मालमत्तेची समक्ष स्थळपहाणी केली असता.

बरेच साईभक्त परप्रांतातून श्रींच्यादर्शनासाठी येतात तेव्हा त्यांच्या सोबत मोठया प्रमाणात पैसे, मौल्यवान वस्तू, मोठया किंमतीचे मोबाईल, एटीएम कार्ड, आयकार्ड इ. साहीत्य असते त्यांच्या साहीत्याची खोलीमधून चोरी होऊ नये अगर त्यांच्या कडून गहाळ होऊ नये तसेच मंदिरात जातांना खोलीत जर लॉकर असलेले कपाट असल्यास त्यांना त्यांच्या कडील पैसे व मौल्यवान वस्तू कपाटात सुरक्षित ठेवून जाता येईल यासाठी,

या विभागातील खोल्यांमध्ये २ ते ३ बॅग सामावतील अशा आकाराची सुरक्षिततेसाठी कुलूपांची सोय असलेली लोखंडी/लाकडी कपाटे तयार करणेत यावी व या कपाटांच्या चाव्या खोल्यांच्या चाव्यांबरोबरच ठेवणेत याव्यात. असे निर्देश देण्यात आले.

उपरोक्त निर्देशानूसार बांधकाम विभागास दि१९/०३/२०१६ रोजी पत्र देऊन त्यामध्ये लाकडी कपाटे बसविल्यास कालांतराने त्यामध्ये ढेकूण झुरळे जाऊन बसू शकतात तसेच कपाटास पाणी लागल्यास ते लवकर खराब होण्याची शक्यता राहील त्यासाठी लोखंडी कपाटे बसवून मिळाल्यास योग्य राहील असे कळविण्यात आले होते. त्यानूसार बांधकाम विभागाने लोखंडी कपाटे खरेदीची कार्यवाही खरेदी विभागाकडून करणेत यावी त्यासाठी येणारे अपेक्षित खर्चास मा.त्रिसदस्यीय समितीची मान्यता घेऊन सदरचा प्रस्ताव खरेदी विभागाकडे पाठविणेत यावा असे कळविले आहे.

**प्रस्ताव:-** विभागात एकूण १५३६ खोल्या असून ४.५ फुटाचे १५३६ कपाटे खरेदी करावे लागणार आहे. यासाठी नामांकित कंपनीचे कपाटे खरेदी करावयाचे असल्यास एका कपाटाची अंदाजे प्रति नग किंमत रु.१३,५००/- असून १५३६ कपाटासाठी २ कोटी ७ लाख ३६ हजार एवढा अपेक्षित खर्च होईल, परंतू कपाट खरेदीची संख्याजास्त असल्याने नामांकित कंपनीचे कपाट घेण्या ऐवजी चांगल्या दर्जाचे लोकल ब्रॅन्डचे कपाट बाजार पेठेत उपलब्ध असून पुढील तक्त्यात दर्शविलेल्या वर्णनानूसार खरेदी केल्यास त्याचा खर्च कमी राहील.

| तपशील | साईज/वर्णन | नग | अंदाजे प्रति नग सर्व करासह दर रु. | एकूण अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|---|
| लोखंडी कपाट चांगला दर्जा असलेले कोणत्याही लोकल ब्रॅन्डचे | पत्रा १८ गेज<br>कपाटाची रुंदी ३६" (३ फुट)<br>खोली २०" (१ फुट ८ इंच)<br>उंची ५४" (४ फुट ५ इंच)<br>कलर:- स्प्रे प्रिंटेड TA GRAY | १५३६ | ७,०००/- | १,०७,५२,०००/- |

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:-** यासाठी १) लोकल ब्रॅन्डचे उपरोक्त वर्णनानूसार १५३६ नग लोखंडी कपाटे खरेदी करणेस व त्याकामी रु.१,०७,५२,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी सात लाख बावन्न हजार मात्र) चे खर्चास,

२) मा.व्यवस्थापन मंडळाच्या मान्यते नंतर रु.१,०७,५२,०००/- च्या खर्चास, त्याकामी दैनिक वर्तमान पत्रात ई-निविदा सुचना जाहीरात देणे व ईनिविदा मागविणेकामी विधी विभागामार्फत संस्थान वकीलाव्दारे मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता घ्यावी लागणार आहे त्यास,

३) मा.उच्च न्यायालयाची मान्यता आल्यानंतर खरेदी विभागामार्फत दैनिक वर्तमान पत्रामध्ये ई-निविदा सूचना देऊन ईनिविदा मागणी करणेस.

उपरोक्त १ ते ३ चे प्रस्तावास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील खोल्यांमध्ये ठेवणेकरीता प्रस्तावात नमुद केलेल्या वर्णनाची १५३६ नग लोखंडी कपाटे खरेदी करणेसाठी त्या क्षेत्रातील तज्ञांच्या सल्ल्याने नमुनादाखल कपाट तयार करण्यात यावे व त्या नमुन्याप्रमाणे कपाटे बनविणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेत याव्यात. त्याकामी येणा-या अंदाजे रु.१,०७,५२,०००/- मात्रचे खर्चास तत्वत: मान्यता देण्यात आली.**

**तसेच याकामी येणाऱ्या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.२६** **वातानुकूलीत ३८४ खोल्यांमध्ये ठेवण्यासाठी मेडिमिक्स साबण (१२ ग्रॅम वजनाची वडी) खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद- २१ (१) (ग) "भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे" व (२) पोट-कलम (१) (ख) "भक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

**प्रस्तावना:-** या अधिनियमातील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था मार्फत भक्तांची निवासव्यवस्था व त्यातील सुविधा करण्यात येते.

साईभक्तांच्या निवासव्यवस्थेसाठी तीन बेडच्या ३८४ वातानुकूलीत खोल्या या विभागात असून, प्रति खोलीसाठी एका दिवसाकरीता रु.५००/- सेवाआकार आकारला जातो. त्यामध्ये भक्तांना खोल्यांमधून वेगवेगळया प्रकारच्या सुविधा पुरविल्याजातात. त्यांचाच एक भाग म्हणून साईभक्तांना हात धुणे, अंघोळीसाठी साबणाची वडी पुरविली जाते. यासाठी विभागातील ३८४ खोल्या दररोज १००% आरक्षित झाल्यास दररोज ३८४ नग वडी प्रमाणे एका वर्षाकरीता १,४०,१६० नग साबण वड्या लागतील.

परंतू सध्याला गर्दीचे प्रमाण कमी असल्याने प्रत्येक दिवशी १००% खोल्या आरक्षित होतील असे नाही. यासाठी १,४०,१६० नग साबण वडी ऐवजी आवश्यकते नूसार फक्त ३६,००० नग साबण वड्या खरेदी करावे असे नम्र मत आहे.

**प्रस्ताव:-** साबणीचा एक बॉक्स १,१५२ नग वडीचा असून, ३१ बॉक्स खरेदी केल्यास ३५,७१२ नग वडी खरेदी करावे लागेल. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| मालाचे नाव | कंपनी/ब्रॅण्डचे नाव | वजन प्रति नग | नग | अंदाजे दर प्रति नग (सर्वकरासहित) | अंदाजे एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| साबण | चोलाईल कंपनीचे "मेडिमिक्स" साबण | १२ ग्रॅम | ३५,७१२ | २.५० पैसे | ८९,२८०/- |

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:-** यासाठी उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे ३५,७१२ नग चोलाईल कंपनीचे "मेडिमिक्स" साबण खरेदी करणेकामी अंदाजे रु.८९,२८०/- (अक्षरी रुपये एकोणनव्वद हजार दोनशे ऐंशी मात्र) चे खर्चास व स्थानिक व्यापा-यांकडून/ दुकानदारांकडून दरपत्रके मागविणेकामी मान्यता असावी.

**निर्णय क्र.३४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवासमधील खोली साईभक्तांना देते वेळेस प्रत्येक खोलीमध्ये एक याप्रमाणे सर्व खोल्यांमध्ये ठेवण्यासाठी ३५,७१२ नग मेडिमिक्स साबण विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.८९,२८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच उपरोक्त निर्णय क्र.३४४ मध्ये साईबाबा भक्तनिवाससाठी छोटे साबण खरेदी करणेस मान्यता दिलेली असून साईबाबा व साईआश्रम या दोन्हीही भक्तनिवासस्थानांसाठी एकत्रित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवासस्थान/ प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.२७** **श्री साईबाबा संस्थान परिसरातील प्लास्टीक वेस्टेज डिस्पोजल समस्या दुर करणेसाठी प्लास्टीक पुन:प्रक्रिया प्लँटची उभारणी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईं चे दर्शनाकरीता दररोज अंदाजे 35 ते 40 हजार साईभक्त शिर्डी शहरात दाखल होत असतात. तसेच सध्या शिर्डी नगरपंचायत हद्दीतील लोकसंख्या अंदाजे 25 ते 30 हजार इतकी आहे. यात दिवसेंदिवस वाढ होत असून, याव्दारे शिर्डी शहरात दररोज अंदाजे आठ ते नऊ टन कचरा जमा होत आहे.

संस्थान परिसरातील सर्व कचरा शिर्डी संस्थानचे सहकार्याने पिंपळवाडी येथे उभारणी केलेल्या व राहाता नगरपालिका यांचे मालकीचे असलेले कंपोस्ट डेपो जागेत टाकणेत येत होता. सदरचे कच-यात मोठ्या प्रमाणात प्लास्टीक असल्याकारणांने पिंपळवाडी येथील ग्रामस्थांनी कचरा टाकण्यास मनाई केलेली आहे. त्यामुळे कच-याचे विल्हेवाट लावण्याची मोठी समस्या निर्माण झालेली आहे. सध्या संस्थान परिसरातील सुका कचरा संस्थानचे निमगाव हद्दीतील जागेत टाकणेत येत आहे. सुका कचऱ्याची विल्हेवाट लावणेत आले नंतर, सध्या 500 ते 600 किलो प्लास्टीक कचरा शिल्लक राहत आहे. शिल्लक राहणा-या प्लास्टीक कच-यामध्ये प्रामुख्याने खालील प्रकारचा समावेश असतो :

(1) LDPE – (Low Density Polyethylene) – उदा. प्लास्टीक बॅग, डिस्पेंसिंग बाटल्या, लॅबचे विविध प्रकारचे मोल्डेड इक्युपमेंट

(2) HDPE – (Higher Density Polyethylene) – उदा. मोल्डेड प्लास्टीक वस्तु, डिटर्जंट बाटल्या, प्लास्टीक पॅलेट, बाटल्याचे झाकणे, खुर्च्या

(3) PET – (Polyethylene Terethalate) – उदा. पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या (झाकणा व्यतिरीक्त),

प्लास्टीक मटेरिअल हे Non-Biodegradable असल्याने त्याचे विघटन लवकर होत नाही. तसेच प्लास्टीक कचरा जाळल्यानंतर कार्बनडायऑक्साईड मोठ्या प्रमाणात वातावरणात मिक्स होत असल्याने, तो जाळताही येत नाही. त्यामुळे प्लास्टीक कच-यावर पुर्न-प्रकिया करुन प्लास्टीक कच-याची विल्हेवाट लावणे हाच

शाश्वत उपाय आहे. तसेच प्लास्टीक पुर्न-प्रक्रियेनंतर तयार होणा-या कच्या माल विक्रीपासून आर्थिक उत्पन्नही मिळेल.

संस्थान परिसरात जमा होणारा कच-याचे आरोग्य विभागामार्फत जागेवरच वर्गीकरण करुन, दैनंदिन जमा होणा-या प्लास्टीक कच-यावर प्रक्रिया करता येईल. त्यासाठी येणा-या खर्चाचा तपशील व मशीनचे स्पेसीफिकेशन पुढीलप्रमाणे आहे:

(अ) ग्रांईडर मशीन (हार्ड प्लास्टीक तुकडे करणेसाठी) : रुपये 3,50,000/- + इतर चार्जेस

**Scrap Grinder Machine (Granulator**) – **Specifications**

a. Electric Motor – 25 H.P. A.C.
b. Blades Size – 20 Inch (Three blades fixed with rotor & two fitted with the body)
c. Grinding Capacity – 150 to 200 kgs / hrs.
d. Rotor Dia – 14 Inch
e. Suitable Material – All types of molding material

**(ब)** ॲग्लोमेरेटर (प्लास्टीक पिशव्या, फिल्म लगदा तयार करणेसाठी) : रुपये 3,50,000/- + इतर चार्जेस

**Agglomerator Machine** – **Specifications**

a. Electric Motor – 30 H.P. A.C.
b. Tank Size – 26”Ø x 30” height,
c. Tank Thickness – 8 mm, 2mm SS Cladding
d. Blades – Four blades fixed with rotor and six fitted with the tank
e. Production – 80 to 100 kgs./hrs.
f. Suitable Material – HM / LLD / HDPE Film & Punch Waste

**एकूण रुपये (अ+ब) : रुपये 7,00,000/-** + इतर चार्जेस

उपरोक्तप्रमाणे मशीनरी खरेदी करणेकामी अंदाजे रुपये 7,00,000/- + इतर चार्जेस मात्रचा खर्च अपक्षित आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** श्री साईबाबा संस्थान परिसरातील प्लास्टीक वेस्टेज डिस्पोजल समस्या दुरु करणेसाठी प्लास्टीक पुर्न-प्रक्रिया प्लॅटची उभारणी करणे आवश्यक आहे. मशीनरी खरेदी केलेनंतर मुख्य भांडार परिसरात गोवरी शेडमधील एका भागात सदरची मशीनरी आस्थापित करता येतील. या मशीनरीव्दारे प्रक्रिया झालेल्या प्लास्टीकची अभिलेख कक्षामार्फत विक्री करता येईल. या प्लांटकरीता आवश्यक मशीनरी खरेदी करणेकामी येणा-या अपेक्षित रुपये 7,00,000/- + इतर चार्जेस खर्चास व विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेकामी मा. त्रिसदस्यीय समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी श्री साईबाबा संस्थान परिसरातील प्लास्टीक वेस्टेज डिस्पोजल समस्या दुरकरणेसाठी प्लास्टीक पुर्न-प्रक्रिया प्लॅटची उभारणी करणेसाठी येणा-या अंदाजे रुपये 7,00,000/- + इतर चार्जेस खर्चास, कामास व विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेकामीचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान परिसरातील प्लास्टीक वेस्टेज डिस्पोजल समस्या दुर करणेसाठी प्लास्टीक पुर्न-प्रक्रिया प्लॅटची विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून उभारणी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.७,००,०००/- + इतर चार्जेस मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.२८** **श्री साईबाबा संस्थानमधील सर्व वॉटर कुलर यंत्रणेचे सन २०१६-२०१७ या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद (1) कलम)(2)14 घ – (भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे (2) 21(1)(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

**प्रस्तावना**: संस्थानच्या सर्व परिसरात व इमारतीमध्ये भक्तांना पिण्याचे थंड पाण्यासाठी ठिकठिकाणी वॉटर कुलर बसविण्यात आलेले आहे. हे वॉटरकुलर विविध ठिकाणी भक्तांच्या सोईकरीता कार्यरत आहेत. काही वेळा वॉटर कुलरमध्ये काही स्पेअरपार्ट खराब झाल्यास ते तातडीने बदलणे गरजेचे असते. त्याकरीता सदरचे स्पेअरपार्टची खरेदी करावी लागते. प्रत्येक कंपनीचे स्पेअरपार्ट हे दुसऱ्या कंपनीच्या स्पेअरपार्ट पेक्षा वेगळे असल्याने तसेच सदरचे स्पेअरपार्ट हे जवळपास उपलब्ध् होत नसल्याने ते थेट मुंबई, पुणे येथून खरेदी करावे लागतात. त्यामुळे स्पेअरपार्ट मिळवून फिटींग करुन यंत्रणा कार्यान्वित होईपर्यत पर्यायाने वॉटरकुलर बंद ठेवावे लागतात. सदरचा स्पेअरपार्ट उपलब्ध झाल्यानंतर ते बसवून कुलर यंत्रणा कार्यान्वित केली जाते किंवा एखाद्या वेळी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी

यांना बोलावून दुरुस्ती करुन घ्यावी लागते. तसेच सदर यंत्रणा बंद राहील्यास भक्तांना देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांमध्येव्यत्यय येतो.

मेकॅनिकल विभागात ए.सी. मेन्टेनन्स् करीता संस्थानचे 2 कायम कर्मचारी आहे. त्यांचेकडून दैनंदिन कामाचे नियोजन, स्टॉक नोंद, नविन कामे तसेच CAMC दिलेल्या मशीनरीचे दुरुस्ती देखभालीची कामे करुन घेणे इत्यादी कामे करण्यात येतात. तसेच सदर कामी 6 कंत्राटी कर्मचारी आहेत. त्यापैकी श्री साईबाबा हॉस्पीटल सेंट्रल ए.सी. प्लांन्टचे ऑपरेटींगकामी तीन शिफ्टसाठी तीन कर्मचारी व एक कर्मचारी सुट्या सोडविणेकामी लावण्यात येतात. उर्वरित दोन कर्मचाऱ्यांकडून दर्शन रांगेतील एअर कुलरला पाणी भरणे व सदर कुलरचे मेन्टेनन्स् तसेच अनुषंगीककामे करुन घेण्यात येतात.

संस्थानमधील सर्व ठिकाणचे ए.सी. व अनुषंगीकमशीनरींचे मेन्टेनन्स् साठी सबंधीत तांत्रिक कर्मचाऱ्यांची संख्या पुरेशी नसल्याने कामात अडचणी येतात. मशीनरींची दुरुस्तीव देखभाल वेळेवर न झाल्याने परिणामी अतिरीक्त मेन्टेनन्स् खर्च होत आहे, म्हणून या सर्व मशीनरींची वाढती व्याप्ती लक्षात घेता संस्थानचे सर्वच वॉटर कुलरचे (91 नग) वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) प्रत्येक वर्षी देण्यात येत आहेत. चालू वर्षी मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना दिनांक 01/06/2015 ते 31/05/2016 या कालावधीकरीता रक्कम रुपये 3,48,000/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आला आहे. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक 31/05/2016 रोजी संपत आहे. त्यापुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणे आवश्यक आहे.

श्री साईबाबा संस्थानमधील सर्व वॉटर कुलरचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) दिनांक 01/06/2016 ते 31/05/2017 या कालावधीसाठी देणेकामी येणाऱ्या अंदाजे अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :

| **Sr. No.** | **Description** | 2015-2016 Amount Rs. | 2016-2017 **Appro.** Amount Rs. |
|---|---|---|---|
| 01) | Compressive Annual Maintenance Contract of All Water Cooler in Sansthan Campus (As per the list attached) | 3,48,139/- | 4,00,000/- |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे सर्व वॉटर कुलरचे सन 2016-2017 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकरीता अंदाजे रक्कम रुपये 4,00,000/- (अक्षरी रुपये चार लाख) मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

**मान्यता** : प्रशासकीय मान्यता आवश्यक

**विभागाचे स्पष्ट मत**: श्री साईबाबा संस्थानचे सर्व वॉटर कुलरचे सन 2016-2017 या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेसाठी येणाऱ्या अंदाजे रुपये 4,00,000/- मात्रचे खर्चास, कामांस व महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा नोटीस अपलोड करुन, ई-निविदा मागविणेस मा. त्रिसदस्यीय समितीची प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी श्री साईबाबा संस्थानचे सर्व वॉटर कुलचे सन 2016-2017 या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेसाठी येणाऱ्या अंदाजे रुपये 4,00,000/- मात्रचे खर्चास व उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करणेस प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे सर्व वॉटर कुलरचे सन 2016-2017 या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेसाठी विहीत पध्दतीने महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा नोटीस अपलोड करुन, ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.२९** **साईभक्तांना श्री साईबाबांचे Live दर्शन होणेसाठी विविध ठिकाणी LED Display बसविणेसाठी प्लॅटफॉर्म तयार करणेकामी मटेरीअल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतूद** : (1) कलम 14(2)(घ) – भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे (2) कलम 17(2)(झ) – सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करणे.

**प्रस्तावना:** बांधकाम विभागाकडील दिनांक 22/02/2016 रोजीचे पत्रान्वये बांधकाम विभागाने उत्सव कालावधीत CC-TV कंट्रोल सेल यांचे मागणीनुसार LED Display बसविणेसाठी मंडप ठेकेदार यांचेकडून 6 ठिकाणी 12 x 8 साईजचे 5 फुट उंचीचे प्लॅटफॉर्म भाडेतत्वावर उभारणेत आले होते. सदरचे प्लॅटफॉर्म कायम आवश्यक असलेने मेकॅनिकल विभागामार्फत सदरचे प्लॅटफॉर्म तयार करुन देणेबाबत कळविलेले होते. तसेच दिनांक 09/04/2016 रोजीचे पत्रान्वये प्लॅटफॉर्म तयार करणेसाठी ड्रॉईंग तयार करुन दिलेले आहे.

**मागणी:** बांधकाम विभागाचे ड्रॉईगनुसार 6 नग प्लॅटफॉर्म तयार करणेकामी आवश्यक मटेरिअल इकडील विभागाकडे तसेच भांडार विभागाकडे नसल्याने बाहेरील पुरवठाधारक यांचेकडून दरपत्रके मागवून खरेदी करावे लागणार आहे. मटेरिअल प्राप्त झालेनंतर सदरची कामे विभागांअतर्गत करण्यात येतील. मटेरिअल खरेदीकामी खालील तपशीलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | मटेरिअलचा तपशील | मागणी | अंदाजे दर रुपये | खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | M.S. Square Pipe<br>Size – 40 x 40 x 3 mm | 1000 Ft. | 44/- | 44,000/- |
| 2. | M.S. Sheet<br>Size – 8' x 4' – 14 Guage<br>Jindal / Tata Make | 12 Nos. | 2,100/- | 25,200/- |
| | **एकूण :** | | | **69,200/-** |

उपरोक्तप्रमाणे विषयाकिंतकामी आवश्यक मटेरिअल खरेदी करणेसाठी अंदाजे रुपये 69,200/- खर्च अपेक्षित आहे.

**आवश्यक मान्यता**: प्रशासकीय

**शासनाची / मा. उच्च न्यायालयाची मान्यतेची आवश्यकता**: नाही

**विभागाचा स्पष्ट मत**: साईभक्तांना श्री साईबाबांचे Live दर्शन होणेसाठी विविध ठिकाणी LED Display बसविणेसाठी प्लॅटफॉर्म तयार करणेसाठी लागणारे मटेरिअल खरेदी करणेकामी बाहेरील पुरवठादार यांचेकडून कोटेशन मागविणेसव याकामी येणा-या अंदाजे रुपये 69,200/- (अक्षरी रुपये एकोणसत्तर हजार, दोनशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांना श्री साईबाबांचे Live दर्शन होणेसाठी विविध ठिकाणी LED Display बसविणेसाठी प्लॅटफॉर्म तयार करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेले मटेरिअल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६९,२००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.३०** **श्री गजानन महाराज संस्थान, शेगाव यांचे प्रमाणे संस्थानचे प्रसादालय किचनसाठी अद्ययावत मशिनरी खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतूद**: अधिनियम कलम 21(1) (घ) – भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे

**प्रस्तावना-** श्री साईं चे दर्शनासाठी येणारे भक्तांचे प्रसाद भोजनाची व्यवस्था चांगल्या प्रकारे व्हावी, यासाठी श्री साईबाबा संस्थानने जानेवारी 2009 मध्ये श्री साई प्रसादालयाचे नविन इमारतीची उभारणी केली आहे. या ठिकाणी एकाच वेळेस सुमारे 4,000 साईभक्तांना प्रसाद भोजन घेण्याची क्षमता असलेली आसन व्यवस्था, अद्ययावत किचन, ऑनलाईन चक्की युनिट, उप-भांडार कार्यान्वित करण्यात आलेले आहे. श्री साईबाबा संस्थानने प्रसाद भोजन तयार करणेसाठी जी मशीनरीची उभारणी केलेली आहे, त्यापेक्षा अद्ययावत दर्जाची मशीनरी श्री गजानन महाराज संस्थान, शेगाव यांनी नव्याने उभारणी केलेल्या त्यांचे किचनमध्ये केलेली आहे. अशी माहिती मिळाल्याने, श्री गजानन महाराज संस्थान, शेगांवचे प्रसादालय, तेथे नव्याने उभारणी केलेल्या किचनमध्ये कार्यान्वित असलेल्या अद्ययावत मशीनरींची व तदसंबंधीत कार्यपध्दतीची समक्ष जावुन माहिती घेऊन, तेथील सुधारित यंत्रणेचा श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय किचनमध्ये उपयोग करुन घेता येईल किंवा कसे? याबाबत मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समवेत मा. उप-कार्यकारी अधिकारी व सबंधीत अधिकारी यांची संयुक्तिकरित्याचर्चा झाली व या चर्चेत ठरलेप्रमाणे दिनांक 20/02/2016 रोजी संस्थानचे उप-कार्यकारी अधिकारी श्री आप्पासाहेब शिंदे साहेब, प्रसादालय विभागाचे प्रशासकीय अधिकारी, श्री उत्तमराव गोंदकर, मेकॅनिकल विभागाचे प्रमुख श्री अतुल वाघ तसेच आय.टी.आय. निदेशक श्री प्रशांत सोनवणे यांनी सुयुक्तविद्यमान श्री गजानन महाराज संस्थान शेगाव येथे जाऊन, त्यांनी उभारणी केलेल्या नविन प्रसादालय किचनची समक्ष पहाणी केलेली आहे.

शिर्डी येथे परत आल्यानंतर मा. उप-कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, (प्रसादालय विभाग), प्रसादायल अधिक्षक, मेकॅनिकल विभाग प्रमुख व सबंधीत कर्मचारी यांनी संयुक्तिकरित्यदिनांक 23/02/2016 रोजी संस्थानचे प्रसादालय विभागाची पहाणी केली, त्यानुसार दोन्ही ठिकाणच्या मशीनरींचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | मशीनचा तपशील | श्री साईबाबा संस्थान, शिर्डी | | श्री गजानन महाराज संस्थान, शेगांव | |
|---|---|---|---|---|---|
| | | क्षमता | संख्या | क्षमता | संख्या |
| 1. | आटा मळणी मशीन (नाष्टा पाकीटासह) | 80 किलो | 5 | 100 किलो | 3 |
| 2. | चपाती मशीन | तासी 3000 चपाती | 1 | तासी 40,000 चपाती | 1 |
| | चपाती मशीन | -- | -- | तासी 10,000 चपाती | 3 |
| 3 | राईस वायशर मशीन | 100 किलो 10 मिनीटांत | 1 | 80 किलो 10 मिनिटात | 1 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | स्टीम कुकर – भाताकरीता | 50 किलो | 8 | 100 किलो | 4 |
| | स्टीम कुकर – दाळीकरीता | -- | -- | 300 किलो | 1 |
| | स्टीम कुकर – उसळकरीता | -- | -- | 200 किलो | 1 |
| | स्टीम कुकर – फळभाजीकरीता | -- | -- | 400 किलो | 1 |
| 5 | थर्मिक फ्ल्युड | 2,00,000 किलो कॅलरी | 1 | 6,00,000 किलो कॅलरी | 1 |
| 6 | व्हेज वाशर (भाज्या धुणे) | 100 किलो 10 मिनिटांत | 1 | 100 किलो 10 मिनिटात | 1 |
| 7 | पोटॅटो पिलर (बटाटा साल काढणे) | 30 किलो 3 मिनिटांत | 1 | 20 किलो 5 मिनिटात | 1 |
| 8 | बुंदी/लाडू पॅकींग मशीन | तासी 2400 पाकीटे | 3 | तासी 1800 ते 2000 पाकिटे | 3 |
| 9 | कोल्ड स्टोअरेज | 2.5 टन | 1 | 3 टन | 1 |
| 10. | स्टीम बॉयलर | तासी 850 किलो | 1 | 1500 किलो | 2 |
| | स्टीम बॉयलर | तासी 450 किलो | 1 | -- | -- |
| 11. | ऑन लाईन चक्की युनिट | तासी 250 किलो | 1 | 400 किलो तासी | 1 |
| 12. | राईस डिस्टोनर मशीन | -- | -- | तासी 1000 किलो | 1 |
| 13. | मसाला ग्राईडर (पल्वरायझर) | तासी 200 किलो | 2 | 200 किलो तासी | 1 |
| 14. | टिल्टींग वेट ग्राईडर | 30 किलो 10 मिनिटात | 2 | -- | -- |
| 15. | भाजी कटींग मशीन | तासी 800 किलो | 1 | -- | -- |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थान, शिर्डी व गजानन महाराज संस्थान, शेगांव यांच्यातील मशीनरींचा तुलनात्मक तपशील असून, यातील चांगल्या क्षमतेच्या काही मशीनरी गजानन महाराज संस्थान, शेगाव यांचेकडे आहेत.

**मागणी–** श्री गजानन महाराज संस्थान, शेगांवचे किचनप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय क्षमता वाढविणेसाठी खालीलप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे :

**(अ) <u>नविन मशीनरी खरेदी करणे</u>**

**1)** **चपाती मशीन खरेदी –** श्री साईबाबा संस्थानकडे साईभक्तांना चपाती उपलब्ध करुन देणेकरीता तासी 3000 चपाती क्षमतेचे एक चपाती मशीन कार्यान्वित आहे. तसेच सकाळी 7 ते 9.30 या दरम्यान नाष्टा पाकीटात देणेकरीता पुरी तयार करणेत येते तसेच प्रसादालयात भक्तांचे प्रसाद भोजनाकरीता पुरी व मॅन्युअली (हाताने) चपाती बनविण्यात येते. मॅनयुअली चपाती व पुरी बनविणेसाठी गॅस भट्टीचा वापर करणेत येतो. गॅस भट्टीव्दारे पुरी तळणेसाठी तेल खर्च अधिक होतो. तसेच गॅसचाही मोठ्या प्रमाणात वापर होतो. या सर्व खर्चात बचत होणेसाठी तासी 10,000 क्षमतेचे चार चपाती मशीन खरेदी करणे आवश्यक आहे. मशीनव्दारे पुरेसे प्रमाणात चपाती उपलब्ध झाल्यास पु-या तयार करण्याची गरज भासणार नाही. परिणामी त्यामुळे भक्तांचे पुरीबाबत येणारी तक्रारही थांबेल

**2)** **स्टीम कुकर्स खरेदी करणे –** सध्या कडधान्य व फळभाजी शिजविणेसाठी मोठ्या पातेल्यांचा वापर करणेत येत आहे. त्याऐवजी डाळ, कडधान्य व फळभाजी शिजविणेकामी प्रत्येकी 300 किलो क्षमतेची स्टीम कुकर्स खरेदी केल्यास गॅस खर्चात बचत होईल.

**3)** **थर्मिक फ्ल्युड यंत्रणा वाढविणे –** सध्या संस्थानकडे 200000 Kg. cal/hr क्षमतेची थर्मिक फ्ल्युड यंत्रणेचा बुंदी किचनमध्ये बुंदी तळणेसाठी वापर होत आहे. तुप व गॅस खर्चात बचत होणेसाठी 6,00,000 Kg. cal/hr क्षमतेची नविन यंत्रणा खरेदी करणे आवश्यक आहे.

**4)** **ऑनलाईन चक्की युनिट खरेदी करणे –** संस्थानकडे सध्या तासी 250 किलो क्षमतेचे ऑनलाईन चक्की युनिट असून ते सन2008 मध्ये खरेदी केलेले आहे. मात्र सदरच्या युनिटला सन2000 पुर्वी खरेदी केलेल्या गिरणी बसविण्यात आलेल्या आहेत. सततचे वापराने त्याचे मेन्टेनंन्स खर्चात वाढ होत आहे. त्यामुळे सदरचे युनिट बदलून त्याठिकाणी वाढीव क्षमतेचे अत्याधुनिक चक्की युनिटची उभारणी करणे आवश्यक आहे.

**5)** **मसाला ग्राईडर खरेदी करणे –** सध्याचे मशीन सन 2003 साली खरेदी केलेले असून, ते एम.एस. मटेरिअलमध्ये आहे. त्याऐवजी नविन टेक्नॉलॉजीयुक्त स्टेनलेस स्टीलमध्ये मशीन खरेदी करणे आवश्यक आहे.

**6)** **भाजीपाला कटींग मशीन खरेदी करणे -** सध्या वापरात असलेले मशीन सन 2010 साली खरेदी केलले असून एकच मशिन असल्याने सततचे वापराने त्याचा मेन्टेनंन्स वाढलेला आहे. सदरचे मशीनऐवजी नविन दोन भाजी कटींग मशीन खरेदी करणे आवश्यक आहे.

**7)** **डिश वॉशर मशीन दुरुस्ती करणे –** सध्या प्रसादालयात तासी 2200 क्षमतेचे जर्मनी मेड हॉबर्ट कंपनीचे दोन मशील 8 जानेवारी 2009 पासून अविरत कार्यान्वित आहेत. सदरच्या मशिनकरीता स्टीम पुरवावी लागते.

त्यामुळे काही स्पेअरपार्ट खराब झालेले असून सदरचे स्पेअरपार्ट नविन टाकून मशिन्स दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच डिश वॉशर मशिनमधून धुतलेली डिश पुर्णपणे ड्राय होत नसून मशिनला स्वतंत्र ड्रायर यंत्रणा बसविणे आवश्यक आहे जेणेकरुन भक्तांना प्रसाद भोजन देतांना ताट ओले राहणार नाही. तसेच मुख्य प्रसादालयाप्रमाणे साई आश्रम भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास व साईनाथ रुग्णालय या ठिकाणी साईभक्तांची प्रसाद भोजनाची व्यवस्था केलेली आहे. त्याठिकाणी मॅन्युअली (हाताने) ताटे धुतली जात असल्याने, सदर ठिकाणी ताटे धुणेकरीता 700 ते 800 डिश प्रती तास क्षमतेचे प्रत्येकी 1 याप्रमाणे 3 डिश वॉशर मशीन खरेदी करणे आवश्यक आहे.

**8)** **किचनमधील व लाडू किचनमधील एक्झॉस्ट यंत्रणा बदलणे –** श्री साई प्रसादालयाततील किचनमधील एक्झॉस्ट यंत्रणा 8 जानेवारी 2009 पासून कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्याची कार्यक्षमता कमी झालेली असल्याने, ती यंत्रणा वारंवार बंद पडत आहे तसेच डक्ट ठिकठिकाणी चिरलेमुळे त्याचे व्हायब्रेशनचा आवाज जास्त येत आहे. यासाठी ती बायबॅक करुन नविन अद्ययावत यंत्रणा खरेदी करणे आवश्यक आहे.

**9)** **स्टीम बॉयलर नविन खरेदी करणे –** सध्या साई प्रसादालयाकडे 850 kg/hr व 450/hr क्षमतेचे दोन बॉयलर वापरात आहेत. डाळ, कडधान्य व फळभाजी कुकर्स खरेदी केलेस सध्याची बॉयलर क्षमता अपुरी पडेल, त्यामुळे 450 kg/hr क्षमतेचा स्टीम बॉयलर बायबॅक देवुन त्याऐवजी नविन 1000 kg/hr क्षमतेचा नविन बॉयलर खरेदी करणे आवश्यक आहे.

**10)** **राईस डिस्टोनर मशीन खरेदी करणे –** सध्या साई प्रसादालयाकडे तांदुळ मॅन्युअली निवडला जातो. सदरचे काम कमी मनुष्यबळात व जलदगतीने होणेकरीता किमान तासी 1000 kg क्षमतेचे राईस डिस्टोनर मशीन खरेदी करणे आवश्यक आहे.

(ब) **नाष्टा पाकिटे किचन हलविणे** – सध्या नाष्टा पाकीटे किचन प्रसादालय इमारतीमधील किचनचे तळमजल्यावरील वायव्य कोप-यात आहे. चपाती मशीन खरेदी केल्यास सदरचे किचन सध्याचे चपाती/ पुरी किचनमध्ये पहिल्या माळयावर स्थलांतरीत करता येईल. तसेच पाकीटे पॅक करणेसाठी आय.टी. विभागाचे शेजारील हॉलमधील रिकाम्या हॉलमध्ये अर्ध्या जागेचा वापर करता येईल.

(क) **किचनमध्ये अंतर्गत बदल करणे–** तळमजल्यावरील किचनमध्ये नाष्टा पाकीट विभाग स्थलांतरीत केलेनंतर सदरची जागा रिकामी होईल, त्यामुळे सध्याचे किचन अंतर्गत रचनेत बदल करावा लागेल व त्या प्रमाणे नविन एक्झॉस्ट सिस्टीम डक्टीग करावी लागेल.

(ड) **इतर आवश्यक सुधारणा करणे -** सध्या मुख्य प्रसादालयाप्रमाणेच प्रसादालयाबाहेर साईआश्रम भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास (500 रुम), साईनाथ रुग्णालय हया ठिकाणी साईभक्तांचे प्रसाद भोजनाची व्यवस्था केलेली आहे. त्यासाठी मुख्य किचनमध्ये प्रसाद भोजन बनवून संस्थान वाहनातून वरील सर्व ठिकाणी पोहच करण्यात येत आहेत. सदर प्रसाद भोजन वाहतुकीकरीता सध्या भाजी दाळ करीता कॅन, भाताकरीता व चपाती/पुरीकरीता क्रेटर्स वापरणेत येत आहे त्याऐवजी प्रसाद भोजन वाहतुकीकरीता शेगांव संस्थानप्रमाणे बंदीस्त वाहनांचा वापर करता येईल तसेच भाजी दाळ भात वाहतुकीकरीता गोल आकाराचे कडया असलेले योग्यत्या साईजचे एस.एस. भांडे तयार करुन घेता येईल.

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालयातील मशीनरी अद्ययावत करणेसाठी सदरची मशीनरी खरेदीसाठी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | खरेदी करावयाच्या मशीनरींचा तपशील | क्षमता | खरेदी करावयाचे नग | प्रत्येकी अंदाजे दर (रुपये) | अपेक्षित अंदाजे रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | चपाती मशीन | तासी 10,000 चपाती | 4 | 25,00,000/- | 1,00,00,000/- |
| 2. | स्टीम कुकर्स (दाळ, कडधान्ये आणि फळभाजीकरीता) | 300 किलो | 3 | 3,00,000/- | 9,00,000/- |
| 3. | थर्मिक फ्ल्युड यंत्रणा | 600000 किलो कॅलरी | 1 | 40,00,000/- | 40,00,000/- |
| 4. | ऑनलाईन चक्की युनिट | तासी 400 किलो | 1 | 20,00,000/- | 20,00,000/- |
| 5. | मसाला ग्राईंड– स्टेनलेस स्टीलचे | तासी 200 किलो | 1 | 2,00,000/- | 2,00,000/- |
| 6. | भाजीपाला कटींग मशीन खरेदी | तासी 800 किलो | 2 | 1,50,000/- | 3,00,000/- |
| 7. | ग्लास वॉशर मशीन | तासी 2000 ग्लास | 1 | 10,00,000/- | 10,00,000/- |
| 8. | डिश वॉशर मशीन (साईआश्रम, साईबाबा भक्तनिवासस्थान, 200 रुम्स येथील प्रसाद भोजन कक्षाकरीता) | तासी 700 डिश | 3 | 18,00,000/- | 54,00,000/- |
| 9. | स्टीम बॉयलर | तासी 1000 किलो | 1 | 25,00,000/- | 25,00,000/- |
| 10. | राईस डिस्टोनर मशीन | तासी 1000 किलो | 1 | 2,00,000/- | 2,00,000/- |
| 11. | मटेरिअल हॅन्डलींग हॅन्ड ऑपरेटर ट्रॉली | 2500 किलो | 6 | 50,000/- | 3,00,000/- |
| | | | | **एकूण खर्च रुपये :** | **2,68,00,000/-** |

वरीलप्रमाणे साई प्रसादालयातील किचन मशीनरी अद्ययावत करणेकामी अंदाजे रुपये 2,68,00,000/- (अक्षरी रुपये दोन कोटी, अडुसष्ट लक्ष) मात्रचा खर्च अपेक्षित आहे. तसेच नविन वायुवीजन यंत्रणा बसविणेकामी स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेत येईल.

**आवश्यक मान्यता** : प्रशासकीय

**शासनाची/ मा.उच्च न्यायालयाची मान्यतेची आवश्यकता**: मा.उच्च न्यायालयाची मान्यता आवश्यक आहे.

**विभागाचा स्पष्ट अहवाल–** संस्थानचे प्रसादालयात आजमितीस प्रसाद भोजन घेणा-या साईभक्तांची संख्या दररोज सुमारे 35 ते 40 हजार एवढी आहे. त्यातच सन 2017-18 मध्ये श्रींचे शताब्दी वर्ष साजरे करण्यात येणार असून, सदर कालावधीत शिर्डीमध्ये साईभक्तांची प्रचंड प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. परिणामी प्रसादालयात प्रसाद भोजन घेणा-या भक्तांचे संख्येत मोठया प्रमाणात वाढ अपेक्षित आहे. याचा सारासार विचार करता किचन व्यवस्थाही सक्षम बनविणे आवश्यक आहे. सध्या वापरात असलेल्या मशीनरीपैकी बराचशा मशीनरी गेल्या 7 ते 8 वर्षापासून नियमित वापरात असल्याने, त्यांची कार्यक्षमत कमी झालेली आहे. यासाठी आधुनिक तंत्रज्ञानयुक्त मशीनरीची खरेदी करुन किचनमध्ये ॲटोमायजेशन करणे अत्यावश्यक आहे. यासाठी येणा-या अपेक्षित खर्च 2,68,00,000/- मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदरील खर्च हा मेजर फायनान्सशिअल असलेने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठऔरंगाबाद यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. दोन्ही मान्यतेनंतर सदरचे मशीनरी विहीत पध्दतीने खरेदी करणेत येईल.

तरी साई प्रसादालयातील किचन व्यवस्था अद्ययावत करणेसाठी उपरोक्त प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मशीनरी खरेदी करणेकामी करावयाच्या कार्यवाहीस व यासाठी येणा-या अंदाजे रुपये 2,68,00,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३५१** **सदरहू विषयावर चर्चा सुरु असताना, दरम्यानचे कालावधीमध्ये दानशूर साईभक्त संस्थानला ०२ नग चपाती मशिन देणगीदाखल देणेस इच्छूक असलेची माहिती कार्यकारी अधिकारी यांनी सभेस दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गजानन महाराज संस्थान, शेगाव यांचेप्रमाणे संस्थानचे प्रसादालय किचनसाठी प्रस्तावात नमुद केलेल्या तक्त्यामधील ०२ नग चपाती मशिन वगळून उर्वरित सर्व अद्ययावत मशिनरी विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.२,१८,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच याकामी येणाऱ्या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.३१** **श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे मिरर (आरशे) बदलविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतूद** : *कलम 21(1)(घ) – **भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे***

**प्रस्तावना:-** श्री साईप्रसादालयातील अन्न शिजविणेकामी येणा-या इंधन खर्चात बचत होणेसाठी श्री साईप्रसादालय इमरतीचे टेरेसवर दिनांक 30 जुलै 2009 रोजी सोलर स्टीम कुकींग प्रकल्प कार्यान्वित करणेत आलेला आहे. सदर प्रकल्पामध्ये 16 $M^2$ क्षेत्रफळ असलेल्या एकुण 73 डिश असून प्रत्येक डिशला 7" x 9" या साईजचे 380 नग मिरर आहेत. प्रकल्पापासून तयार होणा-या वाफेवर दररोज सरासरी दोन टन अन्न शिजविले जाते.

**मागणी :-** सोलर स्टीम कुकींग प्रकल्पामधील 73 डिशपैकी 20 डिशचे मिरर खराब असल्याने रिफ्लेक्शन चांगले पद्धतीने होत नाही. त्यामुळे सदरच्या 20 डिशचे मिरर बदलणे आवश्यक आहे. सिस्टीम इन्स्टॉलेशनचे वेळी डिशला अल्युमिनिअम पट्टीवर मिरर कॉपर तारेच्या साह्याने बांधण्यात आलेले आहेत. तारेचे पीळ कमकुवत होऊन मिरर त्यातुन निसटतात व फुटतात तसेच नविन मिरर बसवितांना अडचण येते त्याऐवजी नविन मिरर बसवितेवेळी अल्युमिनिअम पट्टी ऐवजी अल्युमिनिअम स्लायडींग चॅनल बसवून त्यात नविन मिरर बसविणे आवश्यक आहे. त्यामुळे मिरर फुटणेचा धोका कमी होईल तसेच मिरर रिप्लेस करणेही सोयीचे होईल.

20 डिश करीता नविन अल्युमिनिअम स्लायडींग चॅनल बसविणे व त्यात प्रत्येकी 380 नग नविन मिरर फिटींग करणे याकामी अंदाजे रक्कम रु. 9,59,800/- मात्र खर्च अपिक्षत आहे. सदरचे काम सोलर स्टीम कुकींग सिस्टीमचे काम करणा-या एजन्सीकडून ई निविदा मागावून करता येईल. याकामी येणा-या खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**मान्यता** :- प्रशासकिय

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/ मत :-** सोलर रिप्लेक्शन करीता सोलर डिशचे मिरर चांगले असणे अत्यंत आवश्यक आहे. मिरर खराब झालेमुळे रेडीएशन चांगले असूनही सोलर रिप्लेशन चांगले होत नाही. याकरीता डिशचे मिरर बदलणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावित केलेप्रमाणे 20 डिशचे अल्युमिनिअम पट्टी काढून त्या ठिकाणी अल्युमिनिअम स्लायडींग फ्रेम फिटींग करुन नविन मिरर बसविणेकामी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.nic या संकेत स्थळावर ई निविदा नोटीस प्रसिद्ध करुन ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या रक्कम रु. 9,59,800/- मात्रचे खर्चास मान्यतेकरीता प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे मिरर (आरशे) बदलविणेसाठी विहीत पध्दतीने महाराष्ट्र शासनाच्या** www.mahatenders.gov.in **या संकेतस्थळावर निविदा नोटीस अपलोड करुन, ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,५९,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.३२** **जुने गॅस प्लॅन्ट व सिलेंडर मेनीफोल्ड करीता गॅस लिकेज डिटेक्शन सिस्टीम खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 14 (भाग 4)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयममधील 14(2-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रास्ताविक:-** साईनिवास अतिथीगृह समोरील जुना गॅस प्लॅन्ट कॅन्टिन विभागाकरीता कार्यान्वित करणेत आलेला आहे. तसेच श्री साईप्रसादालयातील किचन करीता १०० नग एल. ओ. टी. सिलेंडर्स असलेली मेनी फोल्ड यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. जुने गॅस प्लॅन्ट येथे यापुर्वी सन २००० मध्ये खरेदी केलेली यंत्रणा खराब झालेली आहे. तसेच सिलेडर मेनीफोल्ड मध्ये लिंकेज डिटेक्शन यंत्रणा बसविण्यात आलेली नाही. सदरच्या ठिकाणी गॅस लिकेज झालेनंतर गॅस डिटेक्ट करीता लिकेज डिटेक्टर यंत्रणा बसविणे आवश्यक आहे.

**मागणी:-** गॅस लिकेज झालेनंतर सदर यंत्रणेमुळे सायरनचा आवाज येतो व गॅस लिकेज डिटेक्शन यंत्रणेमुळे गॅस लिकेज झालेचे तात्काळ कळते. सुरक्षीततेच्या दुष्टीने जुना गॅस प्लॅन्ट व श्री साईप्रसादालयातील सिलेंडर्स मेनी फोल्ड येथे अत्याधुनीक गॅस लिकेज डिटेक्शन यंत्रणा बसविणेकामी अंदाजे रुपये 2,00,000/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरच्या खर्चास मा. त्रिसदस्यीय समितीची मान्यता घेऊन सदर यंत्रणा पुरवठा करणाऱ्या एजन्सी कडुन दरपत्रक मागावून खरेदी करता येईल.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार अनुमान**: तांत्रिक व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**:- तरी जुने एल.पी. गॅस प्लॅन्ट व श्री साईप्रसादायलातील सिलेडर्स मेनी फोल्ड येथे गॅस लिकेज यंत्रणा कोटेशन मागावून बसविणेकामी तसेच त्याकामी येणा-या रक्कम रुपये 2,00,000/- (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) पर्यतच्या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरील प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जुने एल.पी. गॅस प्लॅन्ट व श्री साईप्रसादायलातील सिलेडर्स मेनी फोल्ड येथे गॅस लिकेज यंत्रणा बसविणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये** 2,00,000**/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.३३** **साईआश्रम कडील 320 केव्हीए डिझेल जनसेट क्र.ईएसएन 25311058 ची कंट्रोल असेंब्ली खराब झाल्याने नवीन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

साईआश्रम कडील इमारत क्र.A, B, व C या इमारतीमधील वातानुकुलीत यंत्रणे करीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडुन ११ के.व्ही.उच्च दाब विद्युतपुरवठा जोडुन घेण्यात आलेला आहे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या खंडीत होणा-या वीजपुरवठयाच्या पर्यायी विद्युत पुरवठयासाठी३२० केव्हीए चे दोन जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहेत. ३२० केव्हीएच्या दोन जनरेटरसेट पैकी जनरेटरसेट क्र.ईएसएन २५३११०५८ ची कंट्रोल असेंब्ली खराब झाली असल्याने सदरील जनरेटसेट ॲटोमॅटिक सिस्टिम ने चालु होत नाही. सदर असेंब्ली कमिन्स कंपनीचे अधिकृत डिलर यांचे व्यतिरिक्त बाहेरील पुरवठाधारक यांचेकडे उपलब्ध होत नसल्याने सदर असेंब्ली कमिन्स कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडुन खरेदी करुन बसवावी लागणार आहे

सन २०१६-२०१७ या वर्षाचे संस्थानचे सर्व जनरेटर सेट्चे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट कमिन्स कंपनीचे अधिकृत डिलर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स् ॲण्ड सर्व्हिसेस् औरंगाबाद यांना देण्यात आलेले आहे मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स् ॲण्ड सर्व्हिसेस् औरंगाबाद यांचे इंजिनिअर यांनी सदरील जनरेटरसेट ॲटोमॅटीकली चालुहोत नसल्याने जनरेटरसेटची कंट्रोल असेंब्ली चेक केली असता ती खराब झाल्याचे आढळले त्यामुळे त्यांनी कंट्रोल असेंब्ली नवीन बसवावी लागणार असल्याचा रिपोर्ट दिला आहे. मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स् ॲण्ड सर्व्हिसेस् औरंगाबाद यांना दिलेल्या वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टच्या स्पेअर्समध्ये कंट्रोल असेंब्लीचा समावेश नाही. त्यामुळे त्यांनी सदरील कंट्रोल असेंब्ली नविन बसविणेकामी येणा-या खर्चाचे कोटेशन पाठविले आहे. वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) असल्याने मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स् ॲण्ड सर्व्हिसेस् औरंगाबाद हे कंट्रोल असेंब्ली बसविणे कामाची मजुरी घेणार नाही. कोटेशनचा तपशील पुढीलप्रमाणे आहे

| Sr.No. | Part No. | Details | Qty. | Rate (In Rs.) | Cost (In Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 0300-6086 | CONTROL-ASSY (AC-Module) | 1 | 26,930.42 | 26,930.42 |
| 2 | 0300-6085 | Control-assy (C-Power Base board) | 1 | 20,647.75 | 20,647.75 |
| 3 | 0300-6088 | Display-Control (LED Board) | 1 | 463.75 | 00,463.75 |
| 4 | 504975 | SWITCH, KEY | 1 | 427.31 | 00,427.31 |
| 5 | 113000154 | FREIGHT CHARGES | 1 | 500.00 | 00,500.00 |
| 6 | Total ( 1 to 5) | | | | 48,969.23 |
| 7 | Vat 12.5% for all Parts | | | | 06,121.15 |
| 8 | Total ( 06 To 07) | | | | 55,090.38 |
| 9 | Round Up | | | | **55,090.00** |

उपरोक्तप्रमाणे साईआश्रम कडील ३२० केव्हीए डिझेल जनसेट क्र.ईएसएन २५३११०५८ ची कंट्रोल असेंब्ली बदलविणेकामी रक्कम रुपये ५५,०९०/- मात्र खर्च येणार आहे. तरी सदरील कंट्रोल असेंब्ली मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स् ॲण्डसर्व्हिसेस, औरंगाबाद यांचेकडुन बसवुन काम पुर्ण करुन घेणेस्तसेच सदरील कामास व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम कडील 320 केव्हीए डिझेल जनसेट क्र.ईएसएन 25311058 ची कंट्रोल असेंब्ली खराब झाल्याने नवीन कंट्रोल असेंब्ली मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स् ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचेकडुन बसवून घेणेस व याकामी येणाऱ्या रु.५५,०९०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.३४** **कनकुरी साठवण तलाव येथील पंपरुमकरीता नवीन केबल टाकणेचे कामाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८-११-२०१५ चे सभेतील विषय नं.०३ निर्णय क्र.५२१ (०२) अन्वये कनकुरी साठवण तलाव येथील पंपरुमकरीता नविन केबल टाकणेकामी मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांचे ई-निविदेतील दिलेले न्युनतम दर स्विकारणेत येऊन त्यांना जानं.एसएसएस / विद्युत / ५९१० / २०१६ दि.२६-०१-२०१६ अन्वये कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदरचे केबलचे काम पुर्ण करण्याची मुदत कार्यादेश दिल्यापासुन ०२ महिने इतकी देण्यात आली असून ही मुदत दि२५-०३-२०१६ रोजी संपणार आहे. मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांनी दि.०२-०३-२०१६ रोजीचे पत्रानुसार कामाचे पाईप व केबल साईटवर आले असून केबल टाकण्याचे कामास सुरुवात करणार असल्याचे कळविले होते. त्यानुसार विद्युत विभागामार्फत पाणीपुरवठा विभागास जानं.एसएसएस / विद्युत / २४१ / २०१६ दि.०५-०३-२०१६ अन्वये पत्र पाठवून मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक हे सदर कामास दि.०६-०३-२०१६ रोजी सुरुवात करणार आहेत. तरी संबंधीत काम वेळेवर पूर्ण होणेसाठी ठेकेदार यांना केबलच्या रुटमध्ये काही अडथळे आल्यास ते दूर करुन देण्यात यावे म्हणजे त्यांचेकडुन काम मुदतीत पुर्ण करुन घेता येईल असे कळविण्यात आले होते.

परंतु दि१६-०३-२०१६ रोजी पाणीपुरवठा विभागाने पत्र पाठवून कळविले आहे की साठवण तलावातील पाणी गळती होऊ नये याकरीता Geomembrance Sheet टाकण्याचे काम ठेकेदार मे.आर.के.सावंत यांचेमार्फत चालु असून सदरचे काम करताना संबंधीत ठेकेदार यांचेकडुन ट्रॅक्टरडंपर, जेसीबी इत्यादि अवजड वाहनांचा वापर होत आहे. सदर वाहनांना भरावावरुन जावे यावे लागणार आहे. केबल टाकणेकरीता नाली खोदल्यास अवजड वाहनांची वाहतुक करणे अशक्य होईल याकरीता केबल टाकणेचे काम हे साठवण तलावात Geomembrance Sheet टाकणेचे काम पूर्ण झालेनंतर सुरु करावे असे कळविले असल्याने साठवण तलावात Geomembrance Sheet टाकण्याचे काम पुर्ण झालेनंतर मेश्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना त्यांचे केबलचे काम करणेसाठी पुढे दोन महिन्याचा कामाचा कालावधी वाढवून दयावा लागणार आहे.

उपरोक्तप्रमाणे कनकुरी साठवण तलाव येथील ठेकेदार मे.आर.के.सावंत यांचेमार्फत Geomembrance Sheet टाकण्याचे काम पुर्ण झालेनंतर मेश्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना पाईप टाकण्याचे व त्यातून केबल पसरविण्याचे काम करणेसाठी त्यानंतर पुढे दोन महिन्याचा कामाचा कालावधी वाढवून देणेकामी प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलाव येथील ठेकेदार मे.आर.के.सावंत यांचेमार्फत Geomembrance Sheet टाकण्याचे काम पुर्ण झालेनंतर मेश्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना पाईप टाकण्याचे व त्यातून केबल पसरविण्याचे काम करणेसाठी त्यानंतर पुढे दोन महिन्याचा कालावधी वाढवून देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.३५** **कनकुरी साठवण तलाव येथील कनकुरी साठवण तलाव क्र.१ व ३ करीता नव्याने तयार करण्यात आलेल्या पंपरुमकरीता तसेच मे.महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि., नाशिक यांचेकडून देणगी स्वरुपात नव्याने तयार करण्यात आलेल्या कनकुरी साठवण तलावाचे पंपरुमकरीता केबल टाकणेचे कामाबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

पाणी पुरवठा विभागामार्फत संस्थानचे तीनही साठवण तलावास कॅनव्हास प्रुफींग करणेत येत आहे सदरचे काम करतेवेळी साठवण तलाव क्र.०१ व ०३ करीता नव्याने पंपरुम तयार करण्यात आलेले असून प्रत्येक पंपरुममध्ये १५ एच.पी.क्षमतेच्या इलेक्ट्रीक मोटारी बसविण्यात येणार आहे.

तसेच संस्थानचे मौजे कनकुरी येथील गट नं१२१ मधील जागेत मे.महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि, नाशिक यांचेकडून देणगी स्वरुपात संस्थानकरीता नव्याने३६ एम.एल.क्षमतेच्या साठवण तलावाची निर्मिती करुन देण्यात येत असून सदरच्या साठवण तलावाचे काम पुर्ण झाल्यानंतर त्याठिकाणच्या पंपरुममध्ये पंप बसविण्यात येणार आहे याकरीता उपरोक्त दोन्ही ठिकाणच्या पंपरुमकरीता आर.सी.सी.ह्युम पाईपमधुन योग्य क्षमतेच्या केबल टाकून मिळणेकरीता पाणी पुरवठा विभाग यांनी पत्रान्वये विद्युत विभागास कळविले आहे

त्यानंतर दिनांक ०४-०५-२०१६ रोजी कनकुरी साठवण तलाव येथे समक्ष जाऊन पाहणी करुन सदरच्या कामाची मोजमापे घेतलेली आहेत. परंतु याकरीता आवश्यक असलेली केबल तसेच आरसी.सी.ह्युम पाईप आपणाकडे नसल्याने सदरचे काम हे बाहेरील ठेकेदार यांचेकडुन करुन घ्यावे लागणार आहे त्याकरीता कराव्या लागणा-या विद्युतीकरण कामाचा खर्च शासनमान्य CSR (सन २०१३-२०१४) प्रमाणे तयार केलेला असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr. No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 7-1-17 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 3½ core 25 sq mm aluminium conductor with continuous 5.48 sq mm (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | 400 Mtr. | 241.50 | 0,96,600.00 |
| 02) | 7-1-21 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 3½ core 95 sq mm aluminium conductor with continuous 8.35 sq mm (10 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | 1000 Mtr. | 618.45 | 6,18,450.00 |
| 03) | 7-7-3 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3½ core 25 sq mm for PVC armoured cable as per specification No. CB-GL | 10 Nos. | 78.75 | 0,00,787.50 |
| 04) | 7-7-7 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3½ core 95 sq mm for PVC armoured cable as per specification No. CB-GL | 20 Nos. | 176.40 | 0,03,528.00 |
| 05) | 7-10-2 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 25 sq mm complete as per specification No. CBCL/AL | 40 Nos | 6.30 | 0,00,252.00 |
| 06) | 7-10-6 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 95 sq mm complete as per specification No. CBCL/AL | 80 Nos | 17.85 | 0,00,428.40 |
| 07) | Non DSR | Providing and construction (including excavation) brick masonry inspection cable chamber 600mm x 600 mm x 750mm internal side size with 75 mm thick RCC cover, filling screened sand and smooth internal plaster etc including watering, streaking joint on exposed faces, rocking at joint on exposed faces and watering complete and clearing the site by removing debris & making the site good. | 42 Nos. | 6,000.00 | 2,52,000.00 |
| 08) | Non DSR | Supplying and erecting Outdoor Stand Mounted Feeder Pillar for Street Light Panel with 63 Amp. TPN MCCB incomer and Four nos. of Copper Busbars,500V,100Amp for outgoing and provision for termination of Incoming minimum 25 sq.mm & outgoing minimum 25 & 16 sq.mm cables complete erected in min. 14 gauge CRCA sheet box with supporting angle, self lock, gasket ang slating top erected on CC foundation in an approved manner. | 01 No. | 30,000.00 | 0,30,000.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 09) | 7-6-7 | Supplying & laying (including excavation) 25 cm dia RCC Hume pipe of standard thickness at required depth up to 90 cms. below road / ground surface, for covering provided cable & necessary back filling with light ramming to make the road/ground surface as it was (Except bitumen carpet). | 800 Mtr. | 788.55 | 6,30,840.00 |
| 10) | 9-1-5 | Supply, Installation, Testing and commissioning of UL Certified / CPRI Tested Maintenance Free Earthing comprising of electrode of 17.2 mm diameter low Carbon Steel with 250 micron Molecular Copper Bonded Earthing Rod of Length 3m along with 25 kg Carbon Based environment friendly back fill Ground Enhancing compound required to fill up the excavated earth with required quantity as per specification no. EA-MOBI | 04 Nos. | 15,764.70 | 0,63,058.80 |
| 11) | 9-2-4 | Supplying and erecting Annealed bare copper wire of high purity of different size used for earthing on wall with necessary copper clamps fixed on wall / cable / conduit with screws in an approved manner. | 25 Kgs. | 930.30 | 0,23,257.50 |
| 12) | Non DSR | Supplying and erecting Stand/Wall Mounted main distributions panel with 14 gauge CRCA sheet complete with powder coating, 50sq.mm. clip-on terminal for outgoing cable connection, required size of bus bar for incoming cable connection, incoming ang outgoing chamber with required size of bus bar, self locking, Voltmeter, Ampere meter, selector switch for voltmeter & Amp. meter, KWH meter erected on CC foundation. Containing the following items.<br>01). 250 Amp. 4 pole MCCB for incomer -01 no.<br>02). 63 Amp. 4 pole MCCB for outgoing -03 nos.<br>03). 32 Amp. 4 pole MCCB for outgoing -02 nos.<br>04). Automatic star/delta starter for 15 H.P. with ON/OFF indicator and Amp. Meter-02 nos.<br>05). Automatic star/delta starter for 10 H.P. with ON/OFF indicator and Amp. Meter-02 nos.<br>06). Indicator for main supply & every main switch | 03 Nos. | 145000.00 | 4,35,000.00 |
| 13) | 7-1-15 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 4 core 10 sq mm aluminium conductor with continuous 5.48sq.mm (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | 400 Mtr. | 179.55 | 0,71,820.00 |
| 14) | 7-10-2 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable upto 16 sq mm complete as per specification No. CBCL/AL | 16 Nos | 6.30 | 0,00,100.80 |
| 15) | 8-3-14 | Providing & erecting 7 m high (clear height) galvanised OCTAGONAL pole with foundation bolts having bottom of 130 mm A/F, top 70 mm A/F, 4 poles 40 Amp. MCB for connection on provided foundation as per specification No.OHPL/OPL. | 12 Nos. | 13696.20 | 1,64,354.40 |
| 16) | 16-3-8 | Providing & casting of M- 20 grade reinforced cement concrete (RCC) foundation suitable for 6m to 8m high octagonal /conical G.I. pole considering the safe soil bearing capacity at site as 10 T/sq m at 1.5 m depth including supply of steel, concrete, excavation and fixing provided nut bolts with the help of template as per design in an approved manner. | 12 Nos. | 6319.95 | 0,75,839.40 |
| 17) | 2-8-19 | Supplying and erecting street light fitting suitable for 250W metal halide lamp complete with accessories on provided bracket as per specification no. FG-ODF/GSL | 12 Nos. | 4744.95 | 0,56,939.40 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 18) | 2-1-46 | Supplying and erecting Metal Halied lamp double ended 230V, 250 W . | 12 Nos. | 1141.35 | 0,13,696.20 |
| **Total Rs.:-** | | | | | **25,37,952.00** |

उपरोक्तप्रमाणे कनकुरी साठवण तलाव येथील साठवण तलाव क्र.०१ व ०३ करीता नव्याने तयार करण्यात आलेल्या पंपरुमकरीता तसेच मे.महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि, नाशिक यांचेकडून देणगी स्वरुपात नव्याने तयार करण्यात आलेल्या साठवण तलावाचे पंपरुमकरीता आर.सी.सी.ह्यु म पाईपमधून केबल टाकणेचे कामाकरीता अंदाजे रक्कम रुपये २५,३७,९५२/- (अक्षरी रुपये पंचवीस लाख सदोतीस हजार नऊशे बावन मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्चास व बाहेरील विद्युत ठेकेदार यांचेकडून ईनिविदा मागविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा मागविणेकरीता सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती. तसेच मा.त्रीसदस्यीय समितीची मान्यता मिळाल्यानंतर सदरच्या प्रस्तावास व खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता मिळणेस विनंती

निर्णय क्र.३५६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलाव येथील साठवण तलाव क्र.०१ व ०३ करीता नव्याने तयार करण्यात आलेल्या पंपरुमकरीता तसेच मे.महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि, नाशिक यांचेकडून देणगी स्वरुपात नव्याने तयार करण्यात आलेल्या साठवण तलावाचे पंपरुमकरीता आर.सी.सी.ह्यु म पाईपमधून केबल टाकणेचे कामाकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साहित्य खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणे येऊन, ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२५,३७,९५२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु सदरहू काम विभागांतर्गत करुन घेण्यात यावे.**

**तसेच याकामी येणाऱ्या खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.३६ संस्थानचे विविध विभागांना झेरॉक्स पेपर रिम खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** भांडार विभागाने उपरोक्त संदर्भीय क्र.१ नुसार दि. ०५.०३.२०१६ चे मंजूर टिपणीअन्वये संस्थानचे विविध विभागांस दैनंदिन कामकाजासाठी (कॉम्प्युटर प्रिंटर व झेरॉक्स मशीन) आवश्यक झेरॉक्स पेपर दरवर्षी देणगी स्वरुपात मिळतात. तथापि यावर्षी देणगी न मिळालेमुळे आता संस्थानच्या सर्व विभागांना लिगल साईज 13 x 8 व A4 (11 x 8) आवश्यकता असते. असे कळविले आहे.

तसेच सामान्य प्रशासन शाखा यांनी दि.१४.०३.२०१६ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे झेरॉक्स पेपरचे वर्णनाबाबत कळविले आहे.

१) **FS** (FOOLSCAPE) PAPER SIZE – JK COPIER (RED PACKING), 75 GSM, 500 Sheets Pack. **Mfg.by JK PAPER LTD.**

**२) A4** PAPER SIZE – JK COPIER (RED PACKING), 75 GSM, 500 Sheets Pack. **Mfg.by JK PAPER LTD.**

संस्थानचे विविध विभागातील कॉम्प्युटर प्रिंटर व झेरॉक्स मशीनसाठी झेरॉक्स पेपर खरेदी करणेकामी झेरॉक्स पेपर **FS** (लिगल साईज) (13 x 8) १,००० रिम व झेरॉक्स पेपर **A4** (11 x 8) २,५०० रिमची मागणी केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय–** वरील मागणीप्रमाणे झेरॉक्स पेपर खरेदी करणेकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशील | वर्णन | मागणी | अंदाजे दर | अंदाजे एकुण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | झेरॉक्स पेपर **FS** (FOOLSCAPE) | JK COPIER (RED PACKING), 75 GSM, 500 Sheets Pack. **Mfg.by JK PAPER LTD.** | १,००० रिम | २५०/- | २,५०,०००/- |
| ०२. | झेरॉक्स पेपर **A4** साईज | JK COPIER (RED PACKING), 75 GSM, 500 Sheets Pack. **Mfg.by JK PAPER LTD.** | २,५०० रिम | २००/- | ५,००,०००/- |
| **अंदाजे एकुण रुपये** | | | | | **७,५०,०००/-** |

उपरोक्त प्रमाणे अंदाजे रक्कम रु.७,५०,०००/- (अक्षरी रुपये सात लाख पन्नास हजार) मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल. मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेनंतर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून, झेरॉक्स पेपर खरेदी करता येतील.

**मागणी–** तरी वरीलप्रमाणे संस्थानचे विविध विभागांना आवश्यक झेरॉक्स पेपर FS (FOOLSCAPE), 75 GSM व A4 Size, 75 GSM चे अनुक्रमे १,००० व २,५०० रिम खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.७,५०,०००/- (अक्षरी रुपये सात लाख पन्नास हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर.

**निर्णय क्र.३५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानचे विविध विभागांना आवश्यक असलेले झेरॉक्स पेपर FS (FOOLSCAPE), 75 GSM व A4 Size, 75 GSM चे अनुक्रमे १,००० व २,५०० रिम खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.३७** **जाहिरात खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** सन २०१६-१७ चे किराणामाल खरेदी रक्कम रु. ४९,६०,००,०००/- (रुपये एकोणपन्नास कोटी साठ लाख) अधिक भाजीपाला खरेदी रक्कम रु. ३,००,००,०००/- (रुपये तीन कोटी) असे एकुण रक्कम रु.५२,६०,००,०००/- (रुपये बावन्न कोटी साठ लाख) मात्रचे खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळणेकामी सिव्हिल ॲप्लिकेशन क्रमांक ३४८९/२०१६ सादर केले असता, मा.उच्च न्यायालयाने किराणामाल खरेदीसाठी दिनांक ०४.०४.२०१६ रोजी खालीलप्रमाणे निर्देश दिले होते.

1. Heard.
2. Perused the stock statement filed on record today.
3. The application deserves to be allowed. However, we suggest to the applicant Trust that they should give wider publicity, so as to attract the manufacturers on certain items which would be then made available at a cheaper rate. In order to cheaper rates wider publicity is necessary.
4. The application is allowed in terms of prayer **Clause- (B).**
5. In the meantime the Trust is also permitted to purchase the Kirana stock for one month period directly from the earlier Vendor.

(किराणा मालासाठी Civil Application No.3489/2016 मधील **Clause ('B') खालीलप्रमाणे-**

B. The applicant may please be permitted to purchase grocery items for the financial year 2016-2017 through E-tender, And vegetables through auction from Agricultural Products Marketing committee process by spending the amount of Rs.52,60,00,000/-.)

मा.उच्च न्यायालयाचे वरील निर्देशास अनुसरुन, किराणामाल खरेदीकामी जाहिराती शासकीय दराने देण्याबरोबरच Wider Publicity साठी जनसंपर्क कार्यालयामार्फत खालीलप्रमाणे वर्तमानपत्रात देण्यात आल्या आहेत.

| **अ.नं.** | **वर्तमानपत्राचे नांव** | **आवृत्ती** | **अंदाजे अपेक्षित खर्च रु.** |
|---|---|---|---|
| १ | टाईम्स ऑफ इंडिया | चेन्नई, बेंगलोर | २,०८,०००/- |
| २ | इंडियन एक्सप्रेस | अहमदाबाद | ३१,६००/- |
| ३ | हिंदुस्थन टाईम्स | इंदौर | १०,०००/- |
| ४ | इनाडू | हैद्राबाद सर्व आवृत्या | १,१९,६००/- |
| ५ | दैनिक भास्कर | कोटा | ८०,८००/- |
| | | **एकुण रक्कम रु.** | **४,५०,०००/-** |

वरील नमूद केल्याप्रमाणे याकामी अंदाजे रक्कम रु. ४,५०,०००/- (रुपये चार लाख पन्नास हजार) खर्च जनसंपर्क कार्यालयाने कळविला आहे.

**ब)** सन २०१६-१७ साठी गायीचे गावरान तुप खरेदीकामी रक्कम रु.३५,७०,००,०००/- (रुपये पसतीस कोटी सत्तर लाख) मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीने दिनांक ०२.०२.२०१६ चे सभेत निर्णय क्रमांक. २० अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदर खर्चास मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेसाठी सिव्हिल ॲप्लिकेशन क्रमांक ३४९०/२०१६ सादर केले असता मा.उच्च न्यायालयाने दिनांक ३१.०३.२०१६ रोजी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

1. Heard.
2. The Civil Application is allowed in terms of prayer **clause 'B'** of the application.

(गावरान तुपासाठी Civil Application No.3490/2016 मधील **Clause 'B' खालीलप्रमाणे-**

B. The applicant may please be permitted to purchase Cow Ghee for the financial year 2016-2017 through E-tender process by spending the amount of Rs. 35,70,00,000/-.)

मा.उच्च न्यायालयाने किराणामाल खरेदीकामी Wider Publicity चे निर्देश दिलेले असल्यामुळे, गावरान तूप खरेदीसुद्धा मोठ्या प्रमाणात असल्यमुळे शासकीय दराने जाहिराती देणेबरोबरच जनसंपर्क कार्यालयामार्फत खालीलप्रमाणे जाहिराती वर्तमानपत्रात देण्यात आल्या आहेत.

| अ.नं. | वर्तमानपत्राचे नांव | आवृत्ती | अंदाजे अपेक्षित खर्च रु. |
|---|---|---|---|
| १ | टाईम्स ऑफ इंडिया | चेन्नई, बेंगलोर | १,६६,४००/- |
| २ | इंडियन एक्स्प्रेस | अहमदाबाद | ३०,४८०/- |
| ३ | हिंदुस्थन टाईम्स | इंदौर | ८,०००/- |
| ४ | इनाडू | हैद्राबाद सर्व आवृत्या | ९५,६८०/- |
| | | **एकुण रक्कम रु.** | **३,००,५६०/-** |

वरील नमूद केल्याप्रमाणे गावरान तूप खरेदीकामी जाहिरात खर्चासाठी अंदाजे रक्कम रु.३,००,५६०/- (रुपये तीन लाख पाचशे साठ) मात्रचा खर्च जनसंपर्क कार्यालयाने कळविला आहे.

तरी वरील अ व ब कामी जाहिरात खर्चासाठी येणारे अंदाजे एकुण रक्कम रु.७,५०,५६०/- (रुपये सात लाख पन्नास हजार पाचशे साठ) मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळणेकामी सविनय सादर.

**निर्णय क्र.३५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानसाठी आवश्यक असलेला वार्षिक किराणा माल व गावरान तुप खरेदीकामी मा.उच्च न्यायालयाचे निर्देशास अनुसरुन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस व त्याकामी आलेल्या रु.७,५०,५६०/- मात्र खर्चास समिती अध्यक्ष व सदस्यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेऊन, कार्यवाही पुर्ण करण्यात आलेली आहे. त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.३८** **दक्षिणा पेटयांमधील नोटा मोजणीकामी असलेल्या Multy Currency Desktop Banknote Counter/ Sorter Model- Seetech ST- 350 मशिन्सचे स्पेअरपार्ट खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दक्षिणा पेटीतील नोटा मोजणीकामी सध्या Multy currency desktop bank note counter/sorter model- seetech 350(3+1 Pockets) या तीन मशिनचा वापर करण्यात येत आहे. सदरच्या मशिन कोरस इंडीया लि. पुणे यांचेकडून दि १६/५/२०१३ रोजी दोन व दि. २७/१/२०१४ रोजी एक प्रति नग रु. ८,००,०००/- याप्रमाणे घेण्यात आलेल्या आहेत. व त्यांचेकडून वार्षिक सर्व्हिसिंगA.M.C व्दारे करुन घेण्यात येत आहे.

सदर मशिनव्दारे नोटा मोजल्या जात आहेत महिन्यातून साधारणत: ८ ते १० काऊंटींग होत असतात. दक्षिणापेटया मध्ये निघणा-या नोटा मोठया प्रमाणात असतात, त्यामुळे सततच्या वापरामुळे त्यांचेवर ताण पडून त्यांचे स्पेअरपार्ट खराब होऊन त्या नादुरुस्त होत आहेत. सदर मशिनचा होणारा वापर व वेळोवेळी होणारी त्यांची दुरुस्ती यामुळे दक्षिणापेटी नोटा मोजणीकामी व्यत्यय व उशीर होतो. मशिनमध्ये अचूक मोजणी होणे देखील आवश्यक आहे.

दि. १६/४/२०१६ शनिवार रोजी मे. कोरस इंडिया लि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री आनंद जगताप व त्यांच्या सहका-यांनी सध्या वापरात असलेल्या Multy Currency Desktop Banknote Counter/Sorter Model- Seetech ST-350 या तीनही मशिनची पाहणी करुन त्याचे स्पेअरपार्ट बदलून तीनही मशिनची पुनर्रबांधणी करावी लागेल, असे त्यांनी सांगितले. त्यानुसार त्यांनी दि. २१/४/२०१६ रोजी खालीलप्रमाणे बदलाव्या लागणा-या स्पेअरपार्टची यादी खर्चासह ई-मेलव्दारे दिलेली असून त्याकामी स्पेअरपार्टची अंदाजे किंमत ४,१०,०००+ १४.५०% टॅक्स-५९, ४५० असे एकूण ४,६९,४५०/- इतका खर्च कळविलेला आहे. त्याबाबत त्यांचेशी चर्चा केली असता त्यांनी साईबाबा संस्थानसाठी सवलत देऊन दि. १४/५/२०१६ रोजीचे ई-मेलव्दारे तीन मशिनकरीता एकूण खर्च रु. ४,५४,५६५/-मात्र यांनी दिलेला आहे.मे. कोरस इंडिया लि. पुणे यांचे पत्र सोबत अवलोकनार्थ जोडलेले आहे.

**स्पेअरपार्टची यादी ..**

| ST-350 SPARE PARTS | | | |
|---|---|---|---|
| **Sr No** | **PART NAME** | **PART CODE** | **QTY** |
| 1 | FND BOARD ASS'Y ST-350 | FS0008 | 2 |
| 2 | Kicker Module Harness ST-350 | FS0606 | 3 |
| 3 | MD MODULE HARNESS ST-350 | FS0605 | 3 |
| 4 | SWING SELECTOR ASS'Y (SOLENOLD) ST-350 | SET-FS0021 | 6 |
| 5 | STACKER ENCODER BOARD ASS'Y ST-350 | FS0015, FS0019, FS0020 | 6 |
| 6 | TRANSFER MODULE HARNESS ST-350 | FS0617 | 3 |
| 7 | CIS BOTTOM SENSOR HARNESS ST-350 | FS0643 | 3 |
| 8 | CIS TOP SENSOR HARNESS ST-350 | FS0642 | 3 |
| 9 | TDS BODY ASS'Y ST-350 | SET-FS0010 | 3 |
| 10 | REJECT SENSOR HOUSING ASS'Y ST-350 | SET-FS0018 | 3 |
| 11 | HOPPER SENSOR B/D (BLUE) ST-350 | FS0009 | 3 |
| 12 | PM2 HOUSING ASS'Y (RED) ST-350 | SET-FS0014 | 18 |
| 13 | BITE ROLLER ASS'Y ST-350 | SET-FS0001 | 3 |

| | | | |
|---|---|---|---|
| 14 | TRANS T/R SHAFT ASS'Y ST-350 | SET-FS0003 | 15 |
| 15 | BITE TENSION ROLLER SHAFT ASS'Y ST-350 | SET-FS0004 | 3 |
| 16 | MAIN DRIVING PULLEY ST-350 | 1072 | 100 |
| 17 | BL MOTOR PULLEY ST-350 | FS0204 | 3 |
| 18 | S3M255 ST-350 | FS0906 | 3 |
| 19 | S3M 237 ST-350 | FS0904 | 3 |
| 20 | SPRING ST-350 | FS0501 | 20 |
| 21 | S3M 16T PULLEY ST-350 | FS0205 | 3 |
| 22 | GAS SPRING ST-350 | FS2400 | 6 |
| 23 | STACKER COVER ST-350 | FS0251 | 1 |
| 24 | TENSION ROLLER SPRING ST-350 | FS0501 | 30 |
| 25 | SP GUIDE 2 ST-350 | FS0223 | 30 |
| 26 | GUIDE T/R SHAFT ASS'Y ST-350 | SET-FS0015 | 18 |
| 27 | LF-1680ZZ ST-350 | 46 | 150 |
| 28 | FND HARNESS ST-350 | FS0615 | 3 |
| 29 | LCD MODULE ASSY ST-350 | SET-FS0034 | 3 |

वरीलप्रमाणे स्पेअरपार्ट कोरस इंडिया लि. पुणे यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रु. ४,५४,५६५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सविनय सादर.

**निर्णय क्र.३५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दक्षिणा पेटयांमधील नोटा मोजणीकामी असलेल्या Multy Currency Desktop Banknote Counter/ Sorter Model- Seetech ST- 350 मशिन्सचे प्रस्तावात नमुद केलेले स्पेअरपार्ट कोरस इंडिया लि. पुणे यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रु.४,५४,५६५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु तत्पुर्वीप्रस्तावित मशिन्स बायबॅक करता येतील का, त्यासाठी किती खर्च येईल याचाही सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३९** **फोम कंपाऊंड वार्षिक खरेदीच्या टेंडरबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी संस्थानचे अग्निशमन वाहन (फोम टेंडर) सेवा शिर्डी विमानतळ, शिर्डी एअरपोर्ट व परीसरातुन मागणी झालेस सशुल्क पुरविणे बाबत दि२८.१२.२०१६ रोजीचे मा. व्य.समितीचे सभेत विषय क्र. ४१ व निर्णय क्र.६५९ नुसार संमत झालेला आहे. संस्थानचे अग्निशमन वाहनावरील तेलाचे व गॅसचे आगीसाठी उपयुक्त असणारी फोम कंपाऊंड क्षमता ५०० लिटर्स आहे. सदर फोमचा वापर झालेस फोम खरेदी दराप्रमाणे संबंधीतांकडून चार्ज वसूल करावयाचा आहे. संस्थानचे दोनही अग्निशमन वाहनांमध्ये फोम सुविधा आहे.

फायर ॲण्ड सेफ्टी विभागामार्फत ई-निवीदा प्रक्रीयेमार्फत ५०० लिटर्स फोम खरेदी करुन अग्निशमन वाहनांमध्ये रिफील केलेला आहे. परंतू यापुढे आगीची घटना कधी? तसेच घटनेवेळी किती प्रमाणात फोमचा वापर होईल हे निश्चित नाही त्यामुळे फायर विभागाकडे स्टॅंडबाय वापरासाठी कायमस्वरुपी अतिरीक्त ५०० लिटर्स फोम उपलब्ध असणे आवश्यक आहे. सन २०१६-२०१७ साठी अंदाजे १२५० लिटर्स साठी अंदाजे १ लाख खर्च अपेक्षित आहे. बाजारभावात चढ-उतार होत असल्यामुळे तसेच ऐनवेळी फोम कंपाऊंडची आवश्यकता भासल्यास खरेदी प्रक्रीयेमुळे विलंब होईल, तसे होऊ नये म्हणून पुरवठाधारकांकडून वार्षिक टेंडर बोलावून मंजूर दराने आवश्यकता व वापरानुसार फोम कंपाऊंड खरेदी करता येईल असे नम्र मत आहे.

| अ.क्र. | तपशील | सन-२०१६-२०१७ साठी आवश्यकतेनुसार मागणी (अंदाजे) | अंदाजे दर | | | अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रुपये | पैसे | प्रमाण | रुपये |
| ०१ | AFFF 3% फोम कंपाऊड | १२५० लिटर्स | ८० | ०० | लिटर्स | १,००,०००/- |

**फोम कंपाऊंड वार्षिक खरेदी प्रक्रीया राबविणेकामी खालील बाबतीत निर्णय होणेस विनंती.**

अ. फोम कंपाऊंड पुरवठाधारकांकडून वार्षिक कोटेशन मागवून विहीत पध्दतीने कार्यवाही करणेस मान्यता असावी.

ब. वार्षिक फोम खरेदी प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे १ लाख रुपये खर्चास मान्यता असावी.

तरी उपरोक्त **अ व ब** बाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, फायर ॲण्ड सेफ्टी विभागासाठी सन २०१६-२०१७ साठी अंदाजे १२५० लिटर्स फोम कंपांऊडचे वार्षिक दर बोलाविणेकरीता विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- फायर ॲण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

**विषय नं.४०** **गुरुकृपा एन्टरप्रायजेस यांचे बील अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१३– २०१४ मध्ये On Consignment Basis वरील साहित्य खरेदीकामी M/s. Deepak Enterprises, Nashik यांनी इकडील पत्र क्र. १४०१, दि. ०४/०७/२०१४ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. M/s. Deepak Enterprises, Nashik यांनी सदर निविदेमध्ये J & J कंपनीचे TKR व THR भरलेले होते.

परंतु, सन २०१५– २०१६ या वर्षातील On Consignment Basis वरील ई– निविदेमध्ये कुठल्याच निविदाधारकाने ई– निविदा भरलेली नसल्यामुळे याकामी पुन्हा फेर– निविदा काढण्यात आलेली आहे. परंतु, दि. १५/०९/२०१५ रोजीच्या पत्रान्वये J & J कंपनीने M/s. Deepak Enterprises, Nashik यांचे Authorisation काढून घेऊन, M/s. Gurukrupa Enterprises, Nashik यांना J & J कंपनीचे Authorisation दिले आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना चालू असून त्यामध्ये TKR व THR चे पेशंटची संख्या फार मोठ्या प्रमाणात असल्यामुळे सदर मटेरियल हे M/s. Gurukrupa Enterprises, Nashik यांचे J & J कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडून J & J कंपनीचे अधिकृत M/s. Gurukrupa Enterprises, Nashik यांचेकडून खरेदी करण्यात आले होते. जेणेकरुन रुग्णांची गैरसोय होऊ नये त्यानुसार आतापर्यंत एकूण रक्कम रु. ५,५८,७००/- (अक्षरी रु.पाच लाख अठ्ठावन्न हजार सातशे मात्र) इतक्या रक्कमेची खरेदी करण्यात आलेली आहे.

**त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-**

| Sr. No. | Bill No. | Date | Total Amt in Rs. |
|---|---|---|---|
| 1 | 30 | 01/12/2015 | 79900.00 |
| 2 | 29 | 27/11/2015 | 79900.00 |
| 3 | 37 | 08/12/2015 | 79500.00 |
| 4 | 39 | 17/12/2015 | 70000.00 |
| 5 | 52 | 23/01/2016 | 45000.00 |
| 6 | 54 | 26/01/2016 | 79900.00 |
| 7 | 69 | 18/02/2016 | 45000.00 |
| 8 | 58 | 02/02/2016 | 79500.00 |
| **Total Amt in Rs.** | | | **558700.00** |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७ – २ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना चालू असून त्यामध्ये TKR व THR चे पेशंटची संख्या फार मोठ्या प्रमाणात असल्यामुळे सदर मटेरियल हे J & J कंपनीचे अधिकृत विक्रेते M/s. Deepak Enterprises, Nashik यांना Authorisation दिलेले आहे व M/s. Deepak Enterprises, Nashik यांना M/s. Gurukrupa Enterprises, Nashik ला No Objection सर्टीफिकेट दिलेले आहे. तरी M/s. Gurukrupa Enterprises, Nashik यांचे बील अदा करण्यास हरकत नाही असे मत आहे.

उपरोक्त प्रमाणे M/s. Gurukrupa Enterprises, Nashik यांचेकडून खरेदी केलेल्या मटेरियलचे एकूण बील रक्कम रु. ५,५८,७००/- (अक्षरी रु.– पाच लाख अठ्ठावन्न हजार सातशे मात्र) इतके अदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या विभागाच्या अभिप्रायानुसार M/s. Gurukrupa Enterprises, Nashik हे J & J कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत याची खात्री होत असल्यामुळे M/s. Gurukrupa Enterprises, Nashik यांचे रु.५,५८,७००/- मात्रचे बील अदा करणेस मान्यता देण्यात आली, परंतु तत्पुर्वी J & J कंपनीकडून तसे लेखी पत्र मागविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४१** **माहे नोव्हेंबर- २०१५ व जानेवारी- २०१६ मध्ये तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

**विषय नं.४२** **माहे जानेवारी- २०१६ मध्ये तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

**विषय नं.४३** **श्री साईबाबा हॉस्पिटलच्या Ground Floor येथील विविध मशिन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे नुतनीकरण करणेबाबत.**

**विषय नं.४४** **श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे नुतनीकरण करणेबाबत.**

**विषय नं.४५** **श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाकरीता Cell Counter Machine (Cell 210) खरेदी करणेबाबत.**

| | |
|---|---|
| **विषय नं.४६** | **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड / विभागाकरीता हॉस्पिटल व कार्यालयातील फर्निचर खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं.४७** | **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डायलेसीस विभागाकरीता डायलेसीस चेअर खरेदीबाबत.** |
| **विषय नं.४८** | **श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T.1 या विभागाकरीता Instrument खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं.४९** | **श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T.1 या विभागाकरीता नवीन Shadowless Lamp खरेदी व जुना Shadowless Lamp Buyback करणेकामी M/s Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai यांचा पुरवठा आदेश रद्द करुन फेर ई-निविदा मागविणेबाबत.** |
| **विषय नं.५०** | **श्री साईबाबा रुग्णालयातील Dental O.P.D. या विभागाकरीता Equipment खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं.५१** | **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. या विभागाकरीता Co,Electronic Endoflator खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं.५२** | **CVTS OT-H, CRU-III, GICU व डायलेसिस विभागातील यु.पी.एस.करीता बॅटरीज खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं.५३** | **श्री साईबाबा रुग्णालयातील Casualty या विभागाकरीता Multiparameter Monitor खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं.५४** | **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. या विभागाकरीता Arthoscope खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं.५५** | **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. या विभागाकरीता Fully Automated Horizontal Autoclave Machine खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं.५६** | **श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ओ.टी.या विभागाकरीता Light Source with Head Lamp जुने Buyback करुन नवीन खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं.५७** | **श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरीता Refrigerated Blood Bag Centrifuge Machine जुने Buyback (परत) करुन नवीन खरेदी करणेबाबत.** |
| **विषय नं.५८** | **यु.व्ही.एअर स्टरीलायझरचे दुरुस्तीबाबत.** |
| **विषय नं.५९** | **मोफत मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीराचेआयोजन करणेबाबत.** |
| **निर्णय क्र.३६२** | वेळेअभावी विषय नं.४१ ते ५९ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली. |

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करणेत आली.**

आयत्या वेळेचा

**विषय नं.०१** **रे.मु.नं. ३००/२००४ वादी (मयत) १) हरिभाऊ त्रिबक शेळके, १ अ) साखरबाई हरिभाऊ शेळके (मयत) २) श्री साईबाबा संस्थान विरुध्द प्रतिवादी नं. १ रघुनाथ नाथा कोते व इतर मध्ये त्रिसदस्य समितीच्या वतीने कार्यकारी अधिकारी यांना स्वाक्षरीचे अधिकार देणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्रस्तुतचा दावा वादी, श्री हरीभाऊ त्रिंबक शेळके, व श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, व इतर, यांनी, प्रतिवादी, श्री रघुनाथ नाथा कोते व इतर, यांचे विरुध्द दाखल केला आहे, श्री हरिभाऊ शेळके, यांचेकडून संस्थानने खरेदी केलेल्या जमीनीतील अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळणेसाठी दावा दाखल केला आहे, संस्थानने विकत घेतलेले सर्व्हे नं.१०९/२ वर, प्रतिवादीने (श्री रघुनाथ नाथा कोते व इतर) अतिक्रमण केले आहे, त्या अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळावा, यासाठी, सदरचा दावा जमिनीचे मुळ मालक, श्री हरीभाऊ त्रिंबक शेळके, यांचे समवेत संस्थानने दाखल केला आहे, श्री रघुनाथ नाथा कोते, यांचे २० आर + १४ आरचे अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा मिळावा, याकरीता, सदर दावा दाखल आहे, (प्रतिवादी नं. २ ते ४, प्रभाकर गोविंद कोते, यांचे २+४+२+२ = १० आर, चे अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा मिळावा, या साठीही, सदर दावा दाखल आहे), परंतु, त्यांचे समवेत नंतर समझोता झालेला आहे, दाव्यामध्ये श्री हरिभाऊ त्रिंबक शेळके, व संस्थानने खालील प्रमाणे मा.कोर्टास विनंती केलेली आहे.

१) प्रतिवादी नं.१ कडून, त्यांनी आपल्या स.नं.१८९ मध्ये स.नं.१०९ पैकी २० आर जे अतिक्रमण करुन कब्जा केला आहे, त्या क्षेत्राचा मालकी हक्काने वादी अगर वादी नं.२, यांना प्रत्यक्ष कब्जा देवावा.

२) प्रतिवादी नं.१ कडून, त्यांनी आपल्या स.नं.११३ मध्ये स.नं.१०९ पैकी १४ आर, जे अतिक्रमण करुन कब्जा केला आहे, त्या क्षेत्राचा मालकी हक्काने वादी अगर वादी नं.२ यांना प्रत्यक्ष कब्जा देवावा.

३) प्रतिवादी नं.२ कडून, त्यांनी आपल्या स.नं.१०७/१क, मध्ये, स.नं.१०९ पैकी ४ आर, स.नं.१०७/१क+ड मध्ये स.नं.१०९ पैकी २ आर, जे अतिक्रमण करुन कब्जा केला आहे, त्या क्षेत्राचा मालकी हक्काने वादी अगर वादी नं.२, यांना प्रत्यक्ष कब्जा देवावा.

४) प्रतिवादी नं.३ व ४ कडून, त्यांनी आपल्या स.नं.१०७/२/१अ मध्ये, स.नं.१०९ पैकी २ आर, जे अतिक्रमण करुन कब्जा केला आहे, त्या क्षेत्राचा मालकी हक्काने वादी अगर वादी नं.२ यांना प्रत्यक्ष कब्जा देवावा.

५) प्रतिवादी नं.४ कडून, त्यांनी आपल्या स.नं.१०७/१ब मध्ये स.नं.१०९ पैकी २ आर जे अतिक्रमण करुन कब्जा केला आहे. त्या क्षेत्राचा मालकी हक्काने वादी अगर वादी नं. २ यांना प्रत्यक्ष कब्जा देवावा.

६) प्रतिवादी नं.१ ते ४ यांचेकडून, मागील दरम्यानचे व इतर कब्जा मिळेपावेतो पुढील दरम्यानचे उत्पन्न एकाच वेळी ठरविण्याचा हुकूम व्हावा, जी काही रक्कम, मे. कोर्टात उत्पन्नाचे चौकशीच्या वेळी देववील त्यावर वादी स्टॅम्प भरण्यास तयार आहे.

७) दाव्याचा खर्च वकिल फीसह देवावा व इतर इतर योग्यती न्यायदाद देवावी हि विनंती.

वादी नं.१ व २ यांनी कोर्टास वरील प्रमाणे विनंती केली आहे

प्रस्तुत दावा, कोपरगांव कोर्टातून राहाता कोर्टात वर्ग झाला आहे, दाव्यातील, श्रीमती साखरबाई शेळके, ह्या दि.०५/०८/२००८, रोजी शिर्डी, येथे मयत झाल्या असून, त्यांच्या तीन मुली, त्यांच्या वारस आहेत. १) रजनी विश्वास जोगळेकर, २) संजिवनी दशरथ महांबरे, ३) सोनिया देविदास पाटील, सुरुवातीचे वारस, यापुर्वीच म्हणजे, श्री हरिभाऊ त्रिबक शेळके, मयत झाल्यानंतर, वारस रेकॉर्डवर आलेले आहेत.

सदर दाव्यामध्ये, संस्थानच्या वतीने, ॲड.श्री एम.पी.गुजराथी, यांचे वकीलपत्र दिलेले आहे, दाव्यात संस्थानच्या वतीने नविन ट्रस्टी व मा. कार्यकारी अधिकारी साहेब, यांच्या बदलाबाबत दुरुस्ती अर्ज दाखल केलेला आहे, सदर काम सुलभ व्हावे यादृष्टीने दाव्याचे सर्व अधिकार, मा.कार्यकारी अधिकारी साहेब, यांना देणेत यावे, या बाबतचे निर्णयार्थ, मा.व्यवस्थापन समितीचे, दि.०२/०२/२०१६, रोजीचे सभेत, विषय नं.७८ अन्वये सादर करण्यात आला होता, त्यावर, निर्णय क्र.६४, अन्वये, यावर सविस्तर चर्चा होऊन " रे.मु.नं. ३००/२००४, वादी (मयत), १) हरिभाऊ त्र्यंबक शेळके, १) अ) साखरबाई हरिभाऊ शेळके (मयत), २) श्री साईबाबा संस्थान विरुध्द प्रतिवादी, नं.१, रघुनाथ नाथा कोते व इतर दाव्यात संस्थानच्या वतीने, मा.कार्यकारी अधिकारी, यांना सर्व अधिकार देण्यात यावे", असे ठरले.

प्रस्तुत निर्णयाप्रमाणे सदरचा ठराव, मा.कोर्टात दाखल करण्यात आला होता, परंतू, प्रस्तावामध्ये, मा.कोर्टाचे नावाचा उल्लेख आल्याने सादरचा निर्णय रद्द करुन, मा.कोर्टाचे नावाचा उल्लेख वगळून निर्णय घ्यावा असे सुचीत केले आहे

तरी, सदर दाव्याचे कामकाज सुलभ व्हावे यादृष्टीने, दाव्याचे सर्व अधिकार, मा.कार्यकारी अधिकारी साहेब, यांना देणेबाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे उपरोक्त दाव्याचे कामकाज सुलभ व्हावे यादृष्टीने, सदरहू दाव्याच्या कामकाजाबाबतचे सर्व अधिकार कार्यकारी अधिकारी यांना देणेत यावे.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१६ साजरा करणेस व याकामी येणा-या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ महाराष्ट्र शासन अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ (१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील. "त्याप्रमाणे रुढी परंपरेनुसार धार्मिक पूजा विधी, उत्सव साजरे केले जातात.

सालाबाद प्रमाणे यावर्षी श्री गुरुपौर्णिमा उत्सव सोमवार, दि.१८/०७/२०१६ ते बुधवार, दि. २०/०७/२०१६ असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचा मुख्य दिवस मंगळवार दि१९/०७/२०१६ आहे. या उत्सवासाठी खालीलप्रमाणे तयारी करावी लागणार आहे.

| अ.नं | तपशील | उत्सवात करावयाची कामे |
|---|---|---|
| १ | उत्सव निमंत्रण पत्रिका | संस्थानचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदीमध्ये दुरुस्ती झाल्याप्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात.<br>यंदाचे श्री गुरुपौर्णिमा उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन१८०००० पाकीटांसह निमंत्रण पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील.<br>तसेच नेहमी प्रमाणे प्रेस नोट (न्यूज ॲटम) म्हणून वर्तमान पत्रातून प्रसिध्दी देण्यात येईल. |
| २ | उत्सव व्यवस्था | **अ) कलाकार कार्यक्रम** |
| | सोमवार दि.१८/०७/२०१६. (प्रारंभ दिवस) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ. १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम समाधी मंदीराशेजारील उत्तरेकडील स्टेजवर होईल. |
| | मंगळवार दि.१९/०७/२०१६ (मुख्य दिवस) | १) सायंकाळी ०७.३० ते रात्रौ. १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम समाधी मंदीराशेजारील उत्तरेकडील स्टेजवर होईल.<br>२) रात्रौ. ११.०० ते सकाळी ०५.०० पर्यंत (१९/०७/२०१६) इच्छुक कलाकारांचा साईभजन कार्यक्रम होईल. यादिवशी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | बुधवार दि. २०/०७/२०१६. (सांगता दिवस) | सायंकाळी ७.३०० ते १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (समाधी मंदीराचे उत्तरेकडील स्टेजवर) उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम ठरावयाचे आहेत.<br>**इच्छूक कलाकारांची पत्रे व तक्ता नंतर सादर केला जाईल.** |

| | | |
|---|---|---|
| | सोमवार दि.१८/०७/२०१६ मंगळवार दि.१९/०७/२०१६ बुधवार दि. २०/०७/२०१६ | **ब) कीर्तन कार्यक्रम** श्री गुरुपौर्णिमा उत्सवासाठी तीन दिवस कीर्तन कार्यक्रम ठेवावयाचा आहे. निमंत्रीत कीर्तनकारांची व कलाकारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदिर विभागामार्फत अदा करण्यत येईल. |
| ३ | श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण) पूजा व अभिषेक पूजा | उत्सवकाळात दि. १८/०७/२०१६ ते दि. २०/०७/२०१६ अखेर श्री साईसत्यव्रत पूजा व अभिषेक पूजा बंद राहतील |
| ४ | विद्युत रोषणाई | समाधी मंदिर, द्वारकामाई , चावडी, गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री गुरुपौर्णिमा उत्सवात श्री साईराज डेकोरेटर्स,मुंबई विनामुल्य रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा- नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते मात्र ट्रक भाडे व जाणे - येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना पत्र देण्यात आलेले आहे ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल |
| ५ | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात दिनांक १८/०७/२०१६ रोजी सकाळी ५.१५ वाजता श्री द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल<br>दि. १९/०७/२०१६ रोजी सकाळी ०५.०० वाजता त्यांची समाप्ती होईल. मा.त्रिसस्य समितीचे ३ सदस्य पहिले तीन अध्याय वाचतील व राहिलेले ५० अध्याय प्रत्येकी एक असे ५० भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नांवे दि२०/०७/२०१६. रोजी समाधी मंदिरासमोरील स्टेजवर कर्मचा-याकडे नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नांवे निश्चित केली जातील पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल.या उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता त्रिसदस्य समितीचे सदस्य रहातील. |
| ६ | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी सोमवार दिनांक१८/०७/२०१६ रोजी श्रींचे पालखीची गांवातून रात्रौ ९.१५ वाजता मिरवणूक होईल, मंगळवार दिनांक२०/०७/२०१६ रोजी रात्रौ ९.१५ वाजता रथाची गांवातून मिरवणूक होईल. |
| ७ | संरक्षण व्यवस्था | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मापोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा.पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल |
| ८ | प्रसाद - भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टांन्नासह रुपये १०/- या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते.मा.त्रिसदस्य समितीचे सदस्यांचे कुटुंबीय व नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्तींना व निमंत्रीत कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजन व्यवस्था नेहमीप्रमाणे करण्यात येईल. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इ.कॅटींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टांन्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात येईल उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी चालू करावी लागतील. तशी व्यवस्था करण्यात येईल.<br>तसेच श्री रामनवमी उत्सवात पालखीधारकांना आलेल्या दिवशी एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन दिले होते, त्यानुसार श्री गुरुपौर्णिमा उत्सवात येणाऱ्या पालखीधारकांना एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन द्यावयाचे आहे श्री रामनवमी उत्सवात सन २०१६ तिनही दिवसाचे मिष्टांन्न पदार्थ पुढील प्रमाणे ठेवण्यात आले होते.<br>१) प्रथम दिवस - बुंदी (२) मुख्य दिवस - बुंदी (३) सांगता दिन - बुंदी<br>या उत्सवात देखील यानुसार तीन दिवस तीन मिष्टांन्न देण्यात येतील. |
| ९ | लिलाव | श्रींना अर्पण केलेली वस्त्रे व इतर वस्तूंची प्रसाद रुपाने जाहिर लिलावाने विक्री तीनही दिवस करण्यात येईल. |
| १० | देणगी काऊंटर्स | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदिर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊंटर्स तीन शिफ्टमध्ये ठेवण्यात येतील. |
| ११ | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पुर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणाऱ्या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यास नेमण्यात येईल. याकामी मा.कार्यकारी अधिकारी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश पारीत करतील. |
| १२ | रुग्णालय व्यवस्था | संस्थानमार्फत दोन ठिकाणी चोवीस तास प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदिरपरिसर,प्रसादालय परिसर या ठिकाणी ठेवण्यातयेईल. |

| | | |
|---|---|---|
| १३ | पाणीपुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १४ | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान नं. १ व साई धर्मशाळा,द्वारावती,निवासस्थान, इ. इमारती मधुन पालखी पदयात्रींसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. |
| १५ | पालखी व्यवस्था | श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पुणे तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या व सोबत येणाऱ्या भक्तांची व्यवस्था साईआश्रम ( धर्मशाळा ) परिसरात करण्यात येते. येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. पायी येणा-या भक्तांची आवश्यकतेनुसार शिंगवे, गुहापाट, पिंप्री निर्मळ येथे संस्थानतर्फे टँकरने पिण्याचे पाणी पुरविण्याची व्यवस्था यंदाही करावी लागणार आहे. |
| १६ | कार्यक्रमाची सांगता | गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल.काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील. |
| १७ | खर्चाचे अंदाजपत्रक | श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१५ मध्ये प्रत्यक्ष खर्च रु. ३१,५९,३३४/- (रु. एकतीस लाख एकोणसाठ हजार तीनशे चौतीस) मात्र इतका खर्च झाला होता. श्री गुरुपौर्णिमा उत्सव सन-२०१६ करीता खालील तपशिलाप्रमाणे अंदाजे रु.**४४,४१,०००/-** (रु.चवेचाळीस लाख एके चाळीस हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे. |

**श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१६ अंदाजपत्रक**

| अ.क्र | खर्च तपशिल | विभाग | श्री गरुपौर्णिमा उत्सव -२०१५ | | श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१६ |
|---|---|---|---|---|---|
| | | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | |
| १ | मंडप व कमानी स्टेज | बांधकाम | ४,९६,३५२.०० | ५,८९,२४०.०० | ६,९०,०००.०० |
| २ | कलाकार बिदागी, कीर्तनकारासह | मंदीर | ३,११,०५७.०० | १४,६८९.०० | ३,१२,०००.०० |
| ३ | भक्तांना मिष्टांन्न् मजूरीसह | प्रसादालय | ७,७८,०३८.०० | ८,५२,७२६.०० | ८,४९,०००.०० |
| ४ | विद्युत रोषणाई | विद्युत | १,३०,०००.०० | ५००००.०० | १,२५,०००.०० |
| ५ | छपाई खर्च, | वशी-५ | ३,५०,०००.०० | ३,२२,१४०.०० | ३,५०,०००.०० |
| ६ | पोष्टेज खर्च | वशी-१२ | ९,७५,०००.०० | ९,६९,५३५.०० | ९,९०,०००.०० |
| ७ | उदीप्रसाद,जाहिरात, बॅनरखर्च | वशी-८, जनसंपर्क | २,७५,०००.०० | ४८,११२.०० | १,५०,०००.०० |
| ८ | जादा कामगार | कामगार | २,५०,०००.०० | २,५५,०००.०० | ३,५०,०००.०० |
| ९ | पालख्या पिण्याचे पाणी इ. | पाणीपुरवठा | २,२५,०००.०० | ४८,१९४.०० | ३,२५,०००.०० |
| १० | मंदीर सजावट | बगीचा | २,००,०००.०० | ०.०० | २,००,०००.०० |
| ११ | इतर खर्च | | १,०९,५५३.०० | ८,८६५.०० | १,००,०००.०० |
| | **एकुण** | | **४१,००,०००.००** | **३१,५९,३३४.००** | **४४,४१,०००.००** |

तरी उपरोक्त प्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१६ साजरा करणेस, त्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.**४४,४१,०००.००** (रु.चवेचाळीस लाख एकेचाळीस हजार) मात्र चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१६ साजरा करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.४४,४१,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी संस्थान वकिलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील अर्ज दाखल करणेचे प्रस्तावास समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात येऊन, कार्यवाही चालू करणेत आलेली आहे, याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-05)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **संस्थानचे एकूण ३९ विभागात कार्यरत असणा-या कर्मचा-यांचे मनुष्यबळ व्यवस्थापन परिक्षण करणेकामी प्राप्त झालेल्या व्यावसायीक प्रस्तावामधील निम्नतमदरधारकाची सदरहू कामासाठी नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** आस्थापना विभागाचे दिनांक २४/१२/२०१५ व दिनांक १०/०२/२०१६ रोजीचे मंजूर टिपणीन्वये संस्थानमधील विविध विभागात कार्यरत असलेल्या कायम / कंत्राटी कर्मचा-यांचे प्रत्यक्ष कामाचे स्वरुप, कामाची कार्यक्षमता, कामाचा बोजा इत्यादींचे (Work Efficiency & Energy Audit) मनुष्यबळ व्यवस्थापन सल्लागार संस्थेमार्फत (Human Resource Management Consultant) परिक्षण करणेचे प्रस्तावित असल्याने याकामी संस्थानचे संकेतस्थळासह व महाराष्ट्र राज्यातील प्रमुख शहरांमध्ये प्रसिध्द होणा-या वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देण्यात आलेली होती.

सदर जाहिरातीत इच्छुक सल्लागार व्यक्ती / संस्थांनी सिलबंद व्यावसायिक प्रस्ताव दि. १९/०३/२०१६ अखेर जमा करणेबाबत नमूद करणेत आलेले होते परंतु आस्थापना विभागाचे दिनांक १७/०३/२०१६ रोजीचे मंजूर टिपणीन्वये उपरोक्त कामासाठी दि.२६/०३/२०१६ अखेर व्यावसायिक प्रस्ताव स्विकारणेस मान्यत घेण्यात आली होती.

**(ब)** त्यास अनुसरुन मनुष्यबळ परिक्षण संदर्भात उपरोक्त नमूद विहित मुदतीत ०४ व्यावसायिक प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.नं | व्यावसायिक प्रस्ताव धारकाचे नाव | आवक क्र. | दिनांक | शेरा. |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.चैतन्य चंद्रकांत उगले, नाशिक | २५०३२ | २१/०३/२०१६ | ई-मेल संदेशाव्दारे प्राप्त |
| ०२ | संदिप मुखर्जी कन्स्लटींग सर्व्हिसेस, कोलकत्ता | २५३७७ | २४/०३/२०१६ | बंद पाकीटाव्दारे प्राप्त |
| ०३ | वैभव प्लेसमेंट्स (प्रा). लिमिटेड, नाशिक | २५४४८ | २६/०३/२०१६ | बंद पाकीटाव्दारे प्राप्त |
| ०४ | श्री.धनंजय गोखले, पुणे | २५४६८ | २६/०३/२०१६ | बंद पाकीटाव्दारे प्राप्त |

**(क)** उपरोक्तप्रमाणे मनुष्यबळ परिक्षण संदर्भात प्राप्त झालेले ०४ व्यावसायिक प्रस्ताव उघडून, इच्छूक प्रस्तावधारकांनी सादर केलेल्या प्रस्तावांचा अभ्यास करुन त्याबाबतचा तुलनात्मक अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेकामी मान्यता असावी.

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेले ०४ व्यावसायिक प्रस्ताव आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं** | **व्यावसायिक प्रस्ताव धारकाचे नाव** | **भाग – ०१ कळविलेले दर रु.** | **भाग – ०२ कळविलेले दर रु.** | **एकूण दर रु.** |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.चैतन्य चंद्रकांत उगले, नाशिक | १८,००,०००/- + टॅक्स | ५,००,०००/- + टॅक्स | २३,००,०००/- + टॅक्स. |
| ०२ | संदिप मुखर्जी कन्स्लटींग सर्व्हिसेस, कोलकत्ता | ३०,५०,०००/- + टॅक्स | ६०,५०,०००/- + टॅक्स | ९१,००,०००/- + टॅक्स + शिर्डी भेटीदरम्यान निवास / भोजन व्यवस्था विनामुल्य |
| ०३ | वैभव प्लेसमेंट्स (प्रा). लिमिटेड, नाशिक | - | - | ९,५१,०००/- टॅक्ससहित (शिर्डी भेटीदरम्यान निवास/ भोजन व्यवस्था विनामुल्य + प्रवासखर्च) |
| ०४ | श्री.धनंजय गोखले, पुणे | ९,५०,०००/- | ३,००,०००/- | १२,५०,०००/- + टॅक्स + शिर्डी भेटीदरम्यान निवास / भोजन व्यवस्था विनामुल्य |

संस्थान व्यवस्थापनांतर्गत असणारे विविध विभागातील कामांचे मनुष्यबळ व्यवस्थापन संस्थेमार्फत परिक्षण करणेकामी वैभव प्लेसमेंट्स (प्रा)लिमिटेड, नाशिक यांचे रु.९,५१,०००/- (टॅक्ससहित) मात्र तसेच परिक्षण करणेसाठी ज्या-ज्या वेळेस शिर्डीला भेट देतील, त्या त्या वेळेस त्यांची निवास भोजन व्यवस्था विनामुल्य व येणे- जाणेचा प्रवास खर्च, असे निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वैभव प्लेसमेंट्स (नाशिक) यांचे उपरोक्त आधोरेखीत निम्नतम दर मान्य करणेत आले तसेच त्यांनी मागणी केलेल्या उपरोक्त सोई-सुविधाबाबत चर्चा करणेसाठी वैभव प्लेसमेंट्सचे श्री.व्यवहारे यांना मा.कार्यकारीअधिकारी तथा अध्यक्ष, उपसमिती सभा यांचेसमोर बोलविण्यात येऊन, अंतीम निर्णय घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**(ड)** मा.उपसमितीचे केलेल्या उपरोक्त शिफारशीनुसार दि०२ जून, २०१६ रोजी वैभव प्लेसमेंट्स (प्रा)लिमिटेड, नाशिकचे श्री.श्रीधर व्यवहारे यांना चर्चेसाठी बोलविणेत आले होते. वैभव प्लेसमेंट्स (प्रा)लिमिटेड, नाशिक यांनी त्यांचे प्रस्तावा मध्ये मागणी केलेली संस्थानकडून अपेक्षित असलेली मदत / सुविधा बाबत चर्चाझाली. सदर चर्चेमध्ये संस्थानकडून केवळ परिक्षण कालावधीत येणा-या प्रतिनिधींची निवासव्यवस्था,भोजनव्यवस्था (व्हि.आय.पी कक्षामध्ये) व कामानिमित्त संस्थान परिसरात प्रवासाची मोफत सोय करणेत येईल,जाणे-येणेचा प्रवासखर्च संस्थानकडून देता येणार नाही असे सांगितले सदरहू चर्चा मान्य असलेबाबत श्री.श्रीधर व्यवहारे यांनी दि.०४ जून २०१६ रोजीचे पत्राने कळविले असून ते काम करणेस तयार आहेत. सदर पत्रासोबत त्यांनी कामाचे वेळापत्रक कळविलेले असून सदर कामासाठी सुरुवातीस रु३,००, ०००/- ॲडव्हॉन्स रक्कम मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

तरी संस्थानचे एकूण ३९ विभागात कार्यरत असणा-या कायम/ कंत्राटी कर्मचा-यांचे कामाचे मनुष्यबळ व्यवस्थापन परिक्षण करणेकामीनिम्नतम दरधारक वैभव प्लेसमेंट्स (प्रा.) लिमिटेड, नाशिक यांचे निम्नतम दर रु.९,५१,०००/- स्विकारणेस व त्यांना त्यांचे मागणीनुसार सुरुवातीस रु३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख मात्र) ॲडव्हॉन्स व इतर सुविधा/ मदत विनामुल्य देऊन नेमणूक करणेच्याप्रस्तावर निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.३६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे एकूण ३९ विभागात कार्यरत असणा-या कर्मचा-यांचे मनुष्यबळ व्यवस्थापन परिक्षण करणेकामी प्राप्त झालेल्या व्यावसायीक प्रस्तावामधील निम्नतमदरधारकाची सदरहू कामासाठी नेमणूक करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात येऊन, कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **विशेष प्रसादभोजन (व्ही.आय.पी.) कक्षातील प्रसादभोजनाचे दर वाढविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतूद:-** सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 14 (भाग- 4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील 21 (1 घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**प्रास्तविक:-** श्री साई प्रसादालयातील व्ही.आय.पी.भोजन कक्षामध्ये अति महत्वाचे (व्ही.व्ही.आय.पी.) मान्यवरांमध्ये महामहिम राष्टपती, महामहीम राज्यपाल, लोकसभा अध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष, केंदीय मंत्रीगण, विविध राज्याचे मंत्रीगण, खासदार, आमदार, मा.विविध न्यायालयाचे न्यायाधिश, केंद्र सरकार, राज्य शासनाचे सचिव, जिल्हाधिकारी, समकक्ष अधिकारी वेळोवेळी येत असतात. त्यांची श्री साई प्रसादालयातील व्ही.व्ही.आय.पी. कक्षामध्ये प्रसादभोजनाची व्यवस्था करणेत येते. याकरीता अति महत्वाची बैठक व्यवस्था असून ती कायम आरक्षीत असते.

**महत्वाच्या (व्ही.आय.पी.)** व्यक्तींमध्ये रुपये 25,000/- व त्यावरील देणगी देणारे सर्व साईभक्त, संस्थान अतिथी, सर्व नगरपंचायत अधिकारी, पदाधिकारी, शासकीय अधिकारी, पत्रकार व सन्माननीय पाहुणे यांचा समावेश केला जातो. अशा महत्वाच्या (व्ही.आय.पी.) व्यक्तींना सध्या प्रसादालयात विशेष बैठक व्यवस्था (व्ही.आय.पी) कक्ष नं.1 (A) मध्ये - सदर कक्षातील काही भाग हा मान्यवरांसाठी आरक्षित ठेवून प्रसादभोजन व्यवस्था केली जाते. उर्वरीत सर्व भागामध्ये साईभक्तांची प्रसादभोजन व्यवस्था करण्यात येते. तसेच विशेष बैठक व्यवस्था (व्ही.आय.पी) कक्ष नं.2 (B) मध्ये एकत्रित (गटाने) येणाऱ्या भक्तांसाठी प्रसादभोजनाची व्यवस्था करणेत येते. अति महत्वाच्या, महत्वाच्या तसेच साईभक्त यांचेकडून मा.व्यवस्थापन समिती दि.10/01/2010 रोजीचे सभेतील निर्णयानूसार दि.18/01/2010 पासून प्रौढ व्यक्तीस रु.40/- व लहान मुलास रु.20/- (10 वर्षाखालील) असा आकार घेवून प्रसादभोजनाची व्यवस्था करणेत येते. ती आजतागायत सुरु आहे.

वरीलप्रमाणे मान्यवर व्ही.आय.पी.नं.1 व 2 कक्षामध्ये प्रसाद भोजनाचा लाभ घेतात. व्ही.आय.पी. नं.1 व 2 कक्षामधील प्रसाद भोजनात पुढीलप्रमाणे पदार्थ देण्यात येतात. तसेच दोन्ही ठिकाणी कुशन खर्ुच्या, डायनींग टेबल अशी आरामदायी बसण्याची व्यवस्था केलेली आहे व सार्वजनिक हॉलमध्ये बैठक व्यवस्था टेबल बाकावर आहे.

| **अ.नं.** | **व्ही.आय.पी कक्ष नं.१ व २ (A व B) मध्ये देण्यात येणा-या पदार्थाचा तपशिल** | | |
|---|---|---|---|
| 01. | चपाती | 06. | पापड |
| 02. | भात | 07. | दही |
| 03. | वरण | 08. | लोणचे (देणगी आलेस) |
| 04. | दोन प्रकारच्या भाज्या | 09. | बर्फी/शिरा/शेवई |
| 05. | चटणी | 10. | सलाड-कांदा, टोमॅटो (व्ही.व्ही.आय.पी. आरक्षीत जागेवर) |

उपरोक्तप्रमाणे व्ही.आय.पी. भोजन कक्ष नं.1 व 2 मध्ये मान्यवरांची भोजन व्यवस्था अमर्याद करण्यात येते. तसेच तेथील बैठक व्यवस्था आरामदायी असून त्याठिकाणी स्वतंत्र सेवा पुरविली जाते. वरील व्ही.आय.पी. भोजन कक्षामध्ये मान्यवर व्यक्तींनी लाभ घेतला तर त्यांचा सन्मान करणे आपले कर्तव्य आहे. मात्र ब-याच वेळा या व्ही.आय.पी. भोजन कक्षामध्ये पॉलिशवाले, रस्त्यावर फोटो-माळी विकणारे व्यक्ती मोठया संख्येने (20- 25 गटाने) प्रसाद भोजन घेण्याची मागणी करतात. अशावेळी साईभक्तांची, सन्माननिय मान्यवरांची गैरसोय तर होतेच शिवाय प्रसादालय यंत्रणेवर ताण पडतो व वैयक्तीकरित्या वाद/भांडणे होतात. व्ही.आय.पी. कक्षामधील प्रसाद भोजनाचा दर प्रौढास रु.40/- हा जास्त वाटत नसल्याने व्ही.आय.पी.कक्षात मोठयाप्रमाणात गर्दी होते.

तसेच प्रसादालयात बऱ्याचवेळा देणगीचे माध्यमातून मोफत प्रसादभोजन सुरु असते. परंतू बरेच साईभक्त मोफत प्रसाद घेण्याऐवजी रु.40/- आकार देवून व्ही.आय.पी.मध्येच प्रसादभोजन घेणे पसंत करतात. त्यामुळे विशेष बैठक व्यवस्था कक्ष (व्ही.आय.पी.) मध्ये प्रसादभोजन घेणेसाठी मोठया प्रमाणात गर्दी होत असते. तसेच साईभक्तांना व्ही.आय.पी कक्षाची तिकीट विक्रीकामी रु.10/- चे सुट्टे देवाण-घेवाण कामी अडचण येत आहे. तसेच सर्वच किराणा मालाचे व मजुरीचे दरात मोठी वाढ होत असल्यामुळे उत्पादन खर्चातही वाढ झालेली आहे. त्यामुळे विशेष बैठक व्यवस्था (व्ही.आय.पी.) कक्षातील प्रसादभोजनाचे दर वाढविणेकामी प्रस्तावित केलेप्रमाणे सदरचा विषय मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णयार्थ सादर करणे गरजेचे आहे.

**मागणी:- विशेष बैठक व्यवस्था (व्ही.आय.पी.) कक्षातील भोजन पदार्थ, बैठक व्यवस्था व सेवा, सुविधेचा विचार करता,** विशेष बैठक व्यवस्था (व्ही.आय.पी.) कक्षातील प्रसाद भोजनाचे दर वाढविणे आवश्यक आहे व ते खालीलप्रमाणे असावेत असे इकडील कार्यालयाचे नम्र मत आहे.

1) **विशेष बैठक व्यवस्था (व्ही.आय.पी.)भोजन कक्ष - रु.50/- प्रौढ व्यक्तीस**
2) **विशेष बैठक व्यवस्था (व्ही.आय.पी.)भोजन कक्ष - रु.30/- लहान मुलास (10 वर्षाखालील)**

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:-** आर्थिक

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** साईभक्तांना देण्यात येणाऱ्या प्रसादभोजनातील सर्वच किराणा मालाचे व मजुरीचे दरात वाढ झाल्यामुळे उत्पादन खर्चातही त्या प्रमाणात वाढ झालेली आहे. तसेच व्ही.आय.पी.कक्षाची तिकीटे विक्रीकामी रु.10/- चे सुट्टे टंचाईमुळे आर्थिक देवाण-घेवाण कामी वेळप्रसंगी भक्तांना रांगेत प्रतिक्षा करावी लागते व वेळप्रसंगी वादही होत असतात.

तरी वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थितीचा विचार होऊन विशेष प्रसादभोजन कक्ष, (व्ही.आय.पी.) व व्ही.व्ही.आय.पी मध्ये प्रसाद भोजन घेणारांसाठी प्रौढ व्यक्तीस रु.40/- ऐवजी रु.50/- व लहान मुलास (10 वर्षाखालील) रु.20/- ऐवजी रु.30/- म्हणजेच प्रति तिकीटामागे रु.10/- ची नाममात्र दरवाढ करणेबाबत प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३६६** **उपरोक्त प्रस्तावावर यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांना देण्यात येणाऱ्या प्रसादभोजनातील सर्वच किराणा मालाच्या व मजुरीचे दरात वाढ झाल्यामुळे उत्पादन खर्चातही त्या प्रमाणात वाढ झालेली आहे. तसेच व्ही.आय.पी. कक्षाची तिकीटे विक्रीकामी येणाऱ्या सुट्टया पैशाच्या टंचाईमुळे आर्थिक देवाण-घेवाण करतेवेळी भक्तांना रांगेत प्रतिक्षा करावी लागते व वेळप्रसंगी वादही होत असतात या सर्व वस्तुस्थितीचा विचार करता, विशेष प्रसादभोजन कक्ष, (व्ही.आय.पी.) व व्ही.व्ही.आय.पी. मध्ये प्रसाद भोजन घेणाऱ्या भक्तांसाठी प्रौढ व्यक्तीस रु.४०/- ऐवजी रु.५०/- व लहान मुलास (१० वर्षाखालील) रु.२०/- ऐवजी रु.३०/- म्हणजेच प्रति तिकीटामागे रु.१०/- मात्रची नाममात्र दरवाढ करणेस मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू दरवाढ दि.०१ जुलै, २०१६ पासून लागू करणेत यावी व याबाबत साईभक्तांच्या माहितीसाठी प्रसिध्दी देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **सन २०१६-१७ करीता (माहे जुन-२०१६ ते मार्च-२०१७) गाईचे गावरान तूप खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे लाडू निर्मिती व मंदिर विभागासाठी सन २०१६-१७ (एप्रिल-२०१६ ते मार्च-२०१७) करीता आवश्यक गावरान तूप खरेदीकामी रु.३५,७०,००,०००/- (रुपये पसतीस कोटी सत्तर लाख मात्र) चे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दिनांक ०२.०२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २० अन्वये मान्यता मिळालेली आहे. तसेच सदरचे खर्चास मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांची सिव्हिल ॲप्लिकेशन नं३४९०/२०१६ अन्वये दिनांक ३१.०३.२०१६ रोजी मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सन २०१६-१७ सालासाठी गाईचे गावरान तूप खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रिया दिनांक २१.०४.२०१६ ते दिनांक १२.०५.२०१६ या कालावधीत राबविण्यात आली आहे. सदर निविदा प्रक्रियेमध्ये एकूण ०६ निविदाधारकांनी गावरान तूपाचे नमुन्यांसह निविदा सादर केलेल्या होत्या. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे–

१. मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फलटण
२. मे.एस.आर.थोरात मिल्क प्रॉडक्ट्स प्रा.लि., संगमनेर
३. मे.इंदापुर डेअरी ॲण्डमिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी
४. मे.व्हीएसपी कॉर्पोरेशन, उमरगांव, वलसाड (गुजरात)
५. मे.कोल्हापुर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापुर
६. मे.अजंताराज प्रोटीन्स लि., आग्रा

वरील निविदाधारकांच्या तांत्रिक निविदा दि.१८/५/२०१६ रोजी उघडण्यात आलेल्या आहेत. मे.अजंता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांची निविदा केवळ तांत्रिकदृष्ट्या सर्व निविदा उघडणे अपरिहार्य असल्याचे संबंधित तांत्रिक कर्मचाऱ्यांनी सांगितल्यामुळे त्यांची तांत्रिक निविदा उघडण्यात आली होती. यामध्ये वरील अ.नं.१ ते ५ निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरल्या आहेत.

तर वरील अ.नं. ६ मे.अजंता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांनी संस्थानला सन २०१४-१५ मध्ये मॉईश्चरयुक्त तूपाचा पुरवठा केला होता त्यामुळे त्यांचेकडून तूप घेणे बंद केले होते तसेच त्यावेळी त्यांचे व्हेंडर ऑडीटही करण्यात आले होते. संस्थानच्या विविध अधिकाऱ्यांनीही त्यावेळी मे.अजंता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांचे प्लॅन्टला भेटी दिल्या होत्या. त्यांचेही अहवाल संस्थानला त्यांचेकडून तूप खरेदी करण्यासाठी सकारात्मक नव्हते. तसेच निविदेतील अट व शर्त क्र.२- "यापूर्वी ज्यांनी निविदेत भाग घेऊन पुरवठा आदेश दिल्यानंतर मागणीनुसार मालाचा पुरवठा केलेला नाही, अपूर्ण, खराब मालाचा पुरवठा केलेला आहे, अशा पुरवठादारांच्यानिविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत", अशी होती. या सर्व बाबींचा विचार करता मे.अजंता राज प्रोटीन्स लि., आग्रा यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली आहे.

शासनाच्या नवीन खरेदी निर्णयामध्ये वार्षिक उलाढालीचे अटीबाबत उल्लेख नाही. तथापि संस्थानकडून दरवर्षी किराणा मालाचे वार्षिक खरेदीमध्ये आर्थिक उलाढालीची अट पूर्वीपासून समाविष्टअसल्याने, सदर अटीचा याहीवर्षी गावरान तूपाचे ई-निविदा अटी-शर्तीमध्ये समावेश केला होता. यामध्ये वार्षिक उलाढालीसाठी निविदाधारकाने भरलेल्या निविदा रकमेइतकी त्यांच्या व्यवसायाची आर्थिक वर्षाची उलाढाल असावी अशी अट होती. याबाबतचा तक्ता सोबत अवलोकनार्थ सादर केला आहे. यामध्ये अ.नं.४ चे निविदाधारक वगळता वरील उर्वरित निविदाधारकांची उलाढाल संस्थान खरेदी करीत असलेल्या गावरान तूपाच्या रकमेपेक्षा जास्त आहे. तथापी अ.नं.४ चे निविदाधारक यांचे गावरान तूपासाठी दर न्यूनतम नाहीत.

सदर पाचही निविदाधारकांचे तूपाचे नमुने कोडींग करुन मेअश्वमेध इंजिनिअर्स ॲन्ड कन्सलटंटस्, नाशिक यांचेकडे दि.२४/५/२०१६ रोजी लॅब तपासणीकामी पाठविले होते.

तसेच उपरोक्त निविदाधारकांचे ई-निविदांचे Commercial Bid दि.२७.०५.२०१६ रोजी मा.उपसमितीचे सभेत उघडण्यात आलेले आहेत. सदर Online तुलनात्मक तक्त्यांमधील गावरान तूपासाठी प्राप्त दरांचा तपशील खालीलप्रमाणे–

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | मागणी क्विंटल | दर प्रती क्विंटल | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | **मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फलटण** | १०,२०० | **३५,४००.००** | **३६,१०,८०,०००.००** |
| २ | मे.एस.आर.थोरात मिल्क प्रॉडक्ट्स प्रा.लि., संगमनेर | | ३६,६६७.०० | ३७,४०,०३,४००.०० |
| ३ | मे.इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी | | ३७,९८०.०० | ३८,७३,९६,०००.०० |
| ४ | मे.व्ही एस पी कॉर्पोरेशन, उमरगांव, वलसाड (गुजरात) | | ३७,९४९.०० | ३८,७०,७९,८००.०० |
| ५ | मे.कोल्हापुर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापुर | | ४५,७००.०० | ४६,६१,४०,०००.०० |

वरील Online ई-निविदा तुलनात्मक तक्त्यामध्ये मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फलटण यांचे दर तुलनात्मकदृष्टया इतर निविदाधारकांचे दरांपेक्षा न्युनतम आहेत. सदरचा तक्ता अवलोकनार्थ सोबत सादर केला आहे.

मे.अश्वमेध इंजिनिअर्स ॲण्ड कंन्सलटंन्ट्स, नाशिक यांचेकडून वरील सर्वच निविदाधारकांचे लॅब तपासणी अहवालही प्राप्त झालेले आहेत. सदर सर्वच निविदाधारकांचे गावरान तूप अहवाल Food Safety and Standards Regulations 2011 नुसार खाण्यास योग्य असल्याचे कळविले आहे. ते सोबत अवलोकनार्थ सादर केलेले आहेत.

मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांनी दि.२/६/२०१६ रोजी मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फल्टण यांचे Vendor Audit करुन घेणेबाबत समक्ष निर्देश दिले होते. त्यास अनुसरुन दि.४/६/२०१६ रोजी सदर ऑडिटसाठी मुख्य लेखा अधिकारी, प्र.अधीक्षक, खरेदी विभाग, फुड लॅब टेक्निशियन्स, संस्थान प्रसादालय आचारी गेले होते. यामध्ये लेखाविषयक कागदपत्रांची तपासणी, कर्मचारी हायजिन, उपलब्ध मशिनरी, दूधाचे कलेक्शन, दूधाची लॅब व तपासणी व्यवस्था, तूपाची आचारी यांचेमार्फत तपासणी, तूपाची बी.आर.टेस्ट, बटर, तूप युनिटची तपासणी, तांत्रिक बाबींचे रेकॉर्ड वगैरे सर्व बाबी व्यवस्थित आढळून आलेल्या आहेत.

एकंदरीत मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस् प्रा.लि., फलटण यांचे कामकाज समाधानकारक आढळून आले आहे. संस्थानच्या प्रतिनिधींनी मागीतलेली सर्व माहिती व रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्यात आले आहे. फुड लॅब टेक्निशियन्स यांचा व आचारी यांनी प्रत्यक्षात केलेली तूपाची वापराची तपासणी याबाबतचा अहवाल एकत्रित दिलेला आहे. तसेच प्र.अधीक्षक, खरेदी व मुख्य लेखा अधिकारी यांनी त्यांचा अहवाल स्वतंत्र सादर केला आहे. तोही सकारात्मक आहे.

गाईचे गावरान तूपाचे १५ किलोचे डब्याचे बाजारातील सध्याचे दराबाबत दि.५/६/२०१६ रोजी इंटरनेटवर जे दर उपलब्ध झाले आहेत. त्याची माहिती खालीलप्रमाणे-

| अ.नं. | फर्मचे नांव | ब्रॅन्ड नेम | १५ किलो डब्याचे दर | १ किलोचे दर |
|---|---|---|---|---|
| १. | श्री वेंकटेश्वरा डेअरी प्रॉडक्ट, हैदराबाद | कावेरी गोल्ड | ६,०००/- | ४००.०० |
| २. | अमूल डेअरी | अमूल | ६,५००/- | ४३३.३३ |
